Your Posts 2024

लौकरच येतील माझी खालील पुस्तके --

१. नाणेफेक आणि इतर पाच नाटके

२. ओळख परेड ( एकांकिका संग्रह )

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ' रंगवाचा ' प्रसिद्ध झाला याची फारशी कुणी दखल घेऊ नये, हे इथल्या सांस्कृतिक पर्यावरणाला धरूनच आहे !

भटकी कुत्री

माणसे काही एकमेकांवर प्रेम करू शकत नाहीत हे आता सर्वांनाच माहीत झालेले असून मान्यही झालेले आहे. आणि हार्ट पेशंटना तर प्रेमाची औषधी गरज असते ! हे ओळखून डॉक्टर्सच त्यांना एखादे कुत्रे पाळायचा सल्ला देतात. त्याच्याकडून माणसाला प्रेम, आदर, मोठेपणा आणि जणू काही एखादा जाणता राजा असल्याप्रमाणे ट्रीटमेंट ( उपचार या अर्थीही ) मिळू शकते हे निश्चित असते. ते सगळे ठीक आहे. पण कुत्रे या प्राण्याची दुसरी एक भयानक बाजू मात्र नेहमीच दुर्लक्षित होत आलेली आहे. ती म्हणजे भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या, त्यांच्या पाठलागांमुळे घडणारे अपघात आणि त्यांच्या आक्रमकतेपासून असणारा धोका. विशेषत: लहान मुलांना तर ते फारच धोकादायक असते. अलीकडेच असे ऐकले की एक स्त्री तिच्या लहान मुलाला घेऊन चाललेली असताना एका कुत्र्याने त्या लहान मुलावर हल्ला केला. त्या स्त्रीने लगेच त्या मुलाला उचलून कडेवर घेतले तर ते कुत्रे अधाशीपणे उड्या मारत त्या मुलाकडे झेपावत होते ! तो मुलगा आणि ती स्त्री कसेबसे वाचले. लहान मुलांवर होणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या बातम्या वारंवार येत असतात. काही वेळी तर मुले मृत्यूमुखीही पडतात.

यावर उपाय म्हणून त्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करावे असा एक माणुसकीचा उपाय काढला जातो. ते काही फारसे घडताना दिसत नाही. एकाच डिझाईनची त्यांची प्रजाही वाढताना दिसते. ही समस्या सोडवण्याच्या आड सुप्रसिद्ध असा प्राणी संरक्षण अधिनियम येतो म्हणे ! अरे गाढवांनो, त्या कुत्र्यांचे करा रे रक्षण पण त्यांच्यापासून माणसांना धोका होता कामा नये, अशी काही उपाय योजना हजार वर्षांतही सुचू नाही शकत ? मुक्या प्राण्यांची काळजी घ्यावी यात दुमत नाही पण त्याचबरोबर माणसांचीही, विशेषत: लहान मुलांचीही काळजी घेतलीच पाहिजे, हे कळत नाही ? अशी उपाय योजना करण्याच्या आड कुठला कायदा येत असेल तर तो सत्वर बदलायला हवा. काही लोक त्यांच्यांत असणाऱ्या करुणेपोटी आणि ते आल्यावर ती कुत्री शेपूट हलवतात यातून मिळणाऱ्या प्रेमाच्या गरजेपोटी त्या कुत्र्यांना बिस्किटे वा इतर काही अन्नपदार्थ खाऊ घालतात. खरे तर तसे करण्याविरुद्धही कायदा आहे म्हणे !

कुणी असा उपाय सुचवला म्हणे की गायी, म्हशी, बैल यांचे जसे पांजरपोळ असतात तसे या भटक्या कुत्र्यांसाठीही करावेत. पण, त्यांना असे बंदिस्त तुरुंगात ठेवणे अमानुषपणाचे आणि क्रूरपणाचे होईल असे काहींना वाटते. त्यांना त्यांच्या नेहमीच्या अधिवासात जगण्याचा त्यांचा हक्क अबाधित ठेवला पाहिजे असे काही दयार्द्र बुद्धीचे लोक म्हणतात ! एवढ्या मोठ्या या भारत देशात, ही समस्या मिटवणारे कायदे कसे करावेत याचा सल्ला देऊ शकणारा एकही कायदे तज्ञ नाही ? अपात्रतेचे खटले दोन्ही बाजूंनी लढवणारे ग्रेट वकील, काय त्यांची दहा-वीस कोटींची फी

असेल ती देऊन त्यांना या कामाला लावणे निकडीचे आहे. हवे तर मंत्रिमंडळातल्या दहा-वीस लोकांनी या समस्येचा अभ्यास करण्यासाठी काही परदेशांना भेटीही देऊन यावे. या अशा माणुसकीच्या कामावर पैसे खर्च झाले तर जनता मुळीच तक्रार करणार नाही. ही समस्या सुटत नसल्यामुळे लोकांना रोज कोणत्या शिव्याशापांचा वापर करावा लागतो हे संबंधितांना माहीत नसेल ?

--- 000 ---

अनिल भागवत

हा माझा एक जवळचा मित्र आज गेला. आम्ही दोघेही सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी म्हणून सेंट्रलाईटस. तसेच आणखी एक महत्त्वाचे म्हणजे तो माझ्या ‘ धागेदोरे ‘ या नाटकाचा नायक होता. खरे तर न-नायक ! त्या नाटकाची अनेक ठिकाणी परीक्षणे आली होती – त्यांतले एक होते मा.कृ. पारधी यांचे पूना हेराल्ड मध्ये आलेले इंग्रजी परीक्षण. त्यात त्यांनी म्हटले होते की हा मराठीतला पहिला अँटि-हीरो आहे ! तो खरोखरच उत्तम काम करायचा. तो थिएटर ॲकॅडेमीचा एक महत्त्वाचा नट होता. तसाच, पी डी ए चा एक महत्त्वाचा नट असलेला आमचा आमच्या बँकेतलाच एक सहकारी कै. विश्वास गद्रे हाही त्या नाटकात होता. विश्वास तसा साधा, सज्जन पण अनिल जरा टगेगिरी करायचा. विश्वासच्या तो अनेकदा फिरक्या घ्यायचा. त्या दोघांचे संवाद ऐकणे हा एक विशेष आनंद असायचा. अनिलने थिएटर ॲकॅडेमीच्या अनेक नाटकांतून कामे केली. एका टीव्हीपटात तो निळू फुल्यांबरोबरही होता. ‘ पक पक पकाक ‘ या चित्रपटात त्याने नाना पाटेकरांबरोबरही काम केले होते. बँकेचे जग हाताळणाऱ्या एका टीव्ही मालिकेत त्याने एक महत्त्वाची भूमिका केली होती. उत्तम नट आणि दिलखुलास मित्र ! आम्ही दोघेही एकमेकांना मध्येच कधीतरी निव्वळ आठवण आली म्हणून फोन करायचो. अलीकडे त्याला पायाचाही त्रास होता. तो फारसा बाहेर पडत नसे. पण सुमारे दोन महिन्यांपूर्वी आमचे एक निवृत्तांचे अधिवेशन झाले होते, तेव्हा आमच्याच एका सहकाऱ्याच्या मदतीने तो आला होता. तेव्हा आमचे बोलणे झाले होते.

त्याची एकच काय, अनेक स्मृती आहेत – त्या सर्व स्मृतींना सादर अभिवादन !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

आता इंग्रजीत –

Megha Herur is with Rita Bhatia and

Solid - The New Age Theater is thrilled to announce its next show, "Dhol Tashe," a co-production with Bay Area Drama Company.

The show will be staged at Pear Theatre in March [8th -17th] 2024.

Auditions on Nov 11 & 12.

Link for audition details Link: https://bit.ly/dhol-auditions

एका लेखकाच्या मनातली ॲब्सर्डिटी ---
( सिंहासनाधिष्ठित फोटो ).

Premanand Gajvee
खूप खूप जूना मित्र... चित्रकार सतीश नाईक...
लोकप्रभा..... साप्ताहिकात तो सहसंपादक होता...
काय गच्च होते ते दिवस... १९८० चा तो कालखंड.
'लोकप्रभा' चे एकांकिका विशेषांक प्रकाशित होतं असतानाचा तो काळ.... आणि तो काळ गाजवणारं नाव ....सतीश नाईक........आनंद नाडकर्णी, प्रकाश बुद्धीसागर, चंप्र देशपांडे, प्रेमानंद गज्वी अशा दिग्गजांच्या एकांकिका एकाच विशेषांकात..... आणि INT ची ती एकांकिका स्पर्धा म्हणजे लोकप्रभा विशेषांकाचीच स्पर्धा असे......
पार्टनर,देवनवरी, संसारानु पेंडधार ..... अशा कितीतरी एकांकिका.....ते एकांकिका विशेषांक.... आत्ता हाताशी नाहीत... नाही तर सगळ्या लेखकांची नावं मी इथं दिली असती...
हे सगळं आता इथं सांगतो कारण तो चित्रकार सतीश नाईक परवा (दि. १८/१/२०२४) भेटला दादर-माटूंगा DMCC त, डॉ.मीनाक्षी पाटील यांच्या 'उत्तर आधुनिकता आणि मराठी कविता' या प्रकाशन प्रसंगी....
कित्ती वर्षांनी.... तो काळ एकदम मेंदूत नाचू लागला... कडकडून मिठी भेट झाली... म्हटलं सतीश.... अरे कित्ती वर्षांनी भेटतोयस.... आणि एक सेल्फी काढली.....ती मिठी-ती भेट.... अजरामर असेल मेंदूत...

गिरीश रांगणेकर हा त्याच्या दोन मित्रांना बरोबर घेऊन काही वर्षांपूर्वी ' व्यक्त-अव्यक्त ' हे मासिक काढत असे. त्यात त्याने मला सल्लागार ही पोस्ट दिलेली होती. त्या मासिकात मी लिहीतही असे. तेव्हापासूनचा हा माझा मित्र आहे. शिवाय, हा एक मोठा माणूस आहे. अनेक टीव्ही वाहिन्या, सिंबायोसिस मध्ये विभागप्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठात डीन, अशा जबाबदाऱ्या पार पाडण्याबरोबरच, अनेक जत्रा, प्रदर्शने आयोजित करणे, अनेक शॉर्ट फिल्म्स करणे आणि मुबलक परदेश प्रवास वगैरे खूप मसाला त्याच्या गाठीला आहे. आपली आपण पुस्तके प्रकाशित करायचे मी ठरवले तेव्हा मला लगेच याचीच आठवण झाली. तो नेहमीच या कामात मला साथ देत आलेला आहे. तो स्वत: एक उत्तम संपादक आणि एक हरहुन्नरी लेखक आहे. त्याच्यामुळेच मला आवश्यक त्या व्यक्ती, तंत्रज्ञ, चित्रकार हे मिळत आलेले आहेत. या चित्रातला तीसरा आदमी सुशील शिरसाठ हाही गिरीशमुळेच माझा मित्र झालेला आहे. त्यालाही, परदेशातल्या व इथल्या अनेक जाहिरात कंपन्यांबरोबर काम करण्याचा अनुभव आहे. हा मुखपृष्ठ या विषयात जो भी मंगता है ते करून देतो. या दोघांचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे संगीतप्रेम ! गिरीश गायक असून सुशील हा अनेक वाद्यांचा वादक आहे. त्यांचा एक संगीतसमूह असून ते जाहीर कार्यक्रमही सादर करतात. आणि माझे तर विचारूच नका ! लेखन आणि पुस्तक-प्रकाशन या कामांत मला ज्या ज्या गरजा निर्माण होतात त्यांची त्यांची पूर्तता करणारी माणसे आकाशातून येऊन माझ्यापुढे हजर होतात ! तर अशा आम्हा तिघांचा हा फोटो –

चंप्रंनी लिहिलेली असंख्य महत्वपूर्ण नाटके, दीर्घांक आणि एकांकिका यांना सध्या पुस्तकरूप मिळते आहे. प्रत्येक पुस्तक छापून आल्यावर आमची निवांत डिनर भेट अगदी ठरलेली असते. अश्या भेटींचे कधी फोटो काढले गेले नाहीत. मात्र कालची भेट त्याला अपवाद! म्हंटलं, पुस्तकाच्या नावाप्रमाणेच होऊन जाऊदे एकदम "खुल्लम खुल्ला"! सोबत माझा मित्र सुशील शिरसाट, ज्याने "खुल्लम खुल्ला" सह चंप्रंच्या "पाच ॲब्सर्ड नाटके" पुस्तकाचे देखील कव्हर डिझाईन केले आहे.
खरंतर सरांच्या या प्रकाशनाच्या, छपाईच्या कामात माझा सहभाग अगदी अल्पसा आहे. मात्र चंप्र सर त्यांच्या या पुस्तकांत अनेक मातब्बर मंडळींबरोबर माझे देखील आभार मानत आले आहेत आणि वर पुस्तक गरमा गरम छापून आल्यावर लगेचच्या भेटीत पुस्तकाची प्रत देखील सहीनिशी अगदी अगत्यपूर्वक भेट देत आले आहेत! आमची ही मोकळी ढाकळी भेट जणू वैचारिक मेजवानी असते. माणसाचं एकूण जगणं, मन, बुद्धी, विचारसरणी, कलेचा उपयोग अश्या असंख्य विषयांना कवेत (प्याल्यात?) घेत आमच्या गप्पा रंगत जातात. कालचीही भेट अर्थातच अपवाद नव्हती.  धन्यवाद चंप्र सर, आणखी एका यादगार मेहेफीलीसाठी! --- गिरीश रांगणेकर.

आरती प्रभू / चिं. त्र्यं. खानोलकर हे माझे आवडते कवी / लेखक ! त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे याचा मला आनंद आहे ! --- ( आणि निमंत्रण पत्रिका ).

*आरती प्रभू पुरस्कार-२०२४*

बाबा वर्दम थिएटर्स ही कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) येथील हौशी कलाकारांची नाटयसंस्था, कुडाळ येथील कै. बाबा वर्दम, के. वामनराव पाटणकर, कै. शंकरभाई वर्दम यांच्या प्रेरणेने व श्री. चंदू शिरसाट या प्रतिभावंत दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य यांच्या नेतृत्वाखाली गेली ५२ वर्षे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात अग्रस्थानी आहे. कुडाळ मधीलच नामांकित शैक्षणिक संस्था क.म.शि.प्र. मंडळाने सन २०१३ मधे संस्थेच्या कुडाळ हायस्कूल, कुडाळ या प्रशालेचे माजी विद्यार्थी, प्रतिभावान साहित्यिक कै. चिं. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांच्या नावे आरती प्रभू कला अकादमी ही संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत नृत्य, नाट्य, संगीत याचे प्रशिक्षण दिले जाते. क.म.शि.प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष मा.शशिकांत गावडे, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. भाईसाहेब तळेकर तसेच संस्थेचे सर कार्यवाह मा. श्री. आनंद वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली अकादमीची वाटचाल जोमाने सुरू आहे.

कै. चिं.त्र्यं. खानोलकर उर्फ आरती प्रभू हे कुडाळचे सुपुत्र. त्यांच्या लोकविलक्षण प्रतिभेबद्दल कुडाळच्या साहित्य, नाट्य व शैक्षणिक क्षेत्रात वावरणाऱ्या सर्वांना अतिशय आदर आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन रहाव्यात याकरीता त्यांच्या नावाने कवी, कवयित्री आणि नाटककार यांना आरती प्रभु पुरस्कार दिला जातो.

बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ आणि आरती प्रभू कला अकादमी, कुडाळ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा आरती प्रभू पुरस्कार सन २०१३ पासून कविता आणि नाट्यलेखन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कवी किंवा नाटककारास दरवर्षी दिला जातो. रोख रु. ११,०००/-, स्मृतीचिन्ह, मानपत्र व शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

सन २०१३ सालचा पहिला पुरस्कार गोवा येथील प्रसिध्द कवी व नाटककार श्री. विष्णू सूर्या वाघ, सन २०१४ सालचा पुरस्कार पुणे येथील प्रसिध्द नाटककार श्री. सतीश आळेकर, सन २०१५ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्री. शफाअत खान, सन २०१६ सालचा पुरस्कार नागपूर येथील प्रसिध्द नाटककार श्री. महेश एलकुंचवार, सन २०१७ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्रीम. सई परांजपे, सन २०१८ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द कवी डॉ. महेश केळूसकर, सन २०१९ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द कवी श्री. किशोर कदम उर्फ सौमित्र, सन २०२१ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी, सन २०२२ सालचा पुरस्कार प्रसिध्द कवी श्री. गुरु ठाकूर, सन २०२३ सालचा पुरस्कार पुणे येथील प्रसिध्द कवयित्री श्रीम. अरुणा ढेरे यांना प्रदान करण्यात आला.

*या वर्षीचा पुरस्कार पुणे येथील ज्येष्ठ नाटककार श्री. चं. प्र. देशपांडे यांना देण्यात येणार आहे. सदर पुरस्कार वितरण रविवार दिनांक ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. एकनाथ ठाकूर सभागृह, संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ येथे केले जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सुप्रसिध्द दिग्दर्शक, अभिनेते डॉ. शरद भुताडिया यांच्या हस्ते तसेच बाबा वर्दम थिएटर्सचे संस्थापक श्री. चंदू शिरसाट व आरती प्रभु कला अकादमीचे अध्यक्ष श्री. अविनाश उर्फ भाईसाहेब तळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व बाबा वर्दम थिएटर्सच्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.*

या पुरस्कार वितरण सोहळ्याला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाबा वर्दम थिएटर्सचे कार्यवाह श्री. केदार सामंत व आरती प्रभू कला अकादमीचे कार्यवाह श्री. आनंद वैद्य यांनी केले आहे.

तो राजहंस एक ( दीर्घांक )

ले ० दत्ता पाटील, दिग्द ० सचिन शिंदे,

निर्मिती ० सोशल नेटवर्किंग फोरम आणि परिवर्तन.

हे एक अप्रतिम, उत्तम नाटक काल पाहिले. दत्ता पाटील हे एक उत्तम लेखक आणि सचिन शिंदे हे एक उत्तम दिग्दर्शक असल्याचे मला माहीत होते कारण या द्वयीचे दोन दीर्घांक, ‘ हंडाभर चांदण्या ‘ आणि ‘ गढीवरच्या पोरी ‘ हे मी पूर्वी  पाहिलेले होते. हाही दीर्घांक तसाच दर्जेदार म्हणावा असा होता.

याचे नाव जरा रोमँटिक होते पण, विषय-आशय परखड, लहान शेतकऱ्याच्या मुलाच्या समस्या हा होता. यातला नायक हा शेतकऱ्याचा मुलगा असून एम ए झालेला आहे. शेतीतले तुटपुंजे उत्पन्न, कर्जाचा बोजा, नोकरी नसणे आणि या सगळ्या परिस्थितीमुळे लग्नाच्या जगात मुलींकडून सारखे नकार येत जाणे, असे हे उजाड जगणे आहे. चौतीस नकारांनंतर तो पस्तीसाव्या नकाराच्या वेळी मात्र त्या मुलीशी बोलायचे ठरवतो. ते दृश्य, प्राजक्त देशमुख आणि ईशा संजय यांनी त्यातल्या सर्व गुंत्यासह प्रभावीपणे सादर केले. या नायकाचे लग्न होत नसल्याने तो आपल्या बायकोकडे ‘ वाईट ‘ नजरेने पाहतो, असा त्याच्या भावाला संशय आहे. नायकाच्या दु:खावर भयानक डागण्या देणारा हा प्रकार आहे. या सगळ्या प्रकारात त्याचा पब्या नावाचा मित्र मात्र त्याची साथ देत राहतो आहे. त्याची आई गेलेली असून वडील परिस्थितीने गांजलेले आहेत.

हा सुस्वभावी, साधा, सज्जन नायक कवीही आहे. त्याच्या दु:खी अनुभवातून येणाऱ्या कविता तो लिहितो. “ कविता लिहून काही नाही होत “ हे पालुपद तो अनेकदा उच्चारतो. विशेष म्हणजे त्याच्या कवितांतून हत्ती, राजहंस – अशा प्रतिमा येतात. हत्ती नसला की त्याच्या त्या रिकाम्या जागेत आपण आपला हत्ती तयार करायचा, असे काही तो बोलतो. आपल्या भूतकाळाने आपण आपला वर्तमानकाळ भरून टाकतो – असे सखोल म्हणावे असेही त्याला काही सुचते. तो एक संवेदनशील आणि चिंतनशीलही असा एक कवी आहे. कविता लिहून काही होत नाही असे म्हणणाऱ्या या कवीला आपल्या हातून जागतिक दर्जाचे काही लिहून होत नाही याची खंत आहे आणि त्या बाबतीत तो निराशावादीही आहे. इतके दु:ख असूनही त्यातून जागतिक महत्त्वाचे असे का नाही काही निर्माण होत, असा एक प्रश्न हे नाटक समोर आणते. इथे शेतकऱ्याने आत्महत्या करण्या ऐवजी त्याच्या मुलाने या विचित्र समस्यायुक्त परिस्थितीने आत्महत्या करण्याची शक्यता व्यक्त होते. “ आत्महत्या करायची तर मागे ठेवायच्या चिठ्ठीतला मजकूर एकाच पानात मावला पाहिजे, अशी पद्धत आहे “ असे उपरोधिक वाक्य तो बोलतो.
दत्ता पाटील या अलीकडच्या काळातील सशक्त लेखकाने हे नाटक म्हणजे नुसतीच एक विद्रोही, परिवर्तनवादी प्रतिक्रिया म्हणून लिहिलेले नसून या समस्येचे सर्वांगीण भान व्यक्त करणे, हा व्यापक आवाका घेतलेला आहे. त्यामुळे हे एक ‘ वेगळे ‘ नाटक ठरते. अर्धवट, अपूर्ण वाक्यांचे संवाद, काही रोमँटिक वा अतिवास्तववादी कविता यांच्या योगाने त्यांनी या संहितेला एक व्यापक परिमाण दिलेले आहे. या सशक्त संहितेला रंगमंचावर सादर करण्यात दिग्दर्शक सचिन शिंदेही तोडीस तोड यशस्वी झालेले आहेत. ही जोडगोळी मराठीत अशा अनेक उत्तमोत्तम कलाकृती सादर करत राहील, यात शंका वाटत नाही.
विशेष उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे प्राजक्त देशमुखचा. या नाटकातली त्याची नायकाची भूमिका खूपच आव्हानात्मक होती. साधारणत: भरकटण्याच्या काठावर असलेला पण तरीही बराचसा नीट असलेला असा हा नायक उभा करणे सोपे नाही. हालचाली, विराम, आवाजातले चढ-उतार यांचे खूपच वैविध्य प्राजक्तने दाखवले. हा अभिनयातला सूक्ष्मपणा इतका आहे की तो प्रत्येक प्रयोगात वेगळाच असणे भाग आहे. प्रत्येक वेळी नव्याने सादर करायची ही भूमिका आहे. प्राजक्त हा एक मराठीला मिळालेला खूपच आश्वासक, चिंतनशील नट आहे, असे मला वाटते.
साधेसे नेपथ्य, पुरेसे संगीत, प्रकाशयोजना – हे सर्व उत्तम ! सर्व टीमचे खूप खूप अभिनंदन !
--- ००० ---

कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांनी त्यांची ' त्रिशंकू ' ही कादंबरी मला सप्रेम भेट दिली होती -- त्याचा हा फोटो –

माझ्या ' मन ' या दीर्घांकाच्या बाबतीत आपल्या परिनिरीक्षण मंडळाचे एक पत्र आलेले असून, त्यांनी त्या संहितेतल्या शिव्या वगळायला सांगितले आहे. त्याला मी दिलेले उत्तर खालीलप्रमाणे आहे --
सप्रेम नमस्कार.
' मन ' या मी लिहिलेल्या दीर्घांकातल्या शिव्या -- भिकारचोट, भडव्या, भडवे --
या वगळण्याबाबतचे आपले पत्र पोचले.

मला ही सूचना मुळीच मान्य नाही. नुसतेच संदर्भहीन शिव्यांचे शब्द
पाहून ते वगळायला सांगणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. त्या संहितेत, त्या त्या ठिकाणी
त्या शिव्या, ते शब्द आवश्यक वा योग्य आहेत की नाहीत ते पाहिले जायला हवे.
तरीही, या कारणामुळे तुमचे प्रमाणपत्र मिळणार नाही -- ही बाब -- हा विषय
मी नाट्यकर्मींच्या व इतरांच्या चर्चेसाठी जाहीर करत आहे.
कळावे.
आपला,
चं. प्र. देशपांडे.
पुणे, दिनांक -- ३१-०१-२०२४.

सन्मान आणि भाषणाची बातमी –

मुंबई विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे संचालक योगेश सोमण, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष अविनाश ऊर्फ भाऊसाहेब तळेकर, डॉ. शरद भुताडिया, मी, बाबा वर्दम थिएटर्स च्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य, बाबा वर्दम थिएटर्स चे संस्थापक चंदू शिरसाट --- पुरस्कार वितरण सोहळा, दिनांक -- ०४-०२-२०२४. ( फोटो ).

पावन खिंडीच्या विजय स्तंभाजवळ – ( फोटो ).

कोंडुऱ्याच्या समुद्रकिनाऱ्यावर – ( फोटो ).

Dhol Tashe - Cast Introduction
Solid - The New Age Theater presents Dhol Tashe in collaboration with Bay Area Drama Company
Tickets at www.badco.art/tickets
Roshni DattaPrathyay BhandarkarKrishna DasVaishnavi SridharRita BhatiaChampra Deshpande Sandeep K Belliappa

सूर्यवादळे
एका हिंदी वाहिनीवर अशी बातमी चालू आहे की सूर्याचे उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव यांत उलटापालट होत असून येत्या काही महिन्यांतच ही घटना घडणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सूर्यवादळे निर्माण होणार असून त्यांत पृथ्वी भाजून निघण्याचा धोका आहे !
या एवढ्या मोठ्या बातमीचा इतर वाहिन्यांना काही पत्ताच नाही !

कशाला आता त्या निवडणुका आणि ते राडे आणि ते एकमेकांच्या द्वेषांत जळणे ? मस्तपैकी सगळे डबे घेऊन जाऊ ट्रिपला आणि म्हणू गाणी ' तेरा नाम रहेगा रोशन -- '

--- ००० ---

माझ्या मित्रयादीत काँग्रेसी, समाजवादी, साम्यवादी, वंचितवादी, हिंदुत्ववादी अशा सर्व प्रकारच्या व्यक्ती आहेत आणि नेहमीच असणार !

माझ्या ' लाईक ' चा अर्थ -- पाहिले, वाचले, दखल घेतली -- असा असतो. त्याचा अर्थ आवडले वा पटले -- असा असेलच, असे नाही.

" देव देश अन धर्मासाठी
( आणि आता धर्मनिरपेक्षतेसाठी )
प्राण घेतलं हाती ! "

" आता मीही तिकडे चाललोय. असे होत असते. काही फरक पडणार नाही. इकडे सर्व मजबूत आहे. जनताच मला धडा शिकवील ! "

इंग्रजीत ' ढोलताशे ' आता अमेरिकेत – ( अनेक फोटो ).

प्रचारसूत्रे

हातातून सत्ता गेल्याने ब्राह्मण अस्वस्थ होते, त्यातून विष्णुदास भाव्यांनी ‘ सीतास्वयंवर ‘ हे नाटक लिहिले – असली विश्लेषणे मला पटत नाहीत. त्याच चालीवर मग असे म्हणता येते की राजकारणातून हकालपट्टी झाल्याने इथल्या डाव्यांनी कला व संस्कृतीची क्षेत्रे काबीज केली. तर हीच काय, कुठल्याही विश्लेषणांतून सत्याचा प्रकाश सापडतो असे मला वाटत नाही. आपापल्या मतांना पुष्टी देणारे तपशील जमवून विश्लेषणे केली जातात आणि ती सत्य म्हणून खपवली जातात, असेच मला वाटते. हे लक्षात घेऊन या निरर्थक अंगणात आपणही पाहावे खेळून असे वाटल्याने हे लिहीत आहे.

स्वातंत्र्य लढ्याच्या वेळेस काँग्रेसपुढे, स्वातंत्र्य मिळवणे आणि परदेशी शक्तींपासून रक्षण या दोन गोष्टी होत्या. तीच त्यांची प्रचारसूत्रे होती. स्वातंत्र्यानंतर ती पुण्याई आणि देशाची प्रगती ही प्रचारसूत्रे उपयोगी पडत गेली. जातीय आणि धार्मिक समीकरणे काँग्रेसने पायाभूत मानली नाहीत. त्या गणितांचा निवडणुकांत वापर केला पण संघटनेचा तो आधार मानला नाही. स्वातंत्र्याचे समावेशक प्रचारसूत्र हळूहळू नष्ट होत गेले आणि वातावरणात इतर प्रचारसूत्रे पुढे येऊ लागली. समाजवाद, साम्यवाद, हिंदुत्ववाद हे आपला अवकाश शोधू लागले. सध्या काँग्रेसकडे कोणतेही प्रचारसूत्र नाही असे दिसते. त्यामुळे, विस्कळितपणे काही बोलत राहणे त्यांना भाग पडते आहे. एखाद्या खेड्यातल्या

आजाऱ्यासाठी आपण काही करतो आहे असे ' वाटून घेण्यासाठी ' कुठेतरी लांब जाऊन अंगारा आणला जातो, तसेच त्यांच्या यात्रांचे स्वरूप दिसते आहे. ठोस असे समोर काही नाही आहे.

भाजपाचा हिंदुत्वाचा अजेंडा, आपल्या धर्माची भूमी शाबूत ठेवणे आणि इतर धर्मियांच्या संभाव्य वर्चस्वापासून रक्षण होणे या मजबूत पायावर फोफावत गेला. या प्रकारात इतर पक्ष धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व प्रचाराला फार वापरतात असे दिसताच त्यांनी युक्ती केली. हिंदुत्ववाद आचरणात ठेवला पण बोलण्यात कमी केला. बोलण्यात विकासाचा अजेंडा मोठा केला. धोरणात धर्मभेद ठेवला नाही आणि ' सबका साथ सबका विकास ' हे सूत्र ठेवले. ते समावेशक होते आणि राष्ट्रवादाच्या त्यांच्या प्रचारसूत्राला बढावा देणारेही होते. त्यामुळे संघटन वाढणे आणि मजबूत होणे ही प्रक्रिया चालू राहिली.

महाराष्ट्रात तरी काही पक्ष जातीचा पाया महत्त्वाचा मानून उभे राहिले. त्यासाठी ब्राम्हणाला शत्रू म्हणून दाखवत राहणे त्यांना आवश्यक होते. पुढे ब्राह्मण तर सामाजिक, राजकीय वा आर्थिक कोणत्याच दृष्टीने प्रभावी राहिला नाही. त्यामुळे त्या जातीय पायाची गरज संपत गेली वा गैरवाजवी ठरत गेली. ओबीसी आणि मराठा असे शत्रुत्व मानणे दोघांनाही पेलणारे नव्हते आणि नाही. दुसरा मुद्दा, धर्मभेद नको, हा. त्यात, धोरणात्मक स्तरावर सत्य फारसे दाखवता न आल्याने त्यातलीही हवा गेली. एकूणच प्रादेशिकपणाचे छोटे स्वरूप येत गेले.

महाराष्ट्रात ब्राम्हणांना लाथा न घालणारे, सन्मानाने जगू देणारे कोण होते तर काँग्रेस, शिवसेना, भाजपा आणि नंतर मनसे. ब्राह्मण मतदार अर्थातच या पक्षांत विभागाला गेला. शिवाय, त्याला एक गठ्ठा अस्तित्व असे नव्हतेच. या प्रकारात शिवसेनेने भाजपाची साथ सोडल्याने बदल झाले. काँग्रेस-राष्ट्रवादी बरोबर गेल्याने त्यांचे हिंदुत्व विरत गेले. मग, आमचेच हिंदुत्व ग्रेट, भाजपाचे खोटे असे म्हणत राहणे त्यांना भाग पडत गेले. त्यांचे ' मराठी ' चा कैवारी असणे तर कधीच मागे पडले होते. त्यामुळे, सध्या उबाठाकडे कोणतेही प्रचारसूत्रच नाही, अशी अवस्था आहे. उबाठाची आणि काँग्रेसची अवस्था या बाबतीत समान आहे ! प्रचारसूत्राचा अभाव ! देश आणि धर्म असे एखादे मजबूत प्रचारसूत्र यांना उभे करता आले नाही तर हळूहळू त्यांची स्थिती अधिकाधिक अवघड होत जाईल, हे स्पष्ट आहे.

भारतात उभे करता येणारे असे एक मोठे प्रचारसूत्र म्हणजे ' शेतकरी ' हे आहे. पण ते विविध पक्षांत, विविध नेतृत्वांच्या प्रभावाखाली आहे. ते एक गठ्ठा उभे राहणे अवघड आहे.

भाजपाची मजबूत प्रचारसूत्रे पराभूत करता येतील असे काही शोधून काढणारे प्रतिभाशाली नेतृत्व सध्या तरी कुणी दिसत नाही. त्यामुळे, भाजपा अर्थातच निश्चिंत आहे.

सारांश, विश्लेषणे सगळी निरर्थक असतात, तसेच हेही आहे. मला तर या राजकीय खेळांत फारसे इंटरेस्टच नसल्याने मी त्यातला कवडीचाही अभ्यास करत नाही. विश्लेषणे अभ्यासपूर्ण असोत की ही अशी अभ्यासहीन – सगळी सारखीच असतात, हे त्यातले सत्य पाहावे, ही नम्र विनंती.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

Megha Herur

Solid -  The New Age Theater in collaboration with Bay Area Drama Company invites you to our upcoming play Dhole Tashe  by Champra Deshpande.

Tickets : www.badco.art/tickets

We have 6 shows :

March 8th : 8:00 p.m, PST

March 9th : 2:00 p.m, PST

March 10th : 2:00 p.m, PST

March 14th : 8:00 p.m, PST

March 15th : 8:00 p.m, PST

March 16th : 2:00 p.m, PST

Roshni DattaPrathyay BhandarkarKrishna DasAshwini VishwanathMugdha ManerkarVaishnavi SridharRita Bhatia

#DholeTashe #solidtheaterplays

कोट्यवधी भारतीयांचा प्यारा आवाज -- अमिन सायानी ! बिनाका गीतमाला ऐकणे हे आमचे बुधवार-व्रत होते ! सादरीकरणातले अजब नाट्य ! सलाम !!!

इंग्रजी ' ढोलताशे ' ची झांकी --

Our team is all geared up to entertain you all.

Did you get your tickets : www.badco.art/tickets

March 8 th to March 16 th

Play: Dhol Tashe

Location: The Pear Theatre , mountain view

Playwright: Champra Deshpande

Team Dhole Tashe Solid -  The New Age Theater

Bay Area Drama Company Krishna Das Prathyay Bhandarkar Sandeep K Belliappa Vaishnavi Sridhar Mugdha Manerkar Roshni Datta Rita Bhatia

अनेक क्षेत्रांत असे दर्जेदार काम करत आलेली व्यक्ती विरळाच !

( हा आहे माझा जुना मित्र गिरीश -- )

( गिरीशच्या मुलाखतीचा व्हिडिओ )

एकाच वेळी मराठीत ( पुणे ) आणि इंग्रजीत ( अमेरिका )
वाजणारे --- ( ढोलताशे )

Set building for upcoming English play Dhole Tashe is going on in full swing.
Did you get your tickets : www.badco.art/tickets.
Solid - The New Age Theater Bay Area Drama Company Rita Bhatia Vaishnavi Sridhar Sandeep K Belliappa Prathyay Bhandarkar Roshni Datta Mugdha Manerkar Krishna Das

आता माझी खालील पुस्तके ---
१ चार पुरुषार्थांची चार नाटके
२ वस्तू आणि इतर सहा दीर्घांक
३ पाच अब्सर्ड नाटके
४ खुल्लम खुल्ला ( एकांकिका संग्रह )
५ आवर्तने ( कविता-आशय-आकलन )
पुढील ठिकाणीही उपलब्ध आहेत ---
पुस्तकवाला अँड कंपनी,
पुणे.
फोन -- ८६२४९७७०२९.
आणि
परेश एजन्सी,
अप्पा बळवंत चौक,
पुणे.
फोन -- ८२७५४८५४८५ .
इच्छुकांनी जरूर लाभ घ्यावा.

पेसोआच्या कविता
अनुवाद ० महेश्वर लव्हेकर, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स
पेसोआ जसा लव्हेकरांचा आवडता कवी आहे तसाच माझाही. त्यामुळे, हे पुस्तक मी खूपच आत्मीयतेने वाचले. प्रख्यात लेखक आणि २००० सालचा नोबेल विजेता, गाओ झिंगझिआन, त्याच्या भाषणात पेसोआबद्दल म्हणाला होता --

“ Fernando Pessoa the most profound poet of the twentieth century “

विसाव्या शतकातला ‘ सर्वात सखोल आणि गहन कवी ‘ ! तसे तर सखोल आणि गहन हे शब्द बऱ्यापैकी वापरात असतातच. पण, काय असावा या शब्दांचा अर्थ ? आणि एवढे असून असून काय असणार आहे ? आपल्याकडे जसे आपापल्या टोळीतल्या कवीला आपण ग्रेट म्हणतो तसलेच असेल काही. एखादे भयानक, वेदनादायक दु:ख असू शकेल. तशा दु:खाचा अनुभव नीट व्यक्त झाला की सखोल होणारच ती कविता. नास्तिक, बुद्धिप्रामाण्यवादी, पुरोगामी ( हे विशेष हुशार लोक ), तसेच, हिंदुत्ववादी, परिवर्तनवादी, स्त्रीवादी, आधुनिकतावादी, उत्तर-आधुनिकतावादी, स्वच्छंदतावादी, वगैरे सर्वांना हेच वाटेल की सखोल म्हणजे दु:खच असणार ! दारिद्र्याचे असेल किंवा वंचिततेचे असेल किंवा अन्याय सहन करावा लागण्याचे असेल. --- तर हे असे सर्वसामान्य अंदाज ! पण, पेसोआची कविता असल्या प्रकारची ‘ सखोल ‘ नाही. मुळात या कवितेला दु:खाची कविताच म्हणता येणार नाही. हे समजूनच संदीप देशपांडे यांनी मुखपृष्ठ केलेले आहे. हे चित्र ‘ दु:खभावी ‘ नाही. ही सखोलता वेगळी आहे – खुल्या मनाने पाहावी लागेल.

मी चिंता करत नाही यमक जुळेल का नाही याची.<br>
क्वचितच साम्य असतं एकमेकांलगतच्या दोन वृक्षांत.<br>
जसा फुलांना रंग असतो तसाच मी करतो विचार आणि लिखाणही.<br>
पण परिपूर्ण नसतं माझं स्वत:ला व्यक्त करणं,<br>
कारण अभाव आहे माझ्यात दैवी साधेपणाचा,<br>
बाह्यांग हेच एकमेव अंग असण्याचा.<br>
मी पाहतो आणि हलतो आतून,<br>
उताराच्या दिशेने पाणी वाहत जावं तसा.<br>
आणि वाहत्या वाऱ्यासारखंच नैसर्गिक आहे माझं काव्य ...

दु:ख जसे स्थितिशील असते तशी ही कविता स्थितिशील नाही. अमुक एखाद्या व्यक्तिगत अनुभवाचा गौरव करणारी नाही.

प्रस्तावनेत लव्हेकरांनी उल्लेख केला आहे की ओक्ताव्हियो पाझ च्या पेसोआ वरील लेखाचे शीर्षकच – unknown to himself ‘ असे आहे. त्याने अनेक टोपणनावांनी कविता लिहिल्या. जणू ती टोपणनावे म्हणजे वेगळ्याच व्यक्ती होत्या. “ त्याचे उगमस्थान, “ पेसोआ म्हणतो, “ माझ्या मानसिकतेत खोलवर रुजलेला हिस्टेरिया किंवा हिस्टेरिकल नुरास्थेनिया. यामुळे मला स्वत:च्या व्यक्तित्वाच्या बाहेर पडण्याची, त्यापलीकडे जाण्याची ओढ वाटायची. “ ही जगण्यात येणाऱ्या अनुभवांची कविता नसून जगण्याचीच कविता आहे. या ओळी बघा –

जगण्यानं हशील होत नाही काहीच.<br>
किंवा जगण्याविषयी विचार करण्यानं.<br>
किंवा त्याविषयी आपण विचार करतोय या विचारानं.

तो विचारतो – “ माझ्या निद्रानाशी अवस्थेत स्वप्न पाहतोय का मी आयुष्याचं ? “

पेसोआची कविता म्हणजे त्याचे जगण्यातला कोणताही क्षण पाहणे असते. ती अमुक अनुभवाची वा अमुक विषयावरची अशी कविता नसते.

लाट शांतपणे जवळ येत चाललीय

आणि मी काही विचार करतोय असं नाही वाटत मला.

एका वेगळ्याच मितीतून लिहिली गेलेली ही कविता आहे. ही कविता मराठीत येणे हे खूपच महत्त्वाचे आहे. यातल्या सगळ्याच कविता पेसोआच्या सर्वोत्कृष्ट कविता आहेत असे नाही. पेसोआची काव्यसृष्टी हे खरे तर एक प्रचंड विश्वच आहे. त्या विश्वाची उत्तम ओळख घडवण्याचे काम हे पुस्तक नक्कीच करते. लव्हेकर आणि वर्णमुद्रा यांना धन्यवाद !

--- ००० ---

ही भाषा मरू नये यासाठी काय करायला हवे यावर चर्चा करणारे विद्वान प्रत्येक पिढीत निर्माण होत राहोत, हीच सदिच्छा !

एस्टीचे आणि रेल्वेचे वेळापत्रक सांगण्या एवढी भाषा टिकली तरी पुरे -- जगातला आपला दहावा नंबर कुठे जात नाही !

२९-०२-२४.

उत्तर-आधुनिकता आणि मराठी कविता

ले ० मीनाक्षी पाटील, प्र ० पॉप्युलर प्रकाशन.

मराठी कवितेतील आधुनिक ते आधुनिकोत्तर जाणिवांपर्यंतचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा ग्रंथ – हे महत्त्व असलेला हा ग्रंथ मराठीत चांगलीच हालचाल निर्माण करील असा आहे. हे तिकडचे आहे, इकडचे नाही – असली वावदूकगिरी कुणी करू नये, असा हा विषय आहे. जागतिकीकरणानंतरच्या मानवी जगण्यात जगभर काही समान सूत्रे दिसतात हे समजून घ्यायला हवे. भौतिक परिस्थितीत जसे काही मोठे, महत्त्वाचे बदल होतात तशा माणसांच्या मन:स्थितीही बदलत जातात, प्रतिक्रिया बदलत जातात. हे असे इझम्स म्हणजे पाहण्याचे, अभिव्यक्तीचे वेगळे प्रवाह असतात. सर्जक लेखकाला वा कवीला हे जाणीवपूर्वक बौद्धिक भान असेल वा नसेल पण साहित्यात, कलेत हे बदलते प्रवाह येत राहतात.

या पुस्तकाचा पहिला औपपत्तिक भाग खूपच अभ्यासपूर्वक मांडलेला आहे. मानवी बुद्धीच्या साहाय्याने माणूस अधिकाधिक चांगला जगू लागेल – हे आधुनिकतेचे प्रमुख सूत्र हळूहळू संशयास्पद होत उत्तर-आधुनिकतेत ते कसे नाकारले गेले, याचा हा मराठी कवितेच्या संदर्भातला आढावा आहे. जगातल्या अनेक विचारवंतांचे या बाबतीतले चिंतन समजून घेत हे लेखन सिद्ध झालेले आहे. " उत्तर-आधुनिकतावादी साहित्यात विविध प्रकारच्या शैली व सांस्कृतिक स्तर, वेगवेगळे वाङमय प्रकार, गांभीर्य व हलकेफुलकेपणा यांची इतकी वैचित्र्यपूर्ण सरमिसळ केली जाते की पारंपरिक वाङमयीन चौकटीत त्याचे वर्गीकरण करणेही अवघड व्हावे. " – हे फार महत्त्वाचे आहे. अशा बदलांना आधी तुरंत नकार देणे ही आपली आवडीची एक डल पद्धत आहे. ती कलाकृती काय कसे व्यक्त करतेय हे

पाहण्याआधी हा वाङ्मय प्रकार कोणता याचीच चर्चा करत बसणे इथे वारंवार घडते. त्या दृष्टीने हे पुस्तक म्हणजे एक खळबळजनक ऐवज ठरू शकतो. उदाहरणार्थ, " या आधुनिकतावादी कवींनी सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेने रूढ केलेल्या ठरीव साच्याच्या काव्यकल्पनेचा निषेध आणि उपरोध करत आपल्या कवितेत गद्य कल्पनेचा आणि तपशीलाचा सर्रास वापर करून कवितेतील गद्यात्मकतेची प्रतिष्ठा वाढवली. " – हे सत्य घ्या. बऱ्याच अभ्यासकांच्या हे पचनी पडणे अवघड आहे.

संकल्पनात्मक बैठक आधी तयार करून मग इथे मराठीतल्या आठ निवडक कवींच्या संदर्भात त्या संकल्पनांचे अस्तित्व कसे दिसते ते दाखवले आहे. सामाजिक-सांस्कृतिकतेतला उच्च-नीच भेद उधळून टाकणारे नामदेव ढसाळ, जागतिकीकरणानंतर चिन्हमय  झालेल्या माणसाच्या जगण्याला मुखर करणारे श्रीधर तिळवे, जागतिकीकरणामुळे झालेले माणसाचे अमानवीकरण आणि वस्तूकरण याचे दर्शन घडवणारे हेमंत दिवटे, महानगरी जीवनातली असुरक्षितता व भय व्यक्त करणारे वर्जेश सोलंकी, एकाच वेळी तीव्र आत्मजाणीव आणि परात्मभावाची जाणीव यांतले द्वंद्व व्यक्त करणारे सलील वाघ, संगणकीकरण, माहितीचा विस्फोट आणि संपर्क-क्रांती यांतून विखंडित झालेल्या जगण्याचा वेध घेणारे सचिन केतकर, अपारंपरिक अभिव्यक्तिपद्धतीतून नव्या भोगवादी जगण्यातली विदारकता दाखवणारे संजीव खांडेकर आणि उलथापालथ, विस्कळितपणा व संभ्रमितपणा यांचे अनुभव व्यक्त करणारे मन्या जोशी – अशा या आठ कवींचा उत्तर-आधुनिक वैशिष्ट्यांच्या संदर्भात विचार करण्यात आलेला आहे.

हे पुस्तक अभ्यासकांनी तर वाचावेच पण स्वत: कवी-कलावंत यांनीही ( सावकाशपणे का असे ना ) वाचावे, असे मला वाटते. विचार, प्रतिक्रिया, अभिव्यक्तिपद्धती हे काहीच अबाधित राहणारे नसते याची जाणीव होण्यासाठी अशी पुस्तके महत्त्वाची असतात यात शंकाच नाही.

--- ००० ---

गाडीच्या वेगाने दृश्य असे बदलते
तर मनाच्या वेगाने जग किती बदलत असेल – ( फोटो ).

पुन्हा उत्तर-आधुनिक ---

रूम नं. १३

ले ० दिग ० दिलीप वेंगुर्लेकर, निर्मिती – पी डी ए  , पुणे.

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणे या संस्थेने माझी चार नाटके पूर्वी सादर केलेली आहेत – नाणेफेक, एक गगनभेदी किंचाळी, सामसूम आणि जिंदगी ख्वाब  है. त्यामुळे, अर्थातच मला या संस्थेबद्दल आत्मीयता आहे. तर ते असो.

कालच मी उत्तर-आधुनिक या विषयावर लिहिले तर आज हे उत्तर-आधुनिक म्हणावे असे नाटक ! याच्या नावातला १३ हा आकडा बघून आपल्याला वाटते की शुभाशुभाबद्दल काही असणार ! आणि रूम नंबर वगैरे म्हणजे ते रहस्यमय असणार ! उत्तर-आधुनिकतावाद हा बुद्धिप्रामाण्यवाद नाकारतो, एवढेच इथे सांगून ठेवतो.

आमची मुले लहान असताना आणि पत्नीच्या भाचे-भाचीला मी एक उंटाची गोष्ट सांगत असे. उंटावर बसलेला व्यापारी आणि वाळवंटातून चाललेला उंट. कधी सकाळ, कधी रात्र, कधी वादळ, वगैरे. मग तो उजवीकडे वळे, मग त्याला लांब एक गाव दिसे. तिथल्या हॉटेलात जाऊन तो उंटाला चारापाणी करे, मस्त आंघोळ करे, वगैरे. पुन्हा सकाळी सुरू. अनंत गोष्ट. मुले रंगून जात. ते सगळे आता मोठे झाले आहेत पण अजूनही त्यांना ती उंटाची गोष्ट आठवते ! तसेच हे नाटक. तुम्हाला गुंगवल्याशी मतलब. तर्क वा कथेचे गांभीर्य वगैरे शोधायचेच नाही.
" ओहोटी लागली की कळते कोण कोण कपड्यांशिवाय पोहत होते, ते ! " तुम्ही सवयीने जरा हसाल पण याचा काही गंभीर अर्थ असावा असे समजून विचारात पडाल. इथे तुम्ही फसाल. या नाटकात अर्थबिर्थ लावत बसायला मनाई आहे. आणि तरीही आपल्या जगण्याचा असाच तर आहे पट हे जाणवून तुम्ही घरी जाताना पुन्हा एकदा हसाल.
उत्तर-आधुनिक चे म्हणणे आहे की सत्यबित्य, सखोलबिखोल, मूल्यात्मक वगैरे असे काही नसते. आपले जगणेही निरर्थक आणि उथळ असते, तशीच कलाही उथळच असते ! काही विनोद चांगले आहेत, काही हालचालींतून विनोद घडतात, पण, बरेचसे विनोद तुमच्या-आमच्यांतले हौशी विनोदवीर करतील तसेही आहेत ! कुछ फरक नही पडता. पहिलाच प्रयोग होता, सफाई येत जाईल. कंप्लीट तथ्यहीन, उथळ, उत्तर-आधुनिक नाटक ! हे निश्चितच समजून-उमजून उत्तर-आधुनिक म्हणून लिहिलेले नाटक नाही. हा काळाचा महिमा आहे. या काळाने त्याची प्रतिकृती या नाटकातून सादर केलेली आहे.
कलाकार सगळे नवीन आहेत, पण, नवखे आणि कच्चे नाही वाटले. वेंगुर्लेकरांनी छान कामे करून घेतलेली आहेत. त्या बबनच्या साथीदार झालेल्या मुलीला अजून खूप मजा करणे शक्य आहे. तिने नाटकात जरा जास्त गुंगून जाणे आवश्यक आहे. बाकीचेही अधिकाधिक सफाई आणत जातीलच.
नेपथ्य, प्रकाश, संगीत नाटकाची रंगत वाढवण्याचे काम करतात.
हे नाटक प्रायोगिक आहे की व्यावसायिक ? प्रायोगिक समजून चौकोनी चेहरे करून नका जाऊ. मजा म्हणून जा आणि आपल्याच जगण्याची झेरॉक्स पाहून खुश व्हा !
या भवसागरात आपणच पोहत आहोत – हे नाटक म्हणजे त्या सागरातली ओहोटी आहे ! यावरून काय समजायचे ते समजा !
पी डी ए झिंदाबाद !
--- ००० ---

छान -- खूप शुभेच्छा ! ( अमेरिकेतल्या ढोलताशे ला ).

प्रयोगाच्या माहोलाचे फोटो –
आनंद आहे ---

" विचारांची लढाई विचारांनीच लढायची " -- म्हणजे काय रे भाऊ ?

इंग्रजी ' ढोलताशे ' ची धामधूम –

Opening night - full house & standing ovation for DHOL TASHE!  Do not miss this 'Killer Show'! Two more shows this weekend!! Saturday & Sunday at 2pm.

And 3 shows next week ( Thursday, Friday and Saturday)

Get your tickets now at www.badco.art/tickets ( क्लिप सह ).

' मन ' विषयक –

हा एक एकपात्री दीर्घांक आहे -- जो नीट करेल तो नटसम्राटच !

वर्धन कामत ची जाहिरात.

आजचे –

हा एकपात्री दीर्घांक सादर झाल्याचे हे एकच उदाहरण -- अनेकांनी प्रयत्न केले आणि मध्येच सोडून दिले -- आता सध्याही एक प्रयत्न सुरू आहे -- तपशील नंतर सांगेन -- चालू असलेल्या प्रयत्नाला अर्थातच शुभेच्छा !

ढोल बाजे

Dhol Tashe viewers responses.

Audiences are loving it. You will too.

4 more shows to go.

Tickets: www.badco.art/tickets

Solid -  The New Age Theater Bay Area Drama Company

"Traveling is a fool's paradise."

–Ralph Waldo Emerson

' ढोलताशे ' उत्सव पुढे चालू --

Few onstage images of our English play Dhol Tashe.

3 shows done, 3 more to go ( Thursday - 8 pm, Friday - 8 pm, Saturday - 2 pm)

Tickets : www.badco.art/tickets.

Pear Theater mountain view

Pictures by Basab Pradhan

Solid - The New Age Theater Bay Area Drama Company Roshni Datta Krishna Das Prathyay Bhandarkar Vaishnavi Sridhar Rita Bhatia Champra Deshpande Sandeep K Belliappa Mugdha Manerkar The Pear Theatre

एखाद्या छोट्या तपशीलाचाही कसा होतो विचार ---

Story of a Tubelight:

Often overlooked in the spectacle of a dramatic performance are the minute details that go unnoticed. The success of a play truly lies in the unassuming hustle and dedicated efforts of the cast and crew.

As the director of the ongoing play, "Dhol Tashe," I desired to incorporate tube light as a symbolic prop, representing a middle-class Indian home. This seemingly insignificant element, often overlooked as part of the household, holds immense significance in bringing life to the living room.

The Tubelight's illumination made the stage overly bright. No extra screens were available to reduce the intensity. Despite agreeing to leave the prop as is, I was disappointed, which my co-founder, Sandeep K Belliappa, noticed. This decision resulted from many trials and errors.

The next evening, Sandeep K Belliappa worked with the lighting crew, who were unfamiliar with using parchment paper. Despite their skepticism and warnings against his method, he remained steadfast. Before abandoning the idea completely, he made a final attempt, asking me to bring some parchment for the crew to experiment with. To reduce the intensity of the tube light, we wrapped it with multiple layers of parchment paper, and voila!

It created the desired effect, reducing the light's intensity. The tube light now blended seamlessly with the other set elements, resulting in a beautifully lit living room area. Sometimes, giving up in the face of a problem is tempting. However, the solution often emerges unexpectedly if you give it enough time to marinate and think it through.

3 more shows to go [Thursday - 8:00 pm PST, Friday - 8:00 pm PST, Saturday - 2:00 p.m PST]

Tickets: www.badco.art/tickets

जगणे

आपण ज्यांना कलाकृती म्हणतो अशी बरीच नाटके, चित्रपट, एखादी मालिकाही मी त्यातले काहीही मनाला लावून न घेता पाहू शकतो. पण, तरीही, तशाही कलेत क्वचित काही मानवी दु:खाचे वा अगतिकतेचे असे काही क्षण येतात की माझे डोळे पाणावतात. त्या कलेचे अंतरंग, त्यातले कौशल्य हे माहीत असूनही हे घडू शकते. त्यात अर्थात तिथल्या नटनट्यांचीही  कमाल असतेच. विद्याधर ( बाप्पा ) जोशी या माझ्या नट मित्राचा हा व्हिडियो बघताना त्याच्या अभिनयाच्या पूर्ण अनुपस्थितीतही माझे डोळे पाणावले. मराठीतला हा एक उत्तम अभिनेता कोणत्या भयानक संकटातून गेला हे ऐकता-पाहताना खरोखर भावनिक व्हायला झाले !

बाप्पाने माझ्या ‘ ढोलताशे ‘ या नाटकात एक महत्त्वाची भूमिका केली होती. एका बाजूला जरा गंभीर असा नायक आणि दुसऱ्या बाजूला हा जरा उथळ असा त्याचा चुलत भाऊ, असा तो प्रकार होता. बाप्पा अक्षरश: धमाल मजा आणायचा. नंतर कालांतराने हे नाटक भद्रकालीने व्यावसायिकवर आणले तेव्हा त्यांतल्या एका प्रयोगाच्या वेळी तो भेटला होता. त्यात अभिजित गुरु बाप्पाने केलेली भूमिका करत होता. त्या दोघांचे काही क्षण झालेले बोलणे मला सुखावून गेले होते. मी असे झाले होते, तसे झाले होते, असे म्हणतोय म्हणजे हा काही स्मृतिलेख नाहीय. बाप्पा आता चांगला छान आहे – त्याचे बोलणे तर अगदी ना-फरक पाहिल्यासारखेच आहे. अर्थात त्याला पूर्ण बरे होऊन पहिल्या जोमाने काम करायला कदाचित काही काळ  जावा लागणार, असे दिसते. तो गेलाच असता पण आहे याच्या आनंदात मी हे लिहीत आहे. मी इथे खाली दिलेल्या लिंकवर सौमित्र पोटेने घेतलेली बाप्पा आणि त्याची पत्नी वैशाली यांची मुलाखत बघा म्हणजे मी असे भरभरून का लिहू पाहतोय ते कळेल. सगळे नीट चाललेले असताना, चालताना आपल्याला दम लागतोय हे कळणे, मग हळूहळू ते वाढत जाणे, मग तपासणीत असे निघणे की फुफ्फुसात एक पॅच आहे आणि मग कळणे की हा पॅच अशा रोगाचा आहे की ज्यावर काहीही उपाय उपलब्ध नाही, आणि आता तो फक्त वाढत जाणार, किती गतीने वाढेल हेही नक्की नाही ! म्हणजे कधीही निरोप समारंभाची वेळ येऊन ‘ जय हिंद ‘ म्हणावे लागणार – असे संकट !  मग कळणे की यावर एकच मार्ग म्हणजे फुफ्फुसाचे प्रत्यारोपण ! हे कळल्यापासूनचे सगळे तुम्ही प्रत्यक्षच ऐका. असंख्य गोष्टी जुळून आल्या आणि बाप्पा वाचला ! या काळात, ज्यांना उत्तरे नाहीत असे खूप प्रश्न पडत असतात – त्यांची कल्पना करून पाहा. जगणे म्हणजे नुसते वैज्ञानिक दृष्टिकोण असला की झाले, असे नसते. जगण्याचा आणि तत्त्वज्ञानाचा / अध्यात्माचा अति-महत्त्वाचा संबंध असतो हे समजावे असा हा सगळा प्रकार आहे.

एका ठिकाणी बाप्पा म्हणतो की श्वास घेता न येणे याच्यासारखी भयानक गोष्ट नाही. इथे मी थोडे माझेही सांगतो. एरवी मी फारसे कुठे बोलत नाही असेही काही सांगतो. माझ्या वयाच्या सुमारे तिसऱ्या वर्षापासून मी एक अट्टल दमेकरी होतो. बालपण त्यातच करपून गेलेला असा मी माणूस आहे. माझ्याही अनेक तपासण्या, भविष्यवेत्ते वगैरे झाले होते. एका अद्ययावत सर्व मशिनरी असलेल्या ठिकाणी माझ्या तपासण्या झाल्या तेव्हा त्याचा निष्कर्ष असा आला होता की याच्यात शारीरिक दोष काही नाही, हा याचा मानसिक रोग आहे ! ते ऐकून मला राग आला होता, पण ते खरे असणार. मीही अनेकदा जगतोय की मरतोय या लेव्हलला जाऊन आलो होतो. त्यामुळे, श्वास घेता न येणे म्हणजे काय हे मी फर्स्ट हँड जाणतो. एकच अनुभव सांगतो. तेव्हा मी बहुतेक शाळेत असेन. नित्य नियमाप्रमाणे मला आला अटॅक. त्या वेळी डॉक्टर घरी येत असत. त्यांना वडिलांनी आणले बोलावून. बाकी तसे सोपे असायचे.

एक अड्रिनलीन नामक इंजेक्षन दिले की झाले ! जादुई इफेक्ट ! याला पाच मिनिटांपूर्वी इतका त्रास होत होता हे कुणाला खरेही नाही वाटणार. तर ते इंजेक्षन देऊन डॉक्टर गेले, तर पुन्हा थोड्या वेळाने तसाच तीव्र अटॅक ! पुन्हा डॉक्टर आले. ते गेल्यावर पुन्हा तेच. तिसऱ्यांदा ते आले तेव्हा मात्र ते म्हणाले की हा घाबरलेला आहे, त्यामुळे मनाने पुन्हा पुन्हा अटॅक आणतो आहे, आता याला झोपेचे इंजेक्षन देऊन झोपवावे लागेल ! तर, सारांश, हम भी जानते हैं इस जन्नत की हकीकत !

पण नंतर मी यातून जवळ जवळ पूर्ण बाहेर पडलो. एक तर मुंबई सोडणे उपयोगी पडले पण मुख्यत: स्वत:च्या मनाकडे पाहणे, पडणारे प्रश्न समजू शकतात का यासाठी मिळेल ते, मुख्यत: आध्यात्मिक, वाचणे वगैरे मी करत गेलो. मग, या पुरोगामी महाराष्ट्रात बोलू नये असे एक रहस्य मला उलगडले ! मेंदू ट्रान्सप्लांट नव्हे तर ट्रान्सफॉर्म होऊ शकतो ! ते काही एखादा कोर्स करून प्रमाणपत्र मिळवणे नसते तर प्रत्येक वेळी नव्याने घडावे लागते. त्याने खूपच फरक पडला. मी क्लेम काहीच नाही करणार, न जाणो, माझा शेवट पुन्हा त्याच अ-श्वास अवस्थेत होऊ शकेल. पण गेली कित्येक वर्षे मला या त्रासामुळे एक दिवसही पडून राहावे लागलेले नाही. मी फिट आणि खुश आहे ! या एकूण प्रकारावर आधारित माझे एक नाटक आहे – ‘ जणू काही वास्तव ‘. त्या नाटकाचा पाया हे मला दिसलेले रहस्य आहे. खरे तर इथे असले अबौद्धिक नाटक कुणी हातातही धरणार नाही. ते धाडस गिरीश पतकेने केले आणि ‘ आविष्कार ‘ ने त्याच्यावर विश्वास टाकला. त्या वेळी ते नाटक जरा बराच पसारा टाइप होते, आता ते नीट, आटोपशीर केलेले आहे.

आता इथे आणखी एक लिंक मी तुम्हाला देणार आहे. ती म्हणजे स्कॉर्पियो चे उत्पादक महिंद्र यांची. त्यांची मुलगी एक वर्षाची असताना तिच्यावर आलेल्या संकटाची ही कहाणी आहे. अपघातात अधू झालेल्या तिच्या हातावरील उपचारासाठी ते लंडनला गेले, तिथून पॅरिसला गेले. तर तिथला तो महान डॉक्टर म्हणाला, तुम्ही भारतातून आला आहात ना, मग आम्ही ज्यांचे चेले आहोत ते डॉक्टर जोशी मुंबईत आहेत, त्यांच्याकडे तुम्ही जा. ते डॉक्टर जोशी, महिंद्र यांच्या ऑफीसपासून दहा मिनिटांवर होते ! स्त्रियांच्या ब्रेसियरला असतात तसले दोन हुक वापरून काही युक्तीने त्यांनी त्या मुलीवर उपाय केला ! खर्च फक्त रुपये दोन ! ती मुलगी आता उत्तम पियानो वाजवते ! या घटनेतच स्कॉर्पियोच्या निर्मितीचे बीज कसे आहे ते मुळातूनच ऐका.

आपल्याला मूलभूत प्रश्न पडावेत असे प्रसंग आपल्या आयुष्यात येत असतात. पण, शक्य तो त्याकडे दुर्लक्ष करून, ते दडपून जगत राहणे हीच आपली निवड असते. यात कोण कुणाला काय शिकवणार ?

त्या दोन लिंक्स ---

https://www.youtube.com/watch?v=XRbprwgjEpI

आणि ---

https://web.whatsapp.com/

--- ००० ---

WEB.WHATSAPP.COM

web.whatsapp.com

अमेरिकेत घडलेले पुणेरी ' ढोलताशे ' ! ---

A few pics from today's show. Thank you for supporting Dhol Tashe Solid - The New Age Theater and Bay Area Drama Company . Today's show was a sold out event . We have 2 more shows.

Friday: 8:00 p.m PST

Saturday : 2:00 p.m PST

Tickets : [www.badco.art/tickets](http://www.badco.art/tickets)

अमेरिकेत ' ढोलताशे ' ची धूम –

--- प्रयोग हाऊसफुल .

रस्त्यात थांबवून माझ्याशी दोन शब्द बोलावे असे काही व्यक्तींना वाटते -- बहुधा या व्यक्ती थोड्याफार ' सटकलेल्या ' असतात !

धक्का

परवा एकटाच कुठेतरी चाललो होतो. तेवढ्यात मध्येच एकजण स्कूटरवरून आला आणि माझ्याजवळ थांबला. इथे ' साई शिल्प सोसायटी ' कुठे आहे हो ? -- असे त्याने मला विचारले. म्हटले, इकडून डाव्या हाताला वळून पुढे जा -- तुमच्या डाव्या हाताला तीन मिनिटांवर दिसेल. धन्यवाद म्हणून तो जाऊ लागला, पण थांबला. " चंप्र का ? " त्याने विचारले. मी चंप्रच असल्याने हो म्हणालो. " तुम्ही इकडे राहता काय ? छान झाले -- भेट झाली -- " तो म्हणाला मग मीही म्हणालो, वा, धन्यवाद ! त्या माणसाला हा एक सुखद धक्का वाटला असावा, असे दिसले. पण, मला हा त्याच्याहून भारी धक्का होता ! च्यायला, इतकी वाढलीय का काय आपली लोकप्रियता की जातायेता सहज रस्त्यातही कुणी ओळखावे ? ! -- आपल्याला पत्ताच नाही याचा ! याचा मला धक्का बसला होता ! या सुखद धक्क्यात मी पुढे गेलो !

--- ००० ---

माझ्या आधी माझ्या नाटकाने अमेरिका पाहिली ! --- ( अनेक फोटो ).

Thank you for the sold out show Dhol Tashe yesterday. We have one last show today at 2 p.m PST.

8 tickets left. Tickets : www.badco.art/tickets.

Solid - The New Age Theater Bay Area Drama Company Sandeep K Belliappa Krishna Das Roshni Datta Champra Deshpande Prathyay Bhandarkar Vaishnavi Sridhar Rita Bhatia Mugdha Manerkar Sumanth Shantaram

' चार्जुन ' असे गीतेत अनेकदा येते म्हणे -- म्हणजेच ती ४ जूनला सांगितली गेली असे विद्वान म्हणतात ! म्हणूनच ४ जून हा हिंदू मुहूर्त ! ( ४ जूनला निवडणुकीचे निकाल आहेत ).

खूपच आवडलेले दिसतेय हे नाटक तिकडे -- छानच ! ( पुन्हा हाऊसफुल ).

सहावा प्रयोग –
Thanks to Solid - The New Age Theater to have me at their finale performance of DHOL TASHE, yet another spectacular production from Megha Herur and her team

टपून आहेत
पक्षोपक्षींचे
सखाराम बाइंडर !

तिकिटे न मिळालेले नाराज लोक कितपत पावरफुल ठरतील त्यावर निवडणुकांचे अंतिम निकाल अवलंबून आहेत !

"Dhol Tashe" is an extraordinary theatrical masterpiece that captivated me from start to finish, leaving me utterly spellbound for its entire 90-minute duration. This play skillfully navigated the intricate realms of politics, religion, and culture with a delicate touch, seamlessly weaving them together to deliver a subtle yet impactful message. This nuanced approach added layers of depth to the narrative, allowing for a rich and thought-provoking experience. The play had just enough humor to keep things fun and lively.
Moreover, the theater setup itself played a pivotal role in enhancing the overall immersion. Every element, from the set design to the lighting, contributed to creating an atmosphere that enveloped the audience completely. As a front row spectator, I felt transported into the world of the play, fully engaged and emotionally invested in every moment.
And let's talk about the actors! How on earth did they pull off those intense dialogues with such deep expressions flawlessly? It was like they were living their roles. I was completely hooked on every word they said. In a production filled with

standout performances, Roshni Datta's talent shone the brightest. Her portrayal added layers of depth and emotion to an already captivating story.
"Dhol Tashe", presented by Solid - The New Age Theater, was an incredible play that left a lasting impression on me. If you get the chance to see it, don't miss out!

अप्रत्यक्षपणे मदत करणारे -- हीही लोकशाहीतली एक संवैधानिक आणि लोकमान्य शक्ती असते !

" विचारधारा नसेल तर माणसाने राजकारणाच्या फंदात पडूच नये. "
-- ब्रिटिश नंदी, सकाळ.

उत्तम झाला कार्यक्रम ! राहुल पुंगलिया जे बोलले ते अद्वितीय, अति-महत्त्वाचे वाटले !
( मनोज पाठकाच्या ' अधिसत्ता ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन ).

लौकरच उपलब्ध होईल --- ( नाणेफेक ).

एका राशीचे भविष्य ---
व्हिसाची कामे होतील !

गिरीश रांगणेकर या माझ्या मित्राने केलेली एक उत्तम कामगिरी ---
( रोड सेफ्टी या विषयावर सांगली आर टी ओ साठी फिल्म ).

काठी

सकाळी फिरायला बाहेर पडलो होतो. येताना माझी सूर्याकडे पाठ होती. समोरून येणाऱ्यांवर ऊन पडत होते. ठीक होते वातावरण. तेवढ्यात समोरून एक सुमारे माझ्याच वयाचा माणूस मला येताना दिसला. त्याच्या हातात एक चकचकीत चॉकलेटी पॉलिश असलेली काठी होती. ती तो त्याच्या डोक्यावरून कलात्मकतेने फिरवत होता. ती मस्त चमकत होती. मी घाबरलो. पूर्वी एका वेड्याने निष्कारण त्याच्या हातातला पट्टा फिरवत बक्कलच्या बाजूने माझ्या डोक्यात हाणला होता. आठ टाके पडले होते ! मोठा उपद्व्याप झाला होता. हाही तसाच तर नसेल ? काठी मस्त चमकतीय साल्याची ! करावे काय ? म्हटले आपण पूर्ण सावध राहू. काही नाही होणार. तो जवळ आला तशी त्याने काठी थांबवली आणि ती एका हातात घेतली. दुसऱ्या हाताने माझ्याशी हस्तांदोलन करत तो हसत म्हणाला, " बऱ्याच दिवसांनी दिसताय – ठीक आहात ना ? " " उत्तम ! " मी म्हणालो. " भूक लागतीय ना ? झोप लागतीय ना ? " त्याने विचारले. मी अत्यानंदाने, " हो " म्हणालो. मग, पुढे म्हणालो, " एकमेकांबद्दल आपण सदिच्छा ठेवायच्या

– बाकी चिंताच नाही करायची ! – “ यावर तो माणूस मस्त हसला. “ बरोबर आहे – “ असे म्हणून, हसून, पुन्हा काठी फिरवत तो पुढे गेला. तो जरा लांब जाईपर्यंत मी लक्ष ठेवले.

हल्ली सालं वेडा आणि शहाणा यातला फरकच कळत नाही – असे मनाशी म्हणत मीही निघालो.

--- ००० ---

माणसाला नुसतीच बाह्य परिस्थिती नसून एक मनही असते, हे समजणे हा चांगल्या कलेचा पाया असतो.

अधिसत्ता ( कविता )

कवी ० मनोज सुरेंद्र पाठक, प्र ० पोएट्रीवाला पेपरवॉल पब्लिशिंग.

या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती २००६ साली निघाली होती आणि अलीकडेच २०२४ मध्ये त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. मनोज स्वत:च्या कवितांबद्दल अनेकदा किरकोळीत बोलताना दिसत असला तरी तिकडे दुर्लक्ष करून वाचाव्यात अशा या कविता आहेत. या पुस्तकाच्या परिशिष्टात राहुल पुंगलिया म्हणतात, “ या कविता चांगल्या आहेत कारण मनोज पाठक आपल्या व्यक्तिमत्वाची लुडबुड कवितेमध्ये होऊ देत नाही. आपल्या भावना व विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी कवितेची सबब त्याला गरजेची नाही. “  कवीच्या व्यक्तिमत्वाचा म्हणजे त्याच्या भूमिकेचाच गौरव करत राहणाऱ्या आणि स्वत:ची सुखदु:खे व मते एवढेच कवितेचे क्षेत्र सीमित समजणाऱ्या मराठी कवितेत त्यामुळे ही कविता वेगळी ठरते.

या संग्रहातल्या मनोजच्या ईश्वरविषयक कविता हा एक वेगळा चर्चेचा विषय ठरू शकतो. काही तथाकथित धार्मिक मासिकांतून येणाऱ्या कवितांसारख्या या घिस्यापिट्या कविता नाहीत. ईश्वर हा स्वीकारलेला वा नाकारलेला नसून तो ‘ अनोळखी ‘ असण्याच्या या कविता आहेत. तरीही या विषयाला त्याच्या मनात स्थान आहे. मनाचे सगळे मटेरियल हे वैज्ञानिक पद्धतींनी घडत नसते. असंख्य संस्कार, प्रभाव, परिस्थिती आणि कदाचित जनुक रचनाही यांच्या एकत्रित योगाने हे घडत असते. मनोज, त्याच्या जगण्यातले हे ईश्वरी अस्तित्व स्वत:च्या वा वाचकाच्या माथी श्रद्धेच्या रूपात मारत नाही. या नुसत्याच प्रतिक्रिया नसून ते ‘ पाहणे ‘ ही आहे. एका ठिकाणी तो म्हणतो,

कंटाळून तुझ्या असण्यानसण्यासकट
मी तुला स्वीकारतोय
हे हरामखोर ईश्वरा

दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणतो,

तुझ्या असण्याने
आशेचे घोडे
दौडतात थकतात

म्हणजे एकरूपता नाहीच. मनाच्या इतर असंख्य कृतींमधल्याच याही कृती आहेत.

या संग्रहातल्या, ‘ तुकडे जुळवताना येवो मरण ‘, ‘ अन्न ‘, ‘ आई दुबोध होत जायची दिवसेंदिवस ‘, ‘ एक संपूर्ण सशक्त अवयव ‘, आणि ‘ मित्रांच्या आले लक्षात ‘  या कविता अधिक एकसंध वाटल्या. काही कवितांत मनोजचे भान

ढळते आणि कवितेचा आशय नीट व्यक्त होत नाही, असे वाटले. ‘ मित्रांच्या आले लक्षात ‘ ही कविता तर एकूण जगण्याचा भेदक गोषवाराच पाहणारी आहे. ‘ अन्न ‘ ही कविता बघा –

मी लिहितोय म्हणजे
कुणाशी बोलतोय ?
किंवा हे जे प्रश्न उभे राहतात भुवया उंचावून
ते कुणाला मागत असतात उत्तरं ?
किंवा सालोसाल मी करतोय काय
या मित्र हरवत चाललेल्या जगात ?
किड्या-मुंग्यांनी ओढून न्यावे
आपल्या सजातीयाचे कलेवर
तसे ओढत नेतो आहे
मी कुणाला ? कशासाठी ?
की आता तेच आहे अन्न
पुढच्या प्रवासासाठी ?

--- ईश्वर असो की माणसे की वस्तू की निसर्ग, प्रत्येक नात्यात स्वत:चे अलग पडत जाणे हा या कवितांचा स्थायीभाव दिसतो. विशेष म्हणजे हा भाव इथे व्यक्तिगत वैशिष्ट्याच्या रूपात येत नसून जणू एका निरर्थक पाहण्याच्या दृष्टीतून येतो. हे मराठीत वेगळे आहे.

--- ००० ---

लौकरच -- एक एकपात्री दीर्घांक – ‘ मन ‘ –

Champra Deshpande यांचा " मन " हा एकपात्री दीर्घांक मला कळल्यापासून मी तो सादर करण्याचा प्रयत्न करीत राहिलो आहे. अजूनही मनात आहे - पण आजपर्यंतचा अनुभव असा की बरेचसे नट हा दीर्घांक अर्ध्यावर सोडून निघून गेले. कारण मन हा दीर्घांक शिवधनुष्य आहे.

मग मी अनेक पात्रांना घेऊन तो दीर्घांक " मनाचे शोक " या नावाने काला घोडा फेस्टिवलला केला. एकच प्रयोग झाला. चांगला वाईट असं पाहिलं गेलं तर वाईट नव्हता झाला प्रयोग.

काल एका ग्रूपवर वाचलं की अभिजित झुंजारराव त्या दीर्घांकाचा प्रयोग करतो आहे. हा दीर्घांक करण्याचं मनात येणं ही मुळात ग्रेट गोष्ट आहे. मन दीर्घांक एकपात्री आहे. पण मन अनेकपात्री असतं. ते पात्र कोण करतंय माहीत नाही. पण जो कुणी तयार झाला त्याला सलाम.

हा दीर्घांक अभिनेत्याने पेलायचा आहे. अभिजित झुंजाररावच्या अभिनय कल्याण या संस्थेला या दीर्घांकाच्या सादरीकरणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. --- रवीन्द्र दामोदर लाखे.

स्वातंत्र्यवीर सावरकर ( २०२४ )

हा चित्रपट पाहिला.

रणदीप हुड्डा चा आवाज आणि अभिनय उत्तम.

त्याने घेतलेले कष्टही जाणवतात.

पण

एकाच पोतडीत खूप गोष्टी कोंबण्याचे प्रयत्न

आणि सतत वाजणारे अति-भव्य पार्श्वसंगीत

या दोन गोष्टी या चित्रपटाला मारक ठरलेल्या आहेत.

बाकी राहिला प्रश्न इतिहासाचा.

इतिहास कधीच माझ्या आवडीचा विषय नव्हता आणि नाही.

निदान दोन महायुद्धांचे तरी नीट अभ्यासून डोक्यात साठवून ठेवावे म्हणून मी अनेकदा प्रयत्न केले.

ते फेल गेले.

मी ‘ इराक ‘ हे नाटक लिहिले तेव्हा त्या विषयाचा खूप अभ्यास केला होता.

ते नाटक माझ्या मते उत्तम लिहून झाले पण आता ते तपशील गेले आहेत डोक्यातून.

सारांश, इतिहास हा माझा विषय नाही.

त्यासाठी भले भले जंगी पैलवान खूप आहेत आपल्याकडे !

--- ००० ---

१९५८ साली येऊन गेलेल्या ' साधना ' या चित्रपटातला एन. दत्ता यांच्या जबरदस्त संगीताने नटलेला नृत्यसम्राज्ञी वैजयंतीमाला यांचा बेफाम नृत्याविष्कार ---गायिका ग्रेट लता मंगेशकर ---
‘ कहो जी तुम क्या क्या --- ‘ .

हवी तशी कॉमेंट देणाऱ्याकडे, तिला दिलेले उत्तर वाचायचा सभ्यपणाही असायला हवा, असे वाटते.

इवलेसे रोप ( दोन अंकी नाटक )

ले ० आणि दिग ० सई परांजपे, निर्मिती -- खेळिया प्रॉडक्शन्स, मुंबई.

“ ते रोप कशासाठी होते नाटकात ? त्याला इवलेसे का म्हटले ? “ असे प्रश्न प्रेक्षकांना पडले नाहीत. अगदीच सरळ माहितीच्या रूपात नसलेले आणि उलगडून न सांगितलेले प्रेक्षकांनी स्वीकारले, हे छान वाटले. नुसताच थोडाफार जाणवू शकणारा असा अर्थ काहीसा वास्तववादाच्या पुढे गेल्याचे समाधान वाटले. एका साध्या, सामान्य जोडप्याचे हे नाटक. आता दोघेही वयस्कर आहेत पण त्यांचा काही भूतकाळही त्यांच्या बरोबर आहे. वर्तमान आणि भूतकाळ यांत हे नाटक हेलकावत राहते. तीच दोन पात्रे आलटून-पालटून तरुण व वृद्ध अशी दिसत राहतात. मंगेश कदम आणि लीना भागवत यांच्या उत्तम अभिनयाबरोबरच त्यांची वयबदलातली सफाईही दिसत राहते. बाकी रूटीन

असलेल्या आयुष्यात दोनच जरा धक्कादायक म्हणाव्यात अशा घटना घडलेल्या असतात. ( कोणत्या ते नाही सांगत ) नाटक तसे त्या दोघांच्या मृत्यूपर्यंत जाते पण विशेष म्हणजे चक्क एक नाट्यगत खोटेपणा वापरून शेवट गोड होतो ! या नाटकातले सौम्य नाट्य, हलकेसे विनोद आणि विशेषत: इतकी वर्षे टिकलेल्या पति-पत्नी आसक्तीची दृश्ये यांमुळे हे एक गोड, गुलाबी, रोमँटिक नाटक प्रेक्षकांना खुश करत राहते. या नाटकातले रोप आणि शेवटाकडचा नाट्य माध्यमाचा उपयोग हे छान वाटले. आयुष्यात काही घटना घडून गेलेल्या असल्या तरीही त्यांचे प्रभाव टाकून देऊन जगता येऊ शकते, अशा जाणिवेचा शेवट छान वाटला.

लीना भागवत आणि मंगेश कदम हे कसलेले कलाकार आहेत. प्रदीप मुळ्ये यांचे जादुई सादरीकरणासाठीचे आसान नेपथ्य, सुंदर प्रकाश योजना आणि सौम्यसे साजेसे संगीत ! या सर्वांमुळे, भडक नाट्य नसलेला हा प्रयोग प्रेक्षकांना आवडत जातो.

एका साध्या हलक्याफुलक्या वातावरणात, काही आव्हानात्मक आशय वा थोडक्यात म्हणजे ‘ डोक्याला ताप ‘ नको असेल तर  छान आहे हे नाटक. थकल्या-भागल्या मराठी प्रेक्षकांना हे नक्कीच सुखावत राहील.

तसे हे नाटक म्हणजेही एक इवलेसे रोपच आहे.

--- ००० ---

## पुरोगामी आणि अभिव्यक्ती

पुरोगामी लोक हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे भोक्ते असतात, हे आपल्याला अनेकदा दिसते. पण त्याचबरोबर त्यांच्या मतांपेक्षा वेगळी मते वा आकलन-प्रक्रिया असणाऱ्यांना पाहिले की ते बिथरतात, हेही दिसते. त्यांची जणू सुरक्षितताच धोक्यात येते. या भीतीतून ते लगेच हल्ले सुरू करतात. अपशब्द वापरू लागतात. एखादा लेखक ‘ वेगळा ‘ असेल तर त्याला ते बोटचेपा, पळपुटा, कुंपणावरला, भित्रा, ब्राम्हणी, असे काही म्हणू लागतात. त्यांच्यांतले असले आंतर्विरोध हा विषय वेगळा आहे. इथे मुख्यत: कला-साहित्य-संस्कृती या क्षेत्रांतल्या सर्जक प्रक्रियांबद्दल बोलायचे आहे. कला ही फक्त परिवर्तनाचे साधन असते एवढेच पुरोगाम्यांचे कलेबाबतचे संकुचित ज्ञान असल्याने त्यांचे लक्ष फक्त बाह्य परिस्थितीवर असते. मानवी मनाच्या कृती आणि त्याच्या समस्या यांकडे त्यांचे दुर्लक्ष होत असते. याचा परिणाम असा होतो की दलित-पीडित-वंचित यांचे अनुभव आणि वास्तववाद यांपलिकडचे सर्व कलाक्षेत्र हे असंवेदनशील, आपमतलबी लोकांचे असते, असे ते समजतात. मनाच्या अवस्था, समस्या, प्रक्रिया यांचे भान घेण्यातून येणारी सर्जक प्रक्रिया ही पूर्ण मानवात परिपक्कता निर्माण करणारी आणि पर्यायाने प्रेम आणि सौहार्द यांची निर्मिती करणारी असते, हे त्यांना समजत नाही. त्यामुळे, कलाक्षेत्रात बदलत जाणाऱ्या अभिव्यक्ति-पद्धतींचे त्यांना काही देणेघेणे नसते. त्यांना वास्तववादापलिकडे काही कळत नाही. आधुनिकता, उत्तर-आधुनिकता, अतिवास्तववाद, न-कविता वा न-नाट्य, मृषा ( अब्सर्ड ) कला, अमूर्त कला, अशा सर्व गोष्टींपासून ते फटकून असतात. इंटरेस्टच नसते. त्यामुळे, त्यातले काही कळतही नाही. याचा राग ते ‘ इतर ‘ लेखक-कवींना असंवेदनशील म्हणून काढतात.

संख्येच्या बळावर, साहित्य-कला यांचा असा तिरस्कार असूनही ते या क्षेत्रातल्या मोक्याच्या जागा पकडून बसलेले असतात. ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होतात पण साहित्याची कवडीची समज व्यक्त न करता राजकीय भाषण

ठोकून निघून जातात. पुस्तके कोणती विकत घ्यावी, कोणती अभ्यासाला लावावी, कशावर परिसंवाद घ्यावे वगैरे बाबींवर आणि प्रसिद्धी देण्यावरही त्यांच्या या संकुचिततेचा प्रभाव असतो. त्यामुळे, एकूण भाषेचा समाजातला वापरच अधिकाधिक ढोबळ होऊ लागतो. भाषेच्या सूक्ष्म अर्थांना वाव देणारे लेखन कुणी अभ्यासूही नये आणि तसे निर्माणही होऊ नये, असे त्यांना वाटते. जागतिक वाङ्मयात काय चालले आहे याच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नसते. यांच्या बोलण्यात सहसा, ' वेटिंग फॉर गोदो ' किंवा त्याचा लेखक बेकेट, पिरांडेल्लो, काफ्का, जॉईस, डिकिन्सन, पेसोआ, एवढेच काय शेक्सपियरही फारसा नसतो. इंटरेस्ट नाही, त्यामुळे अभ्यास नाही, त्यामुळे कळतच नाही, अशी अवस्था. या प्रकारात समीक्षा नष्ट होते. साहित्याच्या मूल्यमापनाच्या शक्यताच नष्ट होतात. काही पुरोगामी लेखक धोरणी असतात. ते बाहेर या टोळीत राहतात पण आपल्याला लिहायचे तेच लिहितात. लेखन सतत राजकीय भूमिकेच्या डबक्यात घोळवत ठेवत नाहीत. तरीही पुरोगामी त्यांना स्वीकारत राहतात.

नीट पाहिले असता, असे दिसते की हे तथाकथित पुरोगामी सोडता, अमुक भूमिका घ्या म्हणून इतर कुणी लेखक-कलावंतांवर दबाव आणताना दिसत नाहीत. प्रत्येक चांगला लेखक स्पष्टपणे आपला पाठीराखा असावा असे त्यांनाही वाटते. पण तसे नसेल तर ते प्रत्येक ठिकाणी ढवळाढवळ करत नाहीत. हे पुरोगामी लोकच लगेच लेखक-कलावंतांची व्यक्तिगत मूल्यमापने सुरू करतात. कालपर्यंत ग्रेट असलेला आज एकदम टाकाऊ होतो ! असुरक्षितता आणि न्यूनगंड यांतून त्यांच्यांत एक प्रकारचा आक्रमकपणा येतो. कोणत्याही सत्ताधाऱ्याला इथे गरिबांचे भले केल्याशिवाय सत्तेवर राहताच येणार नाही. पण आम्हीच तारणहार, आम्हीच काय ते भले करणार अशी पुरोगाम्यांची खात्री आणि त्यातून येणारा कट्टरपणा असतो.

या सगळ्या प्रकारात मुक्त अभिव्यक्ती मार खात जाते. समाजाचा सांस्कृतिक स्तर घसरत जातो. मुख्य म्हणजे भाषेच्या शक्यता शोधणे कमी कमी होत गेल्याने भाषा फक्त उपकारापुरती उरते. मराठी माणसांच्या संख्येमुळे जगात या भाषेचा जो नंबर आहे त्याला नसतो धोका पण भाषा बेजान होत जाते.

हा काही एखादा प्रबंध नव्हे. ही आहेत इम्प्रेशन्स आणि अनुभव. हेही पुरोगाम्यांना सहन होणार नाही आणि क्षणात त्यांची सहिष्णुता खतम होईल याची मला जाणीव आहे. हे मुद्दे मी या ना त्या प्रकारे मांडत आलेलोच आहे. मी स्वत: कुणाचाही दबाव घेत नाही. माझे लेखन आवडले नाही की काही लोक लगेच व्यक्तिगत मूल्यमापनावर येणार याचा मला अंदाज असतोच. मी स्वत:ला ना पुरोगामी म्हणवतो ना हिंदुत्ववादी. पण, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म ( धर्म नव्हे ) यांच्या चिंतनात्मकतेशिवाय कला-साहित्य हे व्यापकपणे मानवी जगण्याला प्रस्तुत होत नाही, असे माझे आकलन आहे. या दोन्ही गोष्टींचे पुरोगाम्यांना वावडे असते. तसे वावडे बिगर-पुरोगाम्यांना नसते. कुणा एकाच्या वा कुणा टोळीच्या मताप्रमाणे आख्खे जग होण्याची कदापि शक्यता नाही. हे सत्य समजून घेऊन कला-साहित्य-विचार ही क्षेत्रे मोकळी असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा सर्वांचेच नुकसान आहे.

--- ००० ---

Champra Deshpande यांचं ढोलताशे हे नाटक

प्रतिगामींच्या विरोधात नाहीये नि ते नाटक केवळ पुरोगामी विचार प्रसृत करणारं नाटकही नाहीये. मुळात ते कुठला विचार मांडणारं नाटक नाहीये. --- लाखे.

नाव

एका व्हिडिओत जिथे माझे नाव असायला हवे तिथे ते आलेले नाही. एका ठिकाणी माझे भाषण शब्दांकन करून छापले गेले तिथेही शब्दांकनकर्त्याचे नाव आहे पण माझे, भाषणकर्त्याचे नाही. " चांगले काम हे निनावीच असते " असे मी कधी कधी म्हणत असतो -- ते नियतीने ऐकले असावे !

--- ००० ---

हिंस्र आणि क्रूर

मी लिहिलेले डाव्यांना आवडले तर उजवे म्हणतात, याचा अर्थच मी हिंस्र आणि क्रूर असणार. उजव्यांना आवडले तर डावे मला तेच म्हणतात. म्हणजे आख्खा भारत हिंस्र आणि क्रूर आहे की काय ? हिंस्र आणि क्रूर नसलेली माणसे शोधून त्यांना आवडेल तेच लिहावे म्हटले तर कुणी सापडे ना. करावे काय ?

– ० –

चाणक्य ( दोन अंकी नाटक )

मूळ हिंदी लेखक – मिहिर भूता, मराठी अनुवाद – शैलेश दातार, दिग्दर्शक – प्रणव जोशी,

नेपथ्य – संदेश बेंद्रे, पार्श्वसंगीत- निनाद म्हैसाळकर, प्रकाशयोजना- राहुल जोगळेकर,

रंगभूषा - कमलेश बीचे, वेशभूषा - नीरजा पटवर्धन

निर्माते- सुहास दातार, हरिहर केशव म्हैसकर, प्रसाद व्यवहारे

सूत्रधार - दीपक गोडबोले.

हे सगळे उल्लेख करणे अत्यावश्यक आहे, असे हे नाटक आहे.

इतके भव्य, भरजरी नाटक यापूर्वी मी कधी, कोणते पाहिले होते ते आठवत नाही. विविध दृश्यांचे साजेसे नेपथ्य आणि तशीच उत्तम प्रकाशयोजना यांमुळे सुरुवातीपासूनच भव्यतेचा अनुभव येऊ लागतो. निरनिराळे ध्वनी आणि संगीत यांनी नाटक खुलत जाते. रंगभूषा अगदी ती म्हणजे तीच पात्रे, अशी. विशेष उल्लेख वेशभूषेचा करायला हवा. त्याच काळाचा भास निर्माण व्हावा आणि प्रत्येक पात्राचे त्या समाजातले स्थानही जाणवावे अशी विचारपूर्वक केलेली वेशभूषा आहे. या सर्व पोषाखांची कल्पना करून ते सर्व प्रत्यक्षात आणणे हे खरेच विशेष आहे. थोडक्यात म्हणजे अशा ऐतिहासिक नाटकाला लागणारे सर्व काही उत्तम स्वरूपात इथे आहे.

चाणक्य या विद्वान आणि धूर्त ब्राम्हणाच्या प्रमुख भूमिकेत आहे शैलेश दातार. तो माझ्या एका नाटकाच्या तालमी करत होता त्यामुळे मला माहीत होता. ते काही घडले नाही पण या नाटकातला त्याचा उत्तम अभिनय पाहून छान वाटले. या नाटकाचा एकूणच अभिनय विभागही सशक्त आहे. आणि हे सगळे हाताळणारे दिग्दर्शक प्रणव जोशी ! प्रत्येक दृश्य कसून बसवलेले आहे. या नाटकातले संवाद त्या ऐतिहासिक भव्यतेला शोभणारे आहेत. सर्व पात्रांनी ते सहजपणे म्हणणे यातही दिग्दर्शकाची कमाल आहेच. मूळ नाटक हिंदीतले असून त्याचा चांगला अनुवाद शैलेशनेच केलेला आहे. प्रयोग अर्थातच सुविहीत, छान होतो.

अखंड भारताचे उत्तुंग ध्येय चाणक्याच्या मनात असते. ते तो अनेक प्रयत्न करत, कपट-कारस्थानेही करत कसे पुढे नेत राहतो त्याची ही कथा आहे. लोक साधन-शुचितेबद्दल बोलतात पण इथे ध्येय मोठे असणे हेच महत्त्वाचे मानलेले आहे. त्यासाठी कोणतेही उपाय वापरायला हरकत नाही, असे हे तत्त्वज्ञान आहे. नाटकात, खरे-खोटे, कपट , निष्ठा, विश्वासघात, विषप्रयोग, खून – असे सर्व काही आहे. नाट्यमय घटना आणि नाट्यमय संवाद यांमुळे प्रयोग प्रेक्षकांना पकडून ठेवतो.

हे सगळे ठीक पण हे नाटक प्रचारकीही आहे, हे लक्षात घ्यावे लागते. प्रत्येक कलाकृतीत काही एक राजकीय भूमिका असायला हवी असे म्हणणाऱ्यांची अपेक्षा हे नाटक पूर्ण करते. इथली ही भूमिका अर्थातच सर्वांना पटणारी असू शकत नाही. नाटकाला गर्दी होती आणि त्या उपस्थित प्रेक्षकांनी अनेकदा पसंतीच्या टाळया दिल्या. शिवाय पुण्यातल्या बीजेपीच्या नेत्या मेधाताई कुलकर्णी यांनीही निम्म्या प्रयोगाला उपस्थिती दिली. नाटकाचा जो हेतू आहे तो साध्य होत राहतो हे दिसतेच.

मी स्वत: मात्र प्रचारकी कला नाकारत आलेलो आहे. भूमिका डावी असो की उजवी, कलाकृती प्रचारकी असली की ती एका मर्यादेत फिट होते असे मला वाटते. मानवी जीवनाचा विस्तार पाहणारी, त्याला अमुक एक वळण वा दिशा न देणारी कलाकृतीच एकूणात मौल्यवान असते असे मी मानतो. त्यामुळे मला हे नाटक ग्रेट वगैरे काही वाटले नाही. ठीक वाटले.

नाटकाच्या सुरुवातीच्या भागात चाणक्याच्या तोंडी ‘ विचारव्याधी ‘ असा शब्द येतो. मला तो महत्त्वाचा वाटतो. एकूणच भूमिका आणि राजकीय कट्टरता या विचारव्याधीच असतात. या व्याधीचा समाजातला अतिरेक आपण अनुभवतो आहोत. दोन्ही बाजूंना तपाशीलांचे ढीग, खंडन-मंडनाचे जंगी उत्सव, खऱ्याखोट्याची गरजच नष्ट होणे, चारित्र्यहनन, आणि अनेक प्रकारची हिंसा दिसते – ही पूर्ण समाजाला लागलेली विचारव्याधीच आहे. दोन्ही बाजूंचे लोक म्हणतील की आमची सत्याची, न्यायाची बाजू आहे, हे सगळ्यांनी मान्य करा म्हणजे ही व्याधी जाईल. एवढे भाबडे तर काही घडणार नाही. आपापल्या उत्तुंग ध्येयासाठी सगळे लढतील, साधनशुचिता वगैरे तत्त्वे निरर्थक ठरतील आणि त्यातून जे घडेल ते घडेल. ‘ तुम्ही माझ्या बाजूचे नाही म्हणजे तुम्ही नालायक आहात ‘ असा या सध्याच्या विचारव्याधीचा सारांश आहे. हे वाचून काही बावळट लोक मला विचारतील की, ते ठीक, पण तुमचे मत काय ? माझे उत्तर असे असेल – योग्य वेळी माझ्या दृष्टीने विचार करून ज्याला द्यायचे त्याला मी मत देईन, पण, कलाकृती ही मतवाली असू नये. जगणेही सतत राजकीय घाणीने परिप्लुत नसावे. शेवटी, ज्याचीत्याची मर्जी !

--- ००० ---

प्रत्येक लेखकाने कुणाला काय वाटते आणि कोणतेही फडतूस राजकीय कट्टर कॉमेंटकार काय म्हणतात याची पर्वा न करताच लिहायला हवे !

सगळ्या समस्यांचे बीज माझ्यात आहे असे मला दिसते -- मी तिकडे लक्ष देतो -- मी अमुक करत नाही म्हणजे हिम्मत नाही असे तुम्ही समजू शकता. चांगल्या कलावंतांना खरी हिम्मत कवटीच्या आत करावी लागते, हे एक दुर्लक्षित सत्य आहे. ०१-०४-२४,

मन…

लवकरच रंगभुमीवर..

नाटक --एक वर्तमान : चं.प्र. देशपांडे : एक काव्यविमर्श

ही एका साहित्यिकाची तत्वचिंतनपर कविता. विस्मयाने स्तंभित होत गुंतून पडावे असे क्वचितच काही वाचनात येते. ही कविता सकृद्दर्शनी निरपेक्ष कालसंबधित वाटली तरी ती व्यक्तीमात्र व जगताचे असणे (being) होणे किंवा घडणे (becoming) तसेच करणे वा कृतीशीलता (doing) असा अस्तित्वाचा समग्र पैस व्यापणारी आहे. यातील कालभाष्य संदर्भप्रचूर असल्याने एका वाचनात कळणारे नाही. परंतु ती कवीने अटीतटीच्या जीवन प्रसंगात राहून मांडलेली एक कैफियत असल्याने एकाच वेळी त्याचे नाट्यविषयक कलाभान व जीवन दृष्टीकोन दर्शवणारी आहे. तत्वतः अनंत (infinite) काळाच्या सान्त (finite) भानाने व्यक्तीच्या जागृतावस्थेत संविद्-जाणिव (conciousness) विलसत असते. त्यात विश्व एक घटित (phenomenon) या रूपाने प्रत्ययास येते. गीतेतील कालसंबधित "अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।।२.२८।। तसेच नासदियसुक्तातील सृष्टीपुर्वी सत् असत् काहीच नव्हते इत्यादी आपल्याला परिचीत असते. त्यानुसार 'असणे' किंवा व्यक्त (existence) हे दोन अव्यक्तांच्या नसण्याच्या (void) दरम्यान भासमान होणारे आहे एवढे तरी कळण्यासारखे आहे. थोडक्यात व्यक्त-वर्तमान हे अमूर्त नसून प्रखरमूर्त स्वरूपातील तसेच कालशृंखला भूत-वर्तमान-भविष्य अशा प्रकारची आहे. परंतु या कवितेत आरंभ ते अखेर याचा एक संकल्पित व्यत्त्यास प्रत्ययाला येतो. तो धारणारूप आहे की छद्म उपहासगर्भ आहे असाही प्रश्न पडून जातो. आरंभीच्या कडव्यात कविने वास्तवाची व्याख्या करत त्याची भरवण भूत-भविष्याने घडल्याचे म्हटले आहे. त्याच्या दृष्टीने वर्तमान अस्तित्वातच नाही. ते पुढच्या कडव्यात अधिक स्पष्ट होते (समजतेय का/वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी / काहीच नसलेली / ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी) याचा अर्थ कविचा संकल्पित नाट्यकालावकाश भूत भविष्य व्यापणारा असून त्यामध्ये वर्तमानाला कसलीच जागा वा भुमिका नाही. वर्तमानात जगण्याची कल्पनाही त्याला विसंगत वाटते. त्यामुळे वर्तमानात नाट्य घडविणेही त्याला उलट किंवा विरूद्ध प्रकारातील व म्हणून अशक्य कोटीतील वाटल्यास नवल नाही. पुढच्या ओळीतून क्रमशः वर्तमानाला दिलेल्या नकारांची एक चढती कमानच अनुभवास येते. थोडक्यात कविचा नाट्यावकाश भूत-भविष्याने आधारभूत अशा ज्ञात विश्वातील असून वर्तमानाशी त्याचा संबंध तूटलेला आहे. वर्तमान ही निव्वळ पोकळी असल्याने त्यात शोधण्याजोगे काय असते? असा त्याचा सवाल आहे. त्यामुळे माहितीशोधक संगणकालाही त्यातून काही गवसण्यासारखे नाही अशा निष्कर्षाप्रत कवि येतो. इथे विज्ञानाची वर्तमान संदर्भातील जी अज्ञेयता सूचीत होते ती हतबलता की सैद्धांतिक स्वरूपातील असाही एक प्रश्न समोर येतो. तो अभावितपणे आधुनिक पुंजयामिकीतील (Quantum mechanics) अनिश्चितता तत्वाचे स्मरण करुन देतो.पुढे हे सूत्र नाट्य (की न-नाट्य) विषयातील समावेशक घटकसंदर्भात एक प्रश्नांकन स्वरूपात विस्तारत जाते.यात अशा नाटकाचा दिग्दर्शक नायक नायिका नेपथ्य प्रकाशयोजना प्रेक्षक स्वगत असे बहुतांश घटक प्रविष्ट होत एका व्यापक नकाराचा स्वर बुलंद करताना दिसतात. एवढेच नव्हे तर काही नाटके ( वेटींग फॉर गोदो, एक शून्य बाजीराव गार्बो (?) व नाटककार

यांचाही उल्लेख केला जातो. अखेरीस नाटक कसे घडायला हवे याची कविला अभिप्रेत भुमिका येते ती -- घडून न घडल्यासारखे व्हायला हवे -- या स्वरूपात. ते पुष्कळच आध्यात्मिक आशयाचे वाटते. तो शांकरभाष्यातील अजातवाद (समर्थांच्या भाषेत ' अगा जे घडलेची नाही)म्हणून प्रसिद्ध आहे. या कवितेतील रूपकयोजनेत नाटकाचे प्रयोजन कालसंदर्भात की कालाचे प्रयोजन नाट्यसंदर्भात की कवितेच्या शिर्षकात आहे तसे दोन्ही अन्योन्याश्रय स्वरूपात असा एक प्रश्न पडून जातो. खरे तर ही संपुर्ण कविताच पृच्छा स्वरूपातील एक प्रश्नमालिका असल्याचे दिसून येते. कवितेचा काहीसा सकारात्मक शेवट सोडल्यास यात कसलेही गृहीतक नाही. असलेच तर ते गणितातील शून्य अभ्युपगमासारखे (Null hypothesis) आहे. याला मृषा किंवा ॲब्सर्ड म्हणता येणार नाही. उलटपक्षी ते अशा प्रवृत्तीचा शोध घेत त्याचे अंतरंग उघड करणारे आहे असे म्हणता येईल. कालावकाश व वर्तमान संबंधित असल्याने या काव्यनिवेदनाला घटितार्थशास्त्रीय म्हणावे की अस्तित्ववाचक प्रश्नांकन करणारी म्हणून याला अस्तित्ववादी म्हणावे की वस्तुनिष्ठा व एकसत्व तर्काभासाला विरोधी जाणारी म्हणून उत्तराधुनिक म्हणावे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. अर्थातच यात नामांकनाचा सोस नसून प्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयास आहे इतकेच.

Champra Deshpande

मन:पूर्वक धन्यवाद, दरेकर सर !

कविता अशी –

नाटक – एक वर्तमान

न कळता बोलून फायदाच काय
वर्तमानात जगा हा बोध ठीक
पण कळतोय का अर्थ
वास्तवात खरे तर असतात
भूतकाळ आणि भविष्यकाळ
वर्तमान काळ नसतोच
पण आता
उलटे करा म्हणताहेत
भूत भविष्य जाऊ द्या
वर्तमानातच घडवा नाटक
समजतेय का
वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी
काहीच नसलेली
ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी
आहे का असा एखादा संगणक

जो वर्तमानात करेल सर्च

आणि शोधेल काही

माहिती नसलेले

कोण असेल दिग्दर्शक

या नसलेल्या नाटकाचा

कोण करेल याची प्रकाशयोजना

मेंदूबाहेरची

कोणती अभिनेत्री

होईल माता

भावनाहीन

आणि कोणता नायक

म्हणेल स्वगते

नसण्याचे स्वागत म्हणून

प्रेक्षागृहात असतील

एक एक प्रेक्षक

स्त्री असो की पुरुष

ज्यांचे डोळे असतील

कथाबाह्य आणि कसलीच

अपेक्षा न करणारे

बाहेरून काही नकोच आहे

कारण मी म्हणजे एक

खजिना आहे पूर्ण गरीब

हेच तर आहे

उपकाराचे नाटक

आपोआप चालणारे

म्हटले तर उरलेले

गालिब म्हणाला

खयाल अच्छा है

विचारांकडे पाहून तो हसत होता

विचार समजत होते की ते आहेत

येणार कुणीच नव्हते

हे तर नसलेल्या गोष्टींचा

शोध घेणारे नाटक

बेकेट म्हणाला मलाच नाहीं माहीत

तर तुम्हाला सांगू काय

खानोलकरांनी सांगून ठेवले

कोणत्या काठीचे हट्ट चालतील

आणि कोणते नाही चालणार

ते होते बाजीराव पण शून्य उरले

नाटकात खुपसलेल्या सुरीने

मेलेली विद्यार्थिनी

असलेले काही लैंगिक देत होती

की नसलेल्या जगात अंतर्धान पावत होती

एका नाटकात आला संवाद

तू आधी होतास तसाच चालला असतास

नाटक असेच तर घडायला हवे

काहीच न घडल्यासारखे

वर्तमानात

--- 000 ---

To think new thoughts you have to break the bones in your head.

– Jean -Paul Sartre ( हीच ती कवटीच्या आतली हिंमत --- ).

रवीन्द्र दामोदर लाखे

April 3 at 11:21 AM

·

https://www.facebook.com/share/p/FuJJDEXMU22yD134/?mibextid=oFDknk

काल चंप्रंचं हे पुस्तक घरी आलं. यात चंप्रंची महत्त्वाची नाटकं आहेत. ते स्वतःच आपलं पुस्तक प्रकाशित करतात. मराठीतला अत्यंत महत्त्वाचा कवी, नाटककार आणि तत्त्वचिंतक - निरपेक्ष पणे आपला लेखन करीत राहणारा हा माझा मित्र आहे, फिलॉसॉफर आहे नि गाईडही आहे. मूव्य म्हणजे लेखकाआधी तो माणूस आहे. याही पुस्तकाचं मुखपृष्ठ म्हणजे चंप्रनी काढलेला फोटो आहे. कॅलिग्राफी Priya Deshpande ची आहे. यातलं एक नाटक मी केलेलं आहे - तशी त्यांची चार नाटकं मी केली आहेत. शिवाय परिशिष्टात नाटककार चंप्र असा माझा लेख आहे. आपल्या आयुष्यात असा एखादा ग्रेट माणूस असायला फार मोठं भाग्य लागतं - खूप मोठी माणसं पाहिली त्यांचा सहवास मिळाला पण या सम हाच.

नाणेफेक आणि इतर पाच नाटके

हे पुस्तक गेल्या २५ मार्च ला प्रकाशित झाले. इतर काही कामांत व्यस्त होतो, त्यामुळे, त्याच्या विक्रीबाबतची पोस्ट इथे द्यायचे राहिले होते. सदर पुस्तकात खालील नाटके समाविष्ट आहेत ---

ए, आपण चहा घ्यायचा ?

धागेदोरे

नाणेफेक

सध्या तरी शेवट गोड

सामसूम

झालं गेलं विसरून जाऊ

( अर्थात -- क्लॅरिटी )

आणि विशेष म्हणजे

परिशिष्टात रवीन्द्र दामोदर लाखे यांचा, माझ्या नाट्यलेखनाबाबतचा अभ्यासपूर्ण लेख आहे.

हे पुस्तक ३८४ पानांचे असून त्याची किंमत रु.४००=०० ( रुपये चारशे फक्त ) आहे.

सध्या त्याची सवलतीची किंमत रु.३००=०० ( रुपये तीनशे फक्त ) पोस्टेजसह ठेवलेली आहे.

खरेदी करायचे झाल्यास पैसे पाठवण्यासाठी आवश्यक माहिती अशी आहे ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

धन्यवाद !

गनिमी काव्याचे नमूने

--- विश्वास कणेकर, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

हा संग्रह वाचताना आवडलेल्या ओळी ---

माझ्याबद्दलच्या त्यांच्या अज्ञानातच

मी जगत राहीन ( पान १४ )

खऱ्याखुऱ्या खऱ्यापेक्षा

खोटंखोटं खरंच

खरंखुरं वाटतं ( पान ३४ )

प्रेत नसणे म्हणजे जिवंत असणेच की ( पान ३९ )

तूच आधी गेलीस तर ?

तुझं नसणं

म्हणजे माझ्यात मी नसणं

माझंच जाणं मी पाहणं ( पान ७४ )

आता तरी मास्क काढ मनावरचा

आणि

ये भानावर. ( पपान ९५ )

आठवणींचं शेवाळ वर्तमानावर.

केव्हा यायचं असतं भानावर ? ( पान १०७ )

--- अशा ओळी लिहिणारा कवी त्याचे समस्याप्रधान जगणे उलटेपालटे करून पाहतो आहे, हे जाणवते. तरीही क्वचितच एखादी पूर्ण कविता सलग वा सखोल जाण व्यक्त करते, असे दिसते. दिसणं ( पान ३५ ) आणि खेळखंडोबा ( पान ७५ ) या कविता तशा म्हणता येतील. हे असे का घडत असावे, असा प्रश्न हा संग्रह समोर ठेवूनच विचारता येतो. कवी प्रांजळ असल्याने इथेच काहीसे उत्तर सापडते. याचे काहीसे उत्तर खेळखंडोबा या कवितेत आहे. स्वत:ला बोन्साय करणे स्वीकारल्यावर कविता फुलवणे कशाला ? तसेच आत्मकलेश या पान ९७ वरच्या कवितेत या ओळी येतात –

कधी सुटणार ही माझी कुबट सवय

सांगण्याची ?

त्याच आणि तसल्याच जुनाट शब्दांतून ?

याचे कारण, कविता लिहायची हे ठरलेले आहे, जगणे राहू दे जमेल तसे – असे घडत असावे. हे म्हणजे मग घोड्यापूढे टांगा बांधणे होते. अशा अवस्थेतूनही बरेच कवी जात असणार. या अवस्थेला प्रांजळ आणि खुली अभिव्यक्ती देणारा हा संग्रह आहे.

--- ००० ---

राजन बापट --

आपल्या सर्वांची नाटकांची आवड न संपणारी. नाटकाच्या हौशीबद्दल नव्याने लिहायचं ते काय?

एक पूर्ण नाटक बसवायचं तर त्यामागचा व्याप मोठा. थिएटर बुक करण्याचा खर्च, वेषभूषा-रंगभूषा-नेपथ्य-प्रकाश या सर्वांचा जामानिमा. ते सर्व माहिती असणाऱ्या तंत्रज्ञांची उपलब्धता. नटांनी करायची पाठांतरं, त्यांच्या वाचिक आणि आंगिक अभिनयाचा कस. प्रेक्षक येतील का? तिकिटं काढतील का? पैसे बुडतील की खर्च भरून निघेल? आणि हे सर्व करून शेवटी प्रेक्षकांना ते बरं वाटेल की बहुतांश लोक नाकंच मुरडतील?

हे सर्व प्रश्न अनिवार्य खरे. त्यामुळे नाटक उभं करायचं तर वेळ, परिश्रम, पैसे आणि मानसिक तयारी भरपूर हवी. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचार आला म्हणजे नाटकाच्या विषयांवर. अभिव्यक्तीवर नाही म्हण्टलं तरी थोडासा लोकानुनयी विचार करण्याची गरज आली.

नाट्यवाचनासारख्या गोष्टींमुळे यातल्या बऱ्याच गोष्टीतून सुटका होते खरी. नाटकांचं स्क्रिप्ट वाचतात कसं? कुठल्या संहिता वाचाव्यात? त्यात काही प्रयोग करणं शक्य आहे का? यांसारख्या प्रश्नांची प्रयोगशाळा म्हणजे नाट्यवाचन. वॉशिंग्टनच्या मराठी रसिकांकरता ही प्रयोगशाळा घेऊन येतो आहोत. कधी? कुठे? साधारण किती वेळ? ती सारी उत्तरं सोबतच्या फ्लायरमधे.

ह्या आमच्या उपक्रमाला सर्व नाटककारांनी त्यांची परवानगी दिली ह्याबद्दल त्यांचे अनेक आभार. ह्या नाटककारांमधे पुण्याचे ज्येष्ठ नाटककार चं प्र देशपांडे Champra Deshpande ह्यांचाही समावेश आहे, ह्या सर्व बाबी हुरूप वाढवणाऱ्या आहेत.

नाटकांच्या वाचनानंतर त्यातल्या वाचक कलाकारांशी तुम्हाला संवाद साधता येईल. नाट्यविषयक चर्चा म्हणा, गप्पा म्हणा. आणि हे नेहमीप्रमाणेच चहा कॉफी आणि थोड्याश्या संध्याकळच्या नाश्त्याबरोबर - एका रविवारी दुपारी. सोबत फ्लायर आणि Evite ची लिंक जोडतो आहे. येण्याचं ठरवत असलात तर Evite वर नक्की RSVP पाठवा. सर्वांचं स्वागत आहे. कार्यक्रम विनामूल्य आहे.

https://www.evite.com/event/002EINHTNQ3MC4EWSEPO6ISZTNTP4I

कवी होणे

मी लहान असताना कधी कधी माझ्या वडिलांनी धावत्या लिपीत इंग्रजीत काही लिहिलेले मी बघत असे. आपणही का लिहू नये असे या विचाराने दोनतीनदा तसेच काही उलट्यापालट्या रेषा आणि मध्ये मध्ये थोडी जागा सोडलेली असे गिचमिडून वडिलांना मी त्याचा अर्थ विचारला होता. ते म्हणत, याला काही अर्थ नाही. त्यासाठी आधी इंग्रजी यावी लागते आणि धावती लिपी यावी लागते. यावर मी खट्टू होत असे. पुढे, मला साहित्याची आवड आहे असे गृहीत धरून मी सत्यकथा आणि मुख्यत: त्यातल्या कविता वाचू लागलो. मी त्यावर बारकाईने विचार करत असे. एकूण सूक्ष्म निरीक्षणांती मला असे लक्षात आले की एकमेकांशी संबंध नसलेले शब्द घ्यायचे आणि अर्थाचा आभास निर्माण करण्यासाठी मध्ये मध्ये आठवतील ती क्रियापदे टाकायची की होते कविता. हे माझे ज्ञान मी लगेच अंमलात आणले. तशा सुमारे दहा कविता लिहून दिल्या पाठवून सत्यकथेकडे. त्या एका आठवड्यात उलट टपाली साभार परत आल्या. एकदा नसतील कळल्या त्यांना आपल्या कविता म्हणून पुन्हा एकदा तसाच प्रयोग करून पाहिला. याही वेळी ‘ तुझे ठेव तुजपाशी ‘ म्हणून त्याही परत आल्या !

सांगायचे कारण असे की रूटीन घिसेपिटे अनुभव आणि गुळगुळीत आदर्शांच्या कल्पना एवढ्या भांडवलावर कविता होतात असे अनेकांना वाटते, असे दिसते. ते कवितेसारखे लिहिताही येते आणि जरा पैसे असले की त्याचे पुस्तक काढणेही आता फारसे अवघड राहिलेले नाही. ( मी स्वत: काढतोच आहे की माझी पुस्तके ! ) आणि गंमत म्हणजे अनेकांना असे वाटते की असे लिहीत राहिले की एखादा समीक्षक येईल आणि त्याला ग्रेट म्हणेल ! ( तसेही घडू शकण्याचा काळ आहेच ! ) केशवसुतांना कुणी विचारले होते म्हणे की मला कवी व्हायचे आहे तर काय करावे लागेल ? ते म्हणाले होते म्हणे की कविता ही वीज असते, ती भाजूनही काढू शकते, ती आहे का आपली तयारी, हे आधी पाहावे. सार्त्र म्हणतो की सर्जक लेखन करायचे असेल तर मेंदूतली हाडे मोडली जाण्याचा धोका पत्करावा

लागतो ! बरे, ठीक, मला व्हायचेच आहे लेखक वा कवी तर चला, मी आहे तयार तशी वीज हातात धरायला वा मेंदूतली हाडे मोडून घ्यायला, त्यासाठी काय करू ?
आदर आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठीचा, ‘ ग्रेट रायटर कैसे बनोगे ‘, असा हा सोपा मार्ग नाही असू शकत. आधी खरोखरचे जगणे, खरोखरचे प्रश्न, अशीच असणार ती प्रक्रिया. प्रसिद्धीच्या भिकारडेपणातून चांगली कविता नाही लिहिली जाणार ! स्वत:च्या जगण्याकडे गंभीरपणे पाहण्याची आच आणि निकड असणे हेच महत्त्वाचे. गंभीर याचा अर्थ विनोदविरहित नव्हे. आधी जगणेच धगधगते हवे, मग कविता लिहिली जाईल अथवा न जाईल. कविता लिहिणे घडायलाच हवे असे वाटत नसेल तरच सर्जक कविता लिहिली जाऊ शकेल ! ( -- असे वाटते ! )
--- ००० ---

'नाणेफेक' या चंप्रंच्या नव्या पुस्तकनिमित्त बुधवारची आमची संध्याकाळ स्मरणीय झाली! चंप्र सरांबरोबरच्या गप्पा नेहमीच एक समृद्ध करणारा अनुभव असतो. गप्पा किती रंगल्या याचे थोडक्यात वर्णन -- 'कोई हमदम ना रहा', 'अकेला हूं मैं', 'साथी ना कोई मंझिल' अशी माझी काही अतिशय आवडती गाणी आहेत असे म्हणत सर मस्तपैकी गाऊ देखील लागले, म्हणजे बघा.. चंप्रंना आम्ही याची देही याची डोळा गाताना अनुभवले! खरे-खोटे करायचे झाल्यास 'नाणेफेक' आहेच!! ( गिरीश रांगणेकर आणि सुशील शिरसाठ यांच्यासह फोटो ).

मजेदार आठवण -- आता या दोघांच्या संगीत कार्यक्रमात गाण्याची ऑफर आली आहे ! काय काय करणार ? !

Satish Tambe यांच्या एका पोस्टवर दिलेली कॉमेंट ---
कवितेत, हे विशेषण अमूकच विशेष्याचे असा निर्णय होण्याची गरज नाही -- त्या अनिश्चिततेसहच कविता जाणवत जावी. बौद्धिक अनेकार्थता ठीकच पण एकूण भान या अर्थी चांगल्या कवितेला एक ' न कळणारा ' अर्थही असतो. म्हणजे जाणवतो पण त्याचे बौद्धिक निवेदन शक्य होत नाही.

मेहनत तर जोरदार चालू आहे -- प्रयोगाला शुभेच्छा ! ( मन ).

प्रयोगाला होऊ द्यात हो सात वर्षे -- माझी नाटके असतात ---
सदाहरित देव आनंद ! ( रिनोव्हेशन या हिंदी नाटकाचा फोटो ).

घोषणा --- ( गुढी पाडवा पोस्टर – मन ).

कवितेला
थोडे तरी
बातमीमूल्य असावे लागते.

वासकसज्जिका ( कवितासंग्रह )

--- नेहा भांडारकर , प्र ० सायन प्रकाशन.

वासकसज्जिका म्हणजे सर्व काही आवरून, नटून प्रियकराची वाट पाहणारी सुसज्ज नायिका. या कवितासंग्रहातल्या कविता पाच विषयांत विभागलेल्या आहेत. ते विभाग असे --- प्रकृतीपुरुष, स्त्री आणि संस्कृती, अधिक्रमण-स्पर्श-मोक्ष, कविता आणि पाऊस. या संग्रहाच्या नावाप्रमाणेच त्यातल्या कवितांची भाषाही ‘ राजेशाही ‘, लखलखीत आणि जरा जडच म्हणावी अशी आहे. त्यामुळे, अर्थातच ‘ धीरे धीरे चल ‘, अशा पद्धतीने हा संग्रह वाचावा लागतो. ( याला कुणी ‘ वाचकभंजिका ‘ म्हणू नये म्हणजे झाले ! ) एका अर्थाने या कवितेलाच, वाचकासाठी नटूनथटून सज्ज असलेली चमकदार कविताही म्हणता येईल. ही एक प्रकारची स्वप्नील उदात्तता आहे. एकूणात ही स्वच्छंदी – रोमँटिक कविता आहे. कधी आहे तेच उत्तुंग भाषेत व्यक्त करणारी तर कधी कल्पनेने उत्तुंगता निर्माण करणारी. सिनेमात जसे राज कपूर आणि सुभाष घई हे शोमन समजले गेले त्याचप्रमाणे ही भाषेतली आतसबाजी आहे. अहंकार नष्ट होऊन मुक्ती मिळणे हा एक ( माहीत नसलेला असा ) एक मुक्तीचा मार्ग असतो आणि दुसरा म्हणजे आहे हेच जग एका वेगळ्याच स्तरावर असल्याचे कल्पून त्यापासून दूर जाणे, हा. ही कविता या दुसऱ्या मार्गाने जाणारी वाटते. क्वचित कधी ही कविता आहे ते व्यक्त करते – ते पाहून, त्याच्या तुलनेत, या कवितेची मूलवृत्ती अधिकच ठळकपणे जाणवते.

कविता कशी असावी असे वाटते तर अशी –

शब्द अंबर ( पान ९९ )

शब्दांबरावर लटकवावीत
झुंबरं अक्षरांची
प्रज्वलित व्हावेत
अगणित दीप कवितांचे
नवरसाच्या मिलाफाने
झुलावे इंद्रधनूने
सप्तरंगी लेणे कोरून क्षितिजावर
शुभ्र करडे काळे सावळे
तरंगावेत ढगांचे पुंजके
झिरपावे कवीने
होऊन श्रावण
अन गावे रिमझिम गाणे

लेणी, उत्खनन, परंपरागत कल्पना, प्रतिमा अशा मार्गाने ही कविता व्यक्त होत राहते. यात थोडा बदल म्हणजे, क्वांटम थिअरी, चुंबकीय लहरी, लॉग आऊट, स्क्रीन शॉट , वगैरे असे समकालीन शब्दही येतात. जून वा परंपरागत वा काल्पनिक वास्तव आणि आजचे प्रत्यक्ष वास्तव या दोन्हींतही ही कविता वावरते. ही कविता बुद्धिजीवी

कलाप्रेमींच्या आवडीनिवडी जपते. ( पान ६१ ). आदर्श, बोध, वैचारिकता, निवेदन पूर्ण करणे, सारांश सांगणे यांच्या मर्यादा अनेक ठिकाणी पडलेल्या दिसतात, ते यामुळेच असावे. कविता कशी असायला हवी हे जणू ठरलेलेच आहे. त्यामुळे या कवितेत अज्ञातातील झेप क्वचितच दिसते. तरीही खालीलप्रमाणे अनेक मिती असलेल्या, अर्थपूर्ण ओळीही अनेक ठिकाणी दिसतात –

शक्य झाल्यास शोषून घे तू
आर्द्रता माझ्या डोळ्यांतील
अन बरस धरणीवर मनसोक्त
पूर्ण रिक्त होईस्तोवर ( पान ११९ )

तर कधी कोश बनवत राहिले
आयुष्यभर एकांतवासाचा ( पान ३३ )

खोलवर झालेल्या जखमा
त्या जखमांचे व्रण
हव्या नको असलेल्या
दृश्य अदृश्य स्पर्शांचे डाग
कधी कधी विस्मृतीच्या काळोखातून
उजेडात येतात
अधिक गहिरे अर्थ घेऊन ( पान ४० )

या संग्रहातल्या पुढील कविता मला आवडल्या – लॉग आऊट ( पान २३ ), वॉल्टेअरचे तत्त्वज्ञान ( पान ९१ ), घुसमट ( पान १०६ ) आणि निगरगट्ट ( पान १२३ ).

ही कवयित्री नको त्या झगमगाटांच्या मोहांना बळी पडून, प्रत्यक्षातले जगणे ‘ पाहण्याच्या ‘ स्वत:च्या क्षमतांना दडपत आहे, असे वाटले. या क्षमतांना जर उत्स्फूर्त वाव दिला गेला तर खूपच भेदक आणि अर्थवाही कविता तिच्याकडून लिहिली जाईल, असेही वाटले.

--- ००० ---

वासकसज्जिका ह्या कवितासंग्रहावर एक सजग वाचक म्हणून Champra Deshpande सरांनी दिलेली साक्षेपी प्रतिक्रिया महत्वाची वाटते. --- नेहा भांडारकर.

गिरीश पतके यांचा ‘ रंगावाचा ‘ मधला लेख –

--- दिलीप जगताप – भाग २.

इये मराठीचिये नगरी मराठीचे डॉक्टर शेकड्याने आहेत पण नाट्यवाङ्मयाची अभ्यासपूर्ण चिकित्सा करणारा एकही नाही. अशी दुर्दशा कशामुळे होत असावी ? सगळीकडे निर्भय बनो चे नारे असताना, इथे मात्र सभय रहो, असे का घडत असावे ? अभ्यासाचा आळस हे असेल एक कारण किंवा मग कुवतच नसावी. कुवत आणि हिंमत. हिंमतही

लागणार. कारण आपण काही लिहिले तर त्याचे हसे तर नाही होणार ? – हा विचार असणार. आणि नाटककार समजा परिवर्तनवादी नसेल आणि आपण त्याच्यावर लिहिले तर ते एक प्रकारे प्रतिगामित्वाचे बळ वाढवणारे तर ठरणार नाही ? – असेही काही असावे. ते असो. गिरीश पतके हा एक बिगर-डॉक्टर हे काम हिंमतीने करतो आहे.( दुसरे एक बिगर-डॉक्टर आहेत – रवीन्द्र दामोदर लाखे. ) कशाला हवाय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा ? जुन्यांच्या पुण्याईवर ? आज काय स्थिती आहे मराठीची ? असो.

मे’ २३ च्या ‘ रंगावाचा ‘ मध्ये या लेखाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला होता. आता हा दूसरा भाग आलेला आहे. आणखी एक तिसरा आणि शेवटचा भाग येणार आहे, असे कळते. दिलीप जगताप हा मराठीतला एक निवडक महत्त्वाचा नाटककार आहे. कोण आपल्याला टाळ्या वाजवते आहे का, कोण बक्षिसे देते आहे का, कुणी कुठे आपल्या एकूण लेखनाची योग्य दखल घेत आहे का – या बाबींच्या फंदात न पडता गेली कित्येक वर्षे मराठी रंगभूमीला महत्त्वाच्या संहिता देत आलेला हा लेखक आहे.  शेक्सपियर, सार्त्र, झने अशा अनेक नाटककारांच्या महत्त्वाच्या नाट्यकृती या नाटककाराने मराठीत आणलेल्या आहेत. ( शिवाय स्वत:चीही अनेक नाटके आहेतच. ) नाट्यतंत्र आणि भाषा यांवरच्या त्याच्या हुकमतीमुळे हे सगळे अत्यंत दर्जेदार काम झालेले आहे. अशा या लेखकाच्या लेखनाचा सर्वांगीण आवाका घेण्याचे आणि मराठीत त्याला योग्य ते स्थान देण्याचे काम गिरीश पतके यांचा हा प्रदीर्घ लेख करत आहे. हे काम करायला खूप मेहनत, बुद्धी आणि मर्मदृष्टी लागलेली आहे, हे स्पष्टच आहे. जगताप आणि पतके या दोघांच्याही कामाला मराठीतल्या नाट्य आणि कला विश्वाकडून योग्य तो प्रतिसाद मिळायला हवा. कशाचेच काही देणेघेणे नसल्याप्रमाणे डल, मद्दड पडून राहिलेले आपले कलाक्षेत्र अशा कामांनी जागे व्हावे आणि प्रभावित व्हावे, असे वाटते. अन्यथा, अभिजात भाषेचा दर्जा राहील बाजूला, त्या ऐवजी, जाऊ दे, मरू दे असे म्हणायची वेळ येईल !

--- ००० ---

DrNitin H. Deshpande is with Sandhya Kulkarni and

जीवनात कायम राहून गेलेले अनुभव !

पुण्याच्या "पी डी ए " सारखी सांगलीत "एडीए "  (Amateur  Dramatic Association ) नामक संस्था होती. त्यांच्या वतीने दरवर्षी भावे नाट्यगृहात एकांकिका स्पर्धा भरविल्या जात असत. त्या काळात खूप काही प्रतिसाद नसे पण सांगलीतील नाट्यकर्मी यानिमित्ताने एकत्र येत आणि दोन- तीन दिवस महाविद्यालयांमध्ये जोश भरत असत. आधीचे तालमींचे दिवस वेगळेच.

.

कायम वानवा असायची ती चांगल्या संहितांची (स्क्रिप्टसची) - जी आजही आहे ४० वर्षांनंतर. (आज सकाळी संजय मोने यांनी "मित्र म्हणे " मध्ये हीच री ओढली.) स्पर्धा म्हटलं की पारितोषिके जिंकण्याची हिरीरी अफाट. मग तेवढी रक्कम मिळवून देण्याची ताकद असलेली संहिता हवी. त्यांत आमच्या वालचंद मध्ये अट होती- रंगमंचावर आमच्या

समवेत कॉलेजच्या मुली काम करणार नाहीत( त्यांच्या पालकांची लेखी परवानगी असेल तरच. अन्यथा----) मग स्त्रीपात्र विरहित एकांकिकांची अपरिहार्य शोधाशोध.

.

अशात आमच्या रमेश घोलपने (त्यावर्षीचा जी एस) हट्टाला पेटून, प्राचार्यांची समजूत घालून आमची एंट्री पाठविली. आणि वर त्यांनाच अट घातली- बक्षीस मिळाले तर बक्षीसाच्या रकमेतून महाविद्यालयात "आर्टस सर्कल " सुरु करणार. (पुण्याचा बी जे किंवा मिरज मेडिकल च्या धर्तीवर, त्याच्या उदघाटनासाठी "अष्टविनायक " च्या वंदना पंडीत यांना सांगलीत त्या "अश्वमेध " साठी आल्या असता, भेटून त्यांचा तत्वतः होकारही मिळवलेला) त्यावर्षी पुरुषोत्तम करंडकला दुसरी आलेली चं प्र देशपांडे यांची "इतिहास " एकांकिका त्याने मिळविली. पात्रे -इन मीन तीन, त्यांतही एक मूक !

.

संहितेचे वाचन झाल्यावर काही हौशी मंडळी आपोआप गळाली. चं प्र देशपांडे यांची भाषा ओठांवर चिकटवण्यात तालमीतील ४-५ दिवस गेले. विषय समकालीन असल्याने तालमींना मजा येत होती. समोरच्या विलिंग्डन च्या प्रदीपने (तोही घोलप्याचा नाट्यमित्रच) "काहूर " नामक एकांकिका बसवायला सुरुवात केली होती- पात्रे दोन आणि स्क्रिप्ट खास मुंबईच्या मित्राकडून आणलेले. अंगातलं स्पर्धेचं स्पिरीट अधिकच भिनलं. ताज्या दमाने प्रॅक्टिस केली. रंगीत तालीमही मनाजोगती झाली.

.

तीन दिवस स्पर्धा चालणार होती- तब्बल एकवीस एन्ट्रीज आल्या होत्या.

स्पर्धेचा दिवस उजाडला.(की रात्र उजाडली.) आमची एकांकिका अनुक्रमे तिसरी होती. नाट्यगृह तुफान भरलेलं आणि तरुणाई (त्याही काळी) चेकाळलेलीच असायची. पाडापाडी जोशात सुरु होती.

तितक्यात संयोजकांपैकी एकजण माझ्याजवळ एका व्यक्तीला घेऊन आले. ते साक्षात एकांकिकेचे लेखक -चं प्र होते. खास आमचा प्रयोग बघायला आलेले होते.आमचं टेन्शन वाढलं. त्यांनी आम्हांला शुभेच्छा दिल्या. बोलता बोलता म्हणाले-

" आजवर इतिहास एकांकिका कायम दुसरी आलीय. तुम्हीं तिचा हा इतिहास मोडीत काढावा."

.

प्रयोग झाला- अपेक्षेपेक्षा भन्नाट, आम्हालाही चकित करून जाणारा. नटराज रंगमंचावरील तिघांच्याही अंगी भिनला होता. रंगदेवता आमच्या मदतीला आली होती. एकांकिका झाल्यावर लेखक महोदयांनी आमचे अभिनंदन केले. आम्ही त्यांना दुसऱ्या दिवशी दुपारी वालचंदच्या मेसमध्ये जेवण्याचे निमंत्रण दिले. त्यांनीही ते अगत्याने स्वीकारले.

.

जेवणा अगोदर हॉस्टेल रूममध्ये जयंत असनारेने त्यांच्यासमोर विनोदी पद्धतीने "इतिहास" चा नाट्यांश सादर केला. स्वतःच्या अर्थवाही, धीरगंभीर लेखनाचे असे इंटरप्रिटेशन बहुधा त्यांनीही यापूर्वी बघितले नसावे. अवघ्या बारा तासांच्या अवधीत आम्ही त्यांची एकांकिका त्यांच्यासमोर दोन प्रकारे सादर केली. त्यांना दुसराही प्रयोग (?) आवडला असावा, कारण त्यांनी जयंताचे कौतुक केले.

.

स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला- " इतिहास " एकांकिकेने तिचा आजवरचा इतिहास मागे टाकत पहिले बक्षीस (रुपये १०००/- साल १९७८-७९) मिळविले होते. ठरल्याप्रमाणे आम्ही "आर्टस सर्कल " ची स्थापना वालचंद मध्ये केली. ता. क.- या पुढचे "नाट्य" विस्तारभयास्तव उद्याच्या पोस्टमध्ये !

DrNitin H. Deshpande is with Sandhya Kulkarni and

जीवनात कायम राहून गेलेले अनुभव -२ ( नाट्यगृहाबाहेरचे नाट्य)

.

मा. प्र . पु. चा.

.

रिझल्ट अनाउंस झाला. "इतिहास" पहिली आणि प्रदीपची "काहूर " दुसरी ! मात्र सगळी व्यक्तिगत (दिग्दर्शन, अभिनय) बक्षीसे प्रदीपला. सगळीकडे गारेगार वातावरण पसरलं होतं. नाट्यगृह भानावर यायला अंमळ उशीरच झाला. सगळ्यांचा आपापल्या कानांवरचा विश्वास उडाला होता. मी धरून सगळे गृहीत धरून चालले होते- " काहूर " प्रथम आणि "इतिहास" दुसरी !

.

तुम्हांला काय वाटलं -पडदा पडला या इष्टोरीवर? अहो, अजून दुसरा आणि तिसरा अंक व्हायचाय.
"इतिहास " च्या परिघाबाहेर मी होतो- अनाउंसमेंट, मेकअप , लायटींग असलं काहीबाही गरजेनुसार सांभाळत होतो. त्यामुळे नंतरच्या घटनांचा मी आपोआप मूक साक्षीदार (एकांकिकेतील "बाकी " सारखा) झालो.

.

व्यक्तिशः मला "काहूर" जास्त आवडली होती- आमच्यापेक्षाही. पण मला हेही माहित होतं -स्पर्धांचे निकाल कधीच सर्वमान्य होत नसतात. विशेषतः विजेत्यांची संख्या आणि हात हलवत परत जाणाऱ्यांची संख्या हे प्रमाण मी कायम व्यस्त असतं हे मी अनेक स्पर्धांमध्ये अनुभवलंय. स्पर्धा सगळ्यांना खूश ठेवू शकत नाही.

.

प्रेक्षकांचे आणि परीक्षकांचे तराजू वेगवेगळे असतात.

.

त्यामुळे प्रत्येक निकालानंतर अशा विषम लढाया, पार्शालिटीची ओरड, हळहळ, सेलिब्रेशन होतच असते. पण यावेळी हे सर्व तात्कालिक नव्हते. रमेश आणि प्रदीप खरेतर जानी दोस्त, पण निकालाने त्यांच्यात दरी पडली. प्रदीपने डूख धरला. दुसऱ्या दिवशी स्थानिक वृत्तपत्रात बातमी-

.

" रमेश घोलप यांनी एकांकिकेच्या वेळी नारळाऐवजी रुपयाची नोट फाडून रंगमंचाची पूजा केली."

.

अपेक्षित स्फोट झाला. वाचकांचा पत्रव्यवहार वाढला. यानिमित्ताने स्पर्धेच्या निकालावर झोड उठली.

.

या पूर्वनियोजित यादवी मागे रीतसर प्रदीप होता. आमचा ग्रुप स्वस्थ असला तरी निखळ गुणवत्तेवर मिळालेलं यश मात्र दूषित झालं होतं. रमेशच्या कर्तृत्वाचे शेण झालेलं. प्रत्येक ठिकाणी प्रदीप "काहूर" माजवून गेला.

.

पुढील आठवड्यात वरील पार्श्वभूमीवर बक्षीस समारंभ होता. पुण्याहून पी डी ए चे भालबा केळकर (आमचे वालचंदचे भालबा केळकर सरही ए डी ए च्या संस्थापकांपैकी एक होते). अध्यक्ष म्हणून आलेले होते. प्रदीप काळ्या पोशाखात हजर होता. हॉलभोवती त्याची मित्रमंडळी घोषणा देत होती. खालमानेने त्याने त्याची सगळी बक्षिसे स्वीकारली. सगळा समारंभ केविलवाणा ! वरताण म्हणजे त्याने भालबांना एक चिठ्ठी दिली.

.

पडद्यामागच्या या स्टोरीबद्दल पाहुणे सर्वथैव अनभिज्ञ ! तरीही चिठ्ठी वाचून त्यांना अदमास आला, ते मनोज्ञ बोलले- " परीक्षक निवडायचा हक्क स्पर्धकांना नसतो. निर्णय लागल्यानंतर त्यांवर गदारोळ उठविण्यापेक्षा तो खिलाडूवृत्तीने स्वीकारायचा असतो. संयोजकांना मान हा द्यायलाच हवा. परीक्षकांचे निकष हवे तर जाणून घ्या, पण त्यांच्या निर्णयक्षमतेवर विश्वास ठेवा अन्यथा स्पर्धेत उतरू नये. किमान एवढी शिस्त, आचारसंहिता रंगकर्मींनी पाळायलाच हवी."

असं म्हणतात- स्पर्धा नेहेमीच चांगले लेखक, कलावंत, दिग्दर्शक देतात. पण या  स्पर्धेने दिलं - मित्रांमधील न संपणारं वैर !

एकदाचा या वादावर पडदा पडावा म्हणून संयोजकांनी २-३ दिवसांनी आम्हाला त्यांच्या कार्यालयात बोलावले. दोघंही तिथे भांड भांडले.

" माझ्याजवळ त्या नोटेचे दोन तुकडे आहेत."- प्रदीप

"अरे, जा रे, तो वार्ताहर तुझा दोस्त, म्हणून त्या फडतूस पेपरमध्ये काहीही छापून आणलेस."-  इरेला पडलेला रमेश

" माझी हिंमत दाखवू? म. टा. त बातमी आणू की मनोहर मध्ये नोटेच्या तुकड्यांचे फोटो?"

थकेपर्यंत दोघेही भांडले.

.

आता वाटतंय- स्पर्धेने एवढे भयावह वळण घ्यावे? इतके महत्वाचे असतात कां हे व्यक्तिगत जयापजय? मग अभिनयातील आनंदाचे काय करायचे? रंगमंचावरील जगलेले क्षण कशासाठी असतात?

.

कदाचित प्रदीपला पहिलं बक्षीस मिळालं असतं तर एवढं रण झालंच नसतं.

.

रंगमंचावरचं युद्ध सर्वसाक्षीने होत असतं पण इथे नाट्यगृहाबाहेर कोणामुळे झाले?

आजतागायत उत्तर मिळालं नाहीए.

" दृढ निश्चय करणाऱ्या मूठभर लोकांमध्येसुद्धा इतिहास बदलण्याची ताकद असते.

--- महात्मा गांधी. "

--- आज दि. १७-०४-२४ चा पुणे मटा.

(१) हे वाक्य खरेच म. गांधींचे आहे का ? आणि (२) याचा अर्थ काय ?

रवीन्द्र दामोदर लाखे

Champra Deshpande यांची एक कविता ( अभिवाचन क्लिप ).

कविता – स्पर्श.

**१९-०४-२०२४.**

आपल्याला काही म्हणायचे असते.

ते खोडणारा विचार आपल्यालाच सुचतो.

म्हणून आपण काही म्हणत नाही !

२०-०४-२०२४.

आजच्या ' सामना, पुणे ' च्या ' उत्सव ' पुरवणीत --

हिमांशू भूषण स्मार्त यांचा लेख --- ( माझ्या ' वेषांतर ' या एकांकिकेबाबत -- )

" आम्हाला विनाशकारी वाटणाऱ्या

विचारांबरोबर आम्ही गेलो

याचा अर्थ

आम्ही आमचे विचार सोडले

असा नाही होत. "

नाव

पूर्वी बालमृत्यूंचे प्रमाण खूप होते. काहीजण त्याचा अर्थ असा लावत – खरे तर सगळे नियती घडवते. हे विसरून उपटसुंभाप्रमाणे आपल्या मुलाच्या जन्माचा आपण आनंद घेतो आणि त्याचे उत्तम नाव ठेवून जणू काय ते आपलेच कर्तृत्व आहे असे मानतो, याचा नियतीला राग येत असावा, त्यामुळे, चिडून ती आपली मुले मारत असावी. मग यावर, नकोच ती कटकट आणि आपला आनंदी अहंकार, असे म्हणून ते लोक मुलांची नावे धोंडू वा बाळ अशी ठेवत. अशा नावांची मुले जगल्याचे पाहून यामागचे समज दृढ होत. माझ्या, ‘ नातं ‘ या दीर्घांकात खालील संवाद आहे -- अनघा: तुझी फक्त कीव येतेय मला. आणि केलास समजा तू माझा खून, तर पुढं न्यायालयात तुला ज्या अनेक प्रश्नांना तोंड द्यावं लागेल तेव्हा पुन्हा तू शेणामेणाचा होशील.

अनिल: ( जरा वेळ एकटक तिच्याकडे पाहून -- ) विचार प्रश्न.( हे तिला अगदीच अनपेक्षित. कसाबसा तोल सावरते. काही क्षण पाहात राहते. मग पाहातच निश्चयानं उठते. समोर येते. तो आहे तिथे उभा. शांतता.)

अनघा: ( एखाद्या वकिलाच्या निग्रहानं ) नाव काय तुमचं ?

अनिल: अनिल हणमंत नाईक.

अनघा: वय ?

अनिल: एकोणतीस.

अनघा: शिक्षण ?

अनिल: एम..ए.

अनघा: धंदा.

अनिल: मूळचंद मिल्समध्ये कारकून.

अनघा: तुमच्या बायकोचं नाव काय होतं ?

अनिल: अनघा.

अनघा: म्हणजे लग्नात तुम्ही ठेवलेलं ?

अनिल: होय. तिचं पूर्वाश्रमीचं नाव माधुरी होतं.

अनघा: अनघा या शब्दाचा अर्थ काय ?

अनिल: निष्पाप स्त्री.

अनघा: तुम्हाला ती तशी वाटत होती ? निष्पाप ?

अनिल: वाटतही असेल...पण त्यात बहुतेक तशा अपेक्षेचाही भाग होता. आणि हे नाव मी केवळ अर्थाकडे लक्ष देऊनच ठेवलं असं नाही. थोडं नावीन्य -- ही अक्षरं -- आणि ही अक्षररचना हीही मला आवडली असतील. शिवाय नाव म्हणायला सोपं-सुटसुटीत. बायको नवऱ्याला सोपी-सहज असावी.

यात म्हणजे मी विचारी असणे आणि तरीही अर्थापेक्षा नुसत्या अक्षर रचनेचेही मला कोतुक वाटले असेल, असे म्हणणे यातून मी किती साधा, सरळ, समर्थनीय, हे सगळे येते. हे एक सकारात्मक अहंकाराचे वा व्यक्तित्वाचे लक्षण म्हणता येईल. माझ्या ‘ मन ‘ नावाच्या दीर्घांकतल्या व्यक्तीचे नाव नीलकंठ असे देवाचे नाव असूनही त्याचे व्यक्तित्व कमकुवत आहे. तो मानसिक गोंधळाने सदोदित ग्रस्त असतो.  नाव सोनऊबाई हाती कथलाचा वाळा, असे प्रकारही आपण जाणतोच. भाषा शास्त्रज्ञांनी याचाही अभ्यास केलेला आहे की बाबा आधी अर्थ अस्तित्वात असतो आणि मग त्याला एक कृत्रिम शब्द दिला जातो किंवा काय, कशी घडते ही प्रक्रिया. संरचनावाद, उत्तर-संरचनावाद आणि विरचना, यांतून ते पुढे येते. निसर्गातल्या सर्व प्राणी, वस्तू  काही नावासह अस्तित्वात आलेल्या नाहीत, ते आपले कर्तृत्व आहे. शब्द म्हणजे ती वस्तू वा वास्तव नसते. आपल्या संस्कारबद्धतेतून निर्माण होणाऱ्या त्या सगळ्या प्रतिमा असतात. आपले सगळे संबंधही प्रतिमांचेच असतात. प्रत्येक प्रतिमा इतर प्रतिमांच्या विरोधात असणे भाग असते. त्यातूनच सतत संघर्ष, शिव्यागाळी, हिंसा हे घडत राहते. म्हणूनच जे. कृष्णमूर्ती विचारतात की तुम्ही एखाद्या झाडाकडे वा स्वत:च्या पत्नीकडे वा मुलाकडे शाब्दिक प्रतिमेशिवाय पाहू शकता का ? ते असाही प्रश्न निर्माण करतात

की प्रतिमेशिवाय जगणे शक्य आहे का ? आपले जगणे इतके संघर्षमय आणि बिनडोकपणाचे चालू असते की हे प्रश्न समोर येणे अपरिहार्य असते.

आधीच खूप आहेत डोक्याला ताप, आणखी नकोत, असे आपण म्हणणार. बुद्ध किंवा तुकाराम पूर्णपणे जाणून होते की याच प्रश्नांना तोंड द्यावे लागेल. जे टाळटाळ करतील ते वेडे होऊन मरतील. आहे त्या निर्बुद्धपणातच विविधता निर्माण करत राहतील आणि एकमेकांच्या उरांवर बसत राहतील. मी अमुक धर्माचा किंवा मीच खरा मानवतावादी अशा स्वत:च्या प्रतिमा जोपासत एकमेकांना रद्द करत जगणाऱ्या मूर्खांना हे दिसणार नाही. ते त्यातल्या त्यात तरतम आणि आम्हीच कसे मौल्यवान अशा विचारांच्या भ्रमात राहतील . त्यातल्या त्यात ' हुशार ' बाजू घेत राहतील. अशी बाजू न घेणाऱ्यांना ' कुंपणावरचे ' म्हणत राहतील.

तुकाराम म्हणतो, हे अभंग मी नाही लिहिले, पेसोआ म्हणतो, या कविता मी नाही लिहिल्या. म्हणजे, प्रतिमेशिवाय जगणे यांना सापडले असेल का ? जाऊ दे. लावू या हे फेटाळून. बाजू घेऊन बोंबलत राहण्याच्या घाणीचे उत्पादन करणे हे आपल्याला नक्की जमण्यासारखे आहे. उंटाच्या ----- एवढी आपली उंचीही नाही आणि कुवतही नाही. मीच खरा समंजस आणि निरागस ही प्रतिमाच बरी आहे !

--- चं. प्र. देशपांडे.

०००

चीनमधली एक कंपनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना वर्षातून दहा मूड-खराब रजा देणार आहे !

धीर धरी रे धीरापोटी
असती मोठी फळे गोमटी
कोणासाठी कोणासाठी
खंडाळ्याच्या घाटासाठी

"If the literature we are reading does not wake us, why then do we read it? A literary work must be an ice-axe to break the sea frozen inside us."

— Franz Kafka

माझे ' नाणेफेक आणि इतर पाच नाटके ' हे पुस्तक
आता खालील ठिकाणीही उपलब्ध आहे ---
पुस्तकवाला अँड कंपनी,
पुणे.
फोन -- ८६२४९७७०२९.
आणि

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

कीर्तनास नर हो तुम्ही जागा ।

कीर्तनास नर हो तुम्ही जा, गा ।।

ते आरक्षण रद्द करणार आहेत ।

आम्ही तसे मुळीच होऊ देणार नाही ।।

ते आरक्षण नष्ट करणार आहेत ।

आम्ही तसे कदापि होऊ देणार नाही ।।

फारच छान ।

खूपच छान ।।

--- ००० ---

आवाजाचा नवा मार्ग

एक तर डेसिबल कित्येक पटीत लावता येतातच. तुमच्या कानठळ्या किती बसल्या हे कुणी मोजायला येणार नाही. तक्रार करायची एक तर हिंमत नाही किंवा कंटाळा आहे. होते काय की सलग गाणी लावली की मन कमी डिस्टर्ब होते -- नशा नीट येत नाही. माणूस त्या गाण्याच्या चालीत थोडाफार रमतो. त्या सातत्यात तो नाचूही शकतो -- प्रत्यक्ष वा मनाने. तर आमच्या भागातल्या लोकांनी यावर उपाय शोधून काढला आहे. आवाज जास्तीत जास्त असह्य ठेवायचाच पण आणखी एक करायचे --- कोणतेही गाणे सलग चालू द्यायचे नाही. फक्त एखाद-दुसरी ओळ -- पाचदहा सेकंद फक्त ! शंभर गाण्यांचे तुकडे घ्यायचे. नाच रे मोरा, एक दो तीन, चोली के पीछे, चार आण्याचं पीठ आणलं, नागोबा, वगैरे ! दे धमाल होते ! गाण्याचा फील अजिबात येत नाही -- पयुवर, शुद्ध आवाज ! गाण्यात विचार चालू राहतो -- हा दणदणीत गोंगाट मिळतो ! विचार शिल्लकच नाही राहात ! याला म्हणतात आवाजाची नशा !

--- ००० ---

शेवटाचं नाटक पुण्याचे बुजुर्ग नाटककार चं प्र देशपांडे ह्यांचं "बुद्धीबळ आणि झब्बू" त्यातल्या खट्याळ, चिमटे काढत, माणसांचे इरसाल नमुने दाखवत तुमच्याआमच्या नैतिकतेबद्दल अंतर्मुख करणाऱ्या ह्या नाटकाला रंगवलं होतं बिपिन, अमृता, अनिरुद्ध आणि रूपाली ह्यांनी. ह्या नाटकातल्या अनेक विनोदांना दणदणीत दाद मिळाली आणि नाटक संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट.

खडीउकडगाव, झुमरीतलैया आणि मांजरसुंबा

असा आख्खा भारत मी फिरून आलो ! सगळीकडे उत्साह आहे !
जोर लावत राहा -----

एखाददिवशी ठीक आहे -- रोजच सकाळी उठून नऊला तुम्ही मीटिंग लावायला लागला तर कसे चालेल ?
असे कसे म्हणतोस मुला ? विकसित करायचाय की नाही भारत ?

संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण
सुमारे वर्षभर मागे पडलेले हे काम पूर्ण झाले ! ' हाती घ्याल ते तडीस न्या ' हा मंत्र मला अनेकदा वापरावा लागतो. तांत्रिक कामांसाठी सहकार्य उपलब्ध असते ही यातली प्रचंड सकारात्मक बाजू ! बाकी मजकूरविषयक सर्व कामे मी एकहातीच करत असतो ! मराठीत हे कितपत हवेय-नकोय याचा विचार न करता आपण केलेले काम शक्य तो नीट उपलब्ध राहावे, हा प्रयत्न असतो. इतके लिहिताना आपण लाजलो नाही तर ते सुरक्षित करायला कशाला वेगळे तत्त्व वापरायचे, असा हा साळसूद विचार असतो. आता हे काम **२०-०४-२०२४** पर्यंत पूर्ण झालेले आहे. त्या तारखेपर्यंत मी केलेले सर्व लेखन तिथे उपलब्ध आहे.
संकेतस्थळाचा पत्ता ---

काळ भराभर जात राहतो. संभाव्य विश्लेषणांचे मुद्दे तयार करू लागा !

टीव्हीवर एका टक्कलधारी माणसाची मुलाखत चालू आणि खाली जाहिरातीची पट्टी -- अमुक तेल -- लंबे, घने और मुलायम बालोंके लिये !

" माझे विचार क्लियर असतात.
तिकडेही मी प्रामाणिकच होतो
आणि इकडेही मी प्रामाणिकच आहे ! "

बौद्धिक मतभेदांचे आदर्श अंगण ओलांडून लोकशाही आता मनोहारी शत्रुत्वाच्या प्रांगणात विहरत आहे !

Contradictions thy name is human !
म्हणून मला चं.प्र.देशपांडे अनोखे नाटककार वाटतात. त्यांनी या ‘भूमिका’ प्रकरणाचा अत्यंत नेमका समाचार घेतला आहे. पुरोगामी (तथाकथित) असणे हे सुद्धा भूमिका घेण्यासारखे आहे. माणूस जन्मतः भूमिकावान कुठे असतो ? तो प्रवाही असतो. प्रवाहाला अडथळा करणे किंवा वळण लावणे म्हणजे भूमिका घेणे.

मानवी बुद्धीची निर्मिती नसलेले सगळे निरर्थकच असणार एवढे तर मानवी बुद्धीला सहज समजू शकेल !

लोक सहिष्णू आहेत --- चार जूनची शांतपणे वाट पाहताहेत, बिचारे !

इथे तर्काला अपयश फुटते ---
प्रचंड नाराजी आहे आणि
प्रचंड उत्साह आहे !

लोकशाहीचा पाया असतो --
लोकांचे सामूहिक शहाणपण !

निर्णय

" साहेब एकटेच निर्णय घेतात आणि ते सामूहिक असल्याचे भासवतात ! " -- आजितदादा पवार. यावरून एक गोष्ट आठवली, ती सांगतो. ' सामुदायिक नेतृत्व ' ही संकल्पना कै. यशवंतराव चव्हाण यांनी वापरात आणली. ही संकल्पना समस्यायुक्तच असणार हे मला जाणवले होते. त्या निमित्ताने एकूण जगण्याचा आवाका व्यक्त करावा असे वाटल्याने मी एक एकांकिका लिहिली होती. तिचे नाव होते, ' समुदाय ' ! या एकांकिकेत समुदाय नावाचे एक पात्रच होते -- तेच घेणार  निर्णय !

सामुदायिक !

--- ००० ---

आजच्या ( १०-०५-२४ ) पुणे सकाळ मध्ये, अग्रलेखाच्या वर दिलेल्या तुकारामाच्या ओळी --
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशी देऊं ।।
तुका म्हणे अणु तुजविण नाही । नभाहूनि पाही वाढ आहे ।।
पहिल्या दोन ओळी विशेष आहेत. वेगवेगळी, भेदाभेद करणारी मते हे भ्रम आहेत असे म्हटले आहे. त्यांच्याशी वाद-संवाद करायची वेळ माझ्यावर आणू नकोस रे बाबा -- असे म्हणणे काय, विनवणीच आहे ! इथे काही लोक म्हणणार की तुकाराम ढोंगी आणि आपमतलबी होता -- त्याने एक बाजू घ्यायची शिकवण न देता कुंपणावर बसायचा सल्ला दिलेला आहे ! पुढच्या दोन ओळी तर आध्यात्मिकच असल्याने त्या वैज्ञानिक दृष्टिकोणात बसतच नाहीत ! -- हे असले आमचे संत ! सत्याऐवजी पळपुटेपणा शिकवणारे !!!!!

--- ००० ---

Girish Patke is with Champra Deshpande.

·

केवळ मराठीच नाही तर भारतीय रंगभूमीवरील एक महत्त्वाचे तत्त्वचिंतक नाटककार, कवी व ज्येष्ठ मित्र चं. प्र. देशपांडे यांना वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा!

लवकरच प्रसिद्ध होणा-या त्यांच्या "ओळख परेड" या एकांकिका संग्रहात त्यांच्या एकांकिका व नाट्यकृतींवर मी लिहिलेला 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार- चं. प्र. देशपांडे' हा प्रदीर्घ लेख प्रकाशित होणार आहे. हीच माझ्याकडून त्यांना वाढदिवसाची भेट.

Rajesh Sonawane is with Champra Deshpande.

·

चं. प्र. सर, HAPPY BIRTHDAY !!!
श्रेष्ठ नाटककार, कवी, विचारवंत
चं.प्र. देशपांडे सर यांचा आज वाढदिवस...
काळ जसा पुढेपुढे सरकत जातो,
तसतसे आपले साहित्य आणि साहित्यिक
outdated होत जातात, असा आपला एरवीचा अनुभव.
याला जवळजवळ एकमेव, खणखणीत आणि सणसणीत अपवाद म्हणजे चं. प्र.सर.
सरांचे श्रेष्ठ साहित्य आजही नव्या पिढीशी सुसंवादी आहेच ; पण त्याच्याही पुढे जाऊन वयाच्या ७८ व्या वर्षीही सर सोशल मिडियावर कार्यरत आहेत. तेथील वाद - संवादात हिरीरीने भाग घेत आहेत. स्वतःचे सर्व साहित्य त्यांनी ' चंप्रलेखन ' http://www.champralekhan.com/ या वेबसाईटवर आणले आहे आणि त्याच्या अद्ययावतीकरणाचे जटील, क्लिष्ट कामही नुकतेच हातावेगळे केले आहे. त्यांचा हा उत्साह केवळ तरूणांचाच नव्हे ; तर तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनाही लाजवणारा आहे.
सर आमचे फेसबुक फ्रेंड आहेत,
हे आमच्यासाठी अत्यंत भूषणावह आहे.
सर, वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !!
आपणास आरोग्य, दीर्घायुष्य लाभो ......

संभाजी सावंत
चंप्र थोर कवी आहेत, म्हणूनच थोर नाटककार आहेत. मराठीत त्यांच्यासारखा उत्तम सहजवादी नाटककार दुसरा नाही. असल्यास मला माहीत नाही.
चंप्र सर, वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

Sameer S. Dalvi

·

'दैनिक महानगर'साठी लिहिलेला हा लेख दोन वर्षांपूर्वीचा असला, तरी चंप्रंच्या वाढदिवसानिमित्त त्याला पुन्हा उजाळा देता येऊ शकतो, असं वाटल्यामुळे पुन्हा देत आहे.

दैनिक आपलं महानगर - सारांश

जगण्यातील गधडेपणाचा शोध -

एकूणच भारतीय रंगभूमीला बहुविध आशयाची नाटकं लिहीणा-या अनेक थोर नाटककारांची परंपरा आहे. पण नाटकं लिहीता लिहीता कवी म्हणून सुद्धा आपली स्वत:ची अशी नाममुद्रा उमटवणारे मराठी नाटककार म्हणून चटकन आठवणारी नावं म्हणजे राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे आणि वि. वा. शिरवाडकर होत. गडकरी 'गोविंदाग्रज' या टोपणनावाने, अत्रे 'केशवकुमार' या नावाने कविता करीत असत तर शिरवाडकरांचे 'कुसुमाग्रज' हे टोपणनाव आपल्या सगळ्यांच्या चांगलंच परिचयाचं आहे. कुठले नाटककार नाटक लिहीताना कवितेच्या प्रांतातही मुशाफिरी करत होते, हे सांगण्याचं या लेखाचं प्रयोजन नाही. परंतु नाटककार असण्यासोबतच समांतरपणे तितक्याच ताकदीची अभिव्यक्ती कवितेतून करणारे नाटककार मराठी रंगभूमीवर मोजकेच आहेत. इतकंच नव्हे तर, नाटककार हा 'कवी' असणं अपरिहार्यच आहे असं वाटावं, इतपत कवी म्हणून आपली स्वतंत्र प्रतिभा या नाटककारांनी दाखवून दिली आहे. अशा मोजक्या नाटककारांपैकी एक म्हणजे चंद्रकांत प्रभाकर देशपांडे !

नव्वदच्या दशकाच्या अखेरीस 'आविष्कार'च्या माहीमच्या जागेत जे सांस्कृतिक केंद्र दर महिन्याला चेतन दातार चालवत असे, त्याचा मी नियमित प्रेक्षक होतो. तिथे चंप्रंच्या नाटकांशी माझा पहिल्यांदा परिचय झाला. अर्थात, चंप्र त्याच्याही अनेक वर्षे आधीपासून नाटक लिहीत होतेच. पण तेव्हा पाहिलेल्या 'नाणेफेक', 'बुद्धीबळ आणि झब्बू', 'समतोल', 'डावेदार' आणि 'ढोलताशे' या नाटकांमुळे चंप्रंची एक कसदार नाटक लिहीणारे बुद्धिमान नाटककार म्हणून मला आणि माझ्या पीढीतल्या अनेक नाट्यरसिकांना ओळख झाली. पुढे उत्तरोत्तर ती ओळख त्यांच्या इतर नाटकांच्या वाचनातून दृढच होत गेली. असं असलं तरी त्या पलीकडे, नाटककार चंप्रंच्या लेखन व्यक्तिमत्वाचा आणखी एक अनोखा आयाम आहे आणि तो म्हणजे त्यांच्या कविता ! सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे नाटककार हा 'कवी' असणं अपरिहार्यच आहे असं वाटावं इतक्या सहजतेने चंप्र कविता लिहीतात. तेव्हा त्यांच्यातल्या नाटककार आणि कवीचा जो मेळ माझ्या तोकड्या रसिकतेला जाणवला, तो थोडक्यात सांगावासा वाटतो.

नाटककार चंप्र आपल्या जवळ जवळ सगळ्याच नाटकांतून मानवी जगण्यातील ॲब्सर्डिटीचा, त्यांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर जगण्यातील गधडेपणाचा उभा आडवा तिरकस शोध घेत आले आहेत. त्या शोधातून त्यांना दिसलेला गधडेपणा खुमासदार पद्धतीने संवादांतून सांगणं, हे त्यांच्या नाटकांचं मोठं वैशिष्टय आहे. त्याशिवाय, मानवी संबंधांतील - मग ते समाज म्हणून असोत वा स्त्री-पुरूष म्हणून असोत - गोम आणि गोची त्यातल्या खाचखळग्यांसकट दाखवून देणारी नाटकं हा चंप्रंचा नाटककार म्हणून मोठा विशेष आहे. त्यांच्या संकेतस्थळाला भेट दिली असता आपल्याला प्रश्नांची एक छोटेखानी मालिका दिसते. त्यावर चंप्रंचे असलेले उत्तर हा त्यांचा लेखक म्हणून असलेला पवित्रा अधोरेखित करते. 'मानवी जगण्याचे प्रवाही, कृतिशील भान भाषेत व्यक्त होणे म्हणजे सर्जक लेखन'. चंप्रंचे हे विधान त्यांच्या आजवरच्या लिखाणाच्या तजुर्ब्यावर आधारलेले आहे, असं म्हटलं तर असे सर्जक लेखन करण्यासाठी त्यांना कवितेचा फॉर्म जवळचा न वाटता तरच नवल ! खरंतर नाटक लिहीता लिहीताच समांतरपणे कविता लिहीणं हे चंप्रंच्या लेखन कारकीर्दीच्या सुरूवातीपासूनच असल्याचं आढळून येतं. म्हणूनच नाटककार आणि कवी असा त्यांचा समांतरपणे सुरू असलेला लेखन प्रवास हा त्यांच्या नाटक आणि कवितेतील अभिव्यक्तीचा अन्योन्य संबंध दाखवून देणारा आहे. किंबहुना, दोन अंकी नाटकातून जे साधता येत नाही ते एका

कवितेतून साधता येऊ शकते, अशी जाणीव लेखनाच्या एखाद्या टप्प्यावर चंप्रंना नक्की झाली असावी. त्या जाणिवेतूनच त्यांच्या कवितेचा इतका मोठा पैस ते निर्माण करू शकले असावेत, असं मला वाटतं.

सगळीकडेच वैयक्तिक, सामाजिक आणि परिवर्तनशील आशयाच्या कवितांचा अक्षरश: गदारोळ असतांना चंप्रंच्या कवितेने एक वेगळी वाट चोखाळलेली दिसते, ती म्हणजे नकविता, जिला इंग्रजीत आपण अॅंटी-पोएट्री या संज्ञेने ओळखतो. मध्यंतरी 'नकविता' लिहीणा-या जगभरातील महत्वाच्या कवींच्या कवितांचा अनुवाद करण्याचा प्रकल्प चंप्रंनी हातावेगळा केला. त्या अनुवादावरून त्यांचे नकवितेच्या वेगळ्या वाटेविषयी वाटणारे प्रेम आणि आस्था पुरेपूर जाणवते. उदाहरणादाखल त्यांची स्वत:ची एक कविता इथे उद्धृत करतो,

आपण एकटे होतो
आपण एकटे होतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
आपल्याला अपमान सहावा लागतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
कुणी फसवते तेव्हा
कुणी बदनामी करते तेव्हा
कुणी क्षुद्र समजते तेव्हा
कुणी गैरसमज करून घेते तेव्हा
कुणी काही आरोप करते तेव्हा
कुणाचातरी खूप राग येतो तेव्हा
कुणाला सुधारायची गरज वाटते तेव्हा
जे जसे आहे ते तसे खटकत राहते तेव्हा
मतभेद समोर येतात तेव्हा
जगात काय बदल व्हायला हवेत
हे आपल्याला जाणवते तेव्हा
सगळी माणसे स्वार्थामुळे आंधळी झाली आहेत
असे वाटते तेव्हा
आपण फार फार केविलवाणे होतो
जितके केविलवाणे तितकेच हिंसक होतो
आपले आपण संतप्त धोक्याचे

वरील कविता ही फक्त त्यांच्या नकवितेचा परिचय करून देण्यासाठी वानगीदाखल उद्धृत केलीय. त्यांच्या संकेतस्थळावर या नकवितांचा खजिना आहे. इच्छुक रसिक www.champralekhan.com या त्यांच्या संकेतस्थळाला भेट देऊन या कवितांचा आनंद घेऊ शकतात. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे चंप्रंनी नाटक आणि कवितेसहीत त्यांचे समग्र साहित्य त्यांच्या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून दिलं आहे. माझ्या माहितीनूसार,

आपल्या साहित्याचं अशाप्रकारे दस्तावेजीकरण करणारे आणि ते रंगकर्मी आणि वाचकांना विनामूल्य उपलब्ध करून देणारे चं.प्र.देशपांडे हे भारतातील बहुदा एकमेव आणि विरळा लेखक असावेत.
नाटक आणि कविता या दोन्ही फॉर्ममधील त्यांच्या अभिव्यक्तीची जातकुळी आणि आशयातील वैश्विकता (Universality) लक्षात घेता चंद्रकांत प्रभाकर देशपांडे हे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधीत्व करू शकतील अश्या मोजक्या लेखकांच्या पंक्तीत नि:संशयपणे बसतात, हे इथे नम्रपणे नमूद करावंसं वाटतं.
- समीर दळवी.
वाढदिवसाचे अभिष्टचिंतन, चंप्र !

रवीन्द्र दामोदर लाखे

.

माझे मित्र चंप्र देशपांडे यांचा जन्म दिवस आणि जे कृष्णमूर्ती यांचा जन्म दिवस एकाच दिवशी असतो हा योगायोग नाहीय. चंप्र देशपांडे मध्ये मला नेहमी जे कृष्णमूर्ती ऐकू येतात. पण आवाज चंप्र देशपांडेंचा असतो. अर्थात केवळ पुस्तकी जे कृष्णमुर्ती त्यांच्यात दिसत नाहीत. कृष्णमूर्तींचे तत्वज्ञान आत्मसात करून ते त्यांनी अनलर्न केलेले जाणवते.चंप्र म्हणजे एक दिलखुलास माणूस, एरवी आपल्याला जाणवतही नाही की हा माणूस लेखक आहे. ते कवी नाटककार आहेत याची यत्किंचितही जाणीव त्यांच्या सहवासात आलेल्याला आणि असलेल्याना होत नाही.
त्यांचा आज वाढदिवस आहे.
त्यांच्या आरोग्यपूर्ण दीर्घायुष्यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा आणि प्रेम.

वाढदिवसानिमित्त दिलेल्या शुभेच्छांबद्दल सर्वांचे आभार आणि माझ्याही सर्वांना शुभेच्छा !

" --- पुन्हा आमरण उपोषण ! "
--- टीव्ही.

आजही प्रस्तुत ठरणारे आमच्या चिरंजीवांचे बालपणीचे वाक्य -- " अरे, तो कसला मला घाबरतो -- मीच त्याला घाबरतो ! "

मी आस्तिकही नाही आणि नास्तिकही नाही -- धर्मनिरपेक्ष अध्यात्म मला अत्यंत महत्त्वाचे वाटते !

मराठी साहित्यातले स्थान

पूर्वी मराठी साहित्यक्षेत्र, आभासी का असे ना, पण एकमय होते. एखाद्या लेखकावर वा एखाद्या कलाकृतीवर अनेक समीक्षक लिहीत आहेत, असे दृश्य दिसत असे. त्यामुळे, बऱ्यापैकी काम झाल्यावर, साहजिकच, एखाद्या लेखकाला

वाटे की मी ' जाण्यापूर्वी ' माझे साहित्यातले स्थान काय आहे ते मला कळायला हवे. आता तसे कुणा लेखकाच्या मनातही येणार नाही. एक तर विचक्षण समीक्षक फारसे नाहीतच आणि मुख्य म्हणजे हे साहित्यक्षेत्र खूप विखंडित झालेले आहे. आता तुम्हाला तुमचे स्थान कळायला हवे असेल तर तुमचे जे चार चाहते आहेत, ते सांगतील तेच ! बाकीचे वाचणारही नाहीत ! असले स्थान घेऊन काय चाटायचेय ? आता प्रत्येक लेखक स्थानाच्या आणि काळाच्या पलीकडे आहे !

--- ००० ---

मराठी समाजाला आत्मज्ञानाला उपयोगी पडेल अशी पोस्ट --

Rahul Pungaliya

.

मराठी साहित्यिक सांस्कृतिक विश्वाची तोंड ओळख

मराठी सुसंस्कृत साहित्यिक धाटणीचे लोक सनातनी पुरोगामी म्हणवता येतील .यांचे

सनातनत्व सनातनी हिंदुत्ववादाची हुबेहूब उलट प्रतीमा आहे.

धर्माची काडीची कल्पना नसल्यामुळे हे स्वतःला निधर्मी समजतात. विज्ञानाच्या मर्यादा उपयोग आणि परिणाम देखील समजत नसल्यामुळे हे विज्ञानवादी ,अंधश्रद्धा विरोधी असतात. भौतिक विज्ञानाच्या पद्धती मानवी समाज व मन समजून घेण्यासाठी जशाच्या तशा वापरण्याकडे यांचा कल असतो. त्यामुळे सरसकट समतावाद,सामाजिक डार्विनवाद, मेंदूच्या ज्ञानाने मनाची सर्जनशीलतेची प्रतिभेची उकल करणे इथे आढळते.

लब्धप्रतिष्ठित वरिष्ठ, कनिष्ठ, मध्यमवर्गातले असल्याने व्यवस्था अबाधित राहण्यात यांचे हित आहे. त्यामुळे त्यांचा क्रांतिकारी मार्क्सवादाला विरोध आहे. तो विरोध मार्क्सवादाला नसून हुकूमशाहीला आहे, असा पळपुटा युक्तिवाद ते नेहमीच करत आले आहेत.

यांना साहित्य आणि कलांचे पूर्ण अज्ञान आहे .सामाजिक व आर्थिक व्यवहार ,विज्ञान तंत्रज्ञान हे सोडून जे काही उरते त्यासाठी कला असतात म्हणजे भावनांची अभिव्यक्ती करण्यासाठी, आक्रोश करण्यासाठी जीवन सुशोभित करण्यासाठी कला असतात असा यांचा समज आहे. प्रस्थापित जीवन पद्धती न बदलता कलेचा उपयोग व्हावा असा सद्हेतू हे बाळगतात. प्रत्येक गोष्टीचा काही ना काही उपयोग असायलाच हवा असा उपयोजीततावाद यांचे मूळ तत्त्व आहे.

कलेतील समाजजीवन व व्यक्तीमध्ये आमुलाग्र बदल घडवणाऱ्या क्रांतिकारी शक्यता जितक्या बोथट करता येतील,वगळता येतील असा हेतू असल्यामुळे. हे आपल्याला परवडेल अशा मध्यमवर्गीय स्वच्छंदतावादी, माफक विद्रोही वास्तववादी ,मानवतावादी सर्व समावेशक दृष्टिकोन असलेल्या कलेला जोपासतात. प्रौढ साक्षरांना समजेल व थोडी गंमत वाटेल इतपतच प्रायोगिकता त्यांना रुचते.अर्थातच ती कला नुसतीच सुमार नसते, तर ती तेलकट, गुळगुळीत आंजारणारी गोंजारणारी आणि आपल्या योग्यतेची आपल्याला खात्री देणारी असते. थोडक्यात ती नारसीस्टीक आत्मलुब्ध कला असते .

शहरी मध्यमवर्गाची ही कला आणि संस्कृती, समाजातील सर्व स्तरांना वेचक प्रतिनिधित्व देत असते. शहरी मध्यमवर्गात आता सर्वच जाती-जमाती स्त्री पुरुष आणि माजी ग्रामीण जन यांचा भरणा असल्यामुळे सगळ्यांच्याच सोयीचे हे सांस्कृतिक अवकाश आहे. एकमेकांचे कौतुक करणं, सततचा उत्सवी कोडगेपणा ही यांची भावनिक ओळख आहे. पुरस्कार, संमेलनं,प्रकाशनं हे यांचे सण समारंभ आहेत. यांची 'विद्रोही' लोकशाही मूल्यांची मागणी ही देखील गंमतीजमतीची आणि जाता जाता कॅज्युअली करायची बाब आहे. बाकी गुंतवणुकी, फार्म हाऊस चंगळवादी जीवनशैली या गोष्टींमध्ये यांच्यात आणि यांच्या कट्टर राजकीय विरोधकांमध्ये काडीचा फरक नाही. हिंदुत्ववादी जसे दलित विचारवंतांना सामावून घेतात ,सांभाळून घेतात तसेच पुरोगामी देखील एकमेकांना सांभाळून घेतात. त्यांच्यातील विरोध लटकाच राहतो.

थोड्या थोड्या वर्षांनी काही व्यक्तींचे स्तोम माजवणे बडेजाव करणे, थोडक्यात समाजामधले जसे हिरोगिरीचे कल्चर आहे, त्याच पद्धतीचे हे साहित्यिक सांस्कृतिक हिरोंच्या अवतीभोवती असलेल्यांचे कोंडाळे असते.कधी पुल कधी नेमाडे कधी अवचट तर कधी कमल देसाई कोलटकरआणि ढसाळ आणि असे नवे नवे अनेक या यादीत समावेश करता येण्याजोगे

आहेत. जर त्यांना मोठे हिरो मिळाले नाहीत तर एकमेकांनाच ते आलटून पालटून हिरो बनवतात.

या विश्वाची सांस्कृतिक सहनशीलता शून्य आहे. वेगवेगळ्या प्रकारची सेंसरशिप ,सेल्फ सेंसरशिप ,मौलिक साहित्याकडे दुर्लक्ष करणे अशा पद्धती इथे कार्यरत आहेत हिंदुत्ववाद्यांच्या हुकूमशाहीबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार यांना नाही. हिंदुत्ववादी रानटी असभ्य आक्रमक आहेत हे तमासगीर बघे आहेत एवढाच फरक. इथे चांगली अस्सल कला फळणे,फुलणे जवळजवळ अशक्य आहे.

' ओळख परेड ' हा एकांकिका संग्रह लौकरच येईल. हे झाले की माझे पूर्ण नाट्यलेखन पुस्तकरूपात उपलब्ध असेल.

हिल्लोळ हरवून आतबाहेरचा ( कविता संग्रह )

--- प्रज्ञा दया पवार -- प्र ० – पॉप्युलर प्रकाशन

हा कविता संग्रह मला नुसताच आवडलेला नसून महत्त्वाचाही वाटतो. याची कारणे मी नंतर देणार आहे. पण, त्याचबरोबर, या निमित्ताने काही लिहिणार आहे.

साहित्यबाह्य क्षेत्रात तेंडुलकर म्हणाले होते की मला बंदूक द्या, मी मोदींना गोळी घालू इच्छितो. त्यांची ऊठबस डाव्यांमध्ये होती, ते डाव्यांचे समर्थक होते. प्रत्येक लेखकाने राजकीय भूमिका घ्यायला हवी आणि ती डावीच असायला हवी, असे वाटणाऱ्यांना हे अर्थातच आवडणारे होते. पण, तेंडुलकर त्यांच्या लेखनात, विशेषत: नाट्यलेखनात अशा राजकीय भूमिकेला बांधील होते का ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच येईल. त्यांच्या आकलनाप्रमाणे एकूण मानवी जगण्याचा आवाका घेणे हेच त्यांच्या लेखनातून घडत होते. त्याशिवाय ते ‘ सखाराम बाइंडर ‘ सारखे नाटक लिहू शकले असते का, हा प्रश्नच आहे. ‘ कन्यादान ‘ तर विवाद्य ठरल्याचे इथे आठवते. तसेच उदाहरण मी सतीश तांबे यांचेही देईन. ते फेसबुकवर बरेचसे डावे बोलताना दिसतात, बीजेपीच्या विरोधात असतात, पण, ही राजकीय भूमिका त्यांच्या कथालेखनावर स्वार होत नाही. उदाहरणार्थ, त्यांची, ‘ पळवाटा वाटा

पाताळाच्या ‘ ही कथा वा अन्य बऱ्याच कथा बघा. अमुक एक वैचारिक ठामपणा अभिव्यक्त न करता त्यांच्या कथा खुलेपणाने जगणे ‘ पाहणाऱ्या ‘ आहेत. तसेच कवितेतले उदाहरण द्यायचे झाल्यास, राहुल पुंगलिया यांचे देता येईल. ते स्वत:ला गांधीवादी म्हणवतात पण कोणत्याही वैचारिक साच्यात वा निष्कर्षात त्यांची कविता अडकलेली नसते. कोणतेही चांगले लेखन हे व्यक्तिगत मतांच्या मर्यादेत बद्ध नसते, हाच याचा अर्थ. लेखक जेव्हा खुला असतो, मानवी जगण्यातल्या समस्यांना वैचारिक अंतिमता देणारा नसतो तेव्हाच तो काही मौल्यवान निर्मिती करू शकतो, हेच अनेकदा दिसून येते. जगातल्या अनेक मोठमोठ्या कलावंतांनीही हे सांगितलेले आहे.

‘ हिल्लोळ – ‘ या कवितासंग्रहात अनेक कविता या अशा ‘ मानवी ‘, अमुक एक वैचारिक दिशा न देणाऱ्या आणि म्हणूनच अधिक व्यापक आशयाच्या आहेत, असे मला जाणवते. स्त्रीच्या कविता असून त्या स्त्रीवादातही बद्ध होत नाहीत. सर्व स्त्री-पुरुषांना आणि कोणत्याही व्यक्तीला जगण्यात प्रस्तुत ठरतील अशा या कविता आहेत. हिल्लोळ म्हणजे दु:ख वा वेदनायुक्त कल्लोळ वा गोंधळ. असा गोंधळ अनुभवत नाही असे कुणीच नसते. इथे तो निर्ममपणे ‘ पाहिला ‘ जातो, हे विशेष आहे. प्रज्ञा दया पवार या पुरोगामी विचारांच्या, जगण्यात तशा तीव्र प्रतिक्रिया देणाऱ्या म्हणून आपल्याला माहीत असल्या तरी त्यांची ती प्रतिमा मनात बाळगून वाचू नयेत अशा बऱ्याच कविता या संग्रहात आहेत. यामुळेच, यातल्या बऱ्याच कविता या वाचून ‘ संपत ‘ नाहीत. यासाठी उदाहरणादाखल मी, ‘ आतला दरवाजा ‘ ( पान २४ ), ‘ नसलेल्या परमेश्वरासारखं ‘ ( पान ५१ ), ‘ पुनर्लेखन ‘ ( पान ६० ), ‘ गेली सगळी संबोधनं वाऱ्यावर उडून गेली ‘ ( पान ६३ ), ‘ गुहेच्या तोंडाशी ‘ ( पान ६६ ), ‘ तुला नाही चेहरा कुठलाच ‘ ( पान ७३ ) आणि ‘ हिल्लोळ हरवून आतबाहेरचा ‘ ( पान १६९ ) या कवितांचा उल्लेख करेन. मला या कविता विशेष वाटतात. अशा आणखीही कविता या संग्रहात आहेत.

या कविता जर एखाद्या विचारसरणीने प्रेरित नाहीत तर मग त्या कवयित्रीची व्यक्तिगत सुखदु:खे वाचकांच्या मनात परावर्तित करणाऱ्या आहेत का ? एखादा मूड, एखादी मन:स्थिती सांगणाऱ्या आहेत का ? तर तसे गुंतणेही इथे जाणवत नाही. इथे पूर्ण ‘ पाहून ‘ बाजूला होणे आहे. अनुभव हे सत्य, असत्य वा कल्पित असतील – त्यामुळे हे नुसते फोटोग्राफिक चित्रणही नाही. मनाचे गोंधळ, भ्रम, आभास यांनाही इथे वाव आहे. खालील कविता पहा –

पुनर्लेखन

सनी लिओनी नाव असलेली स्त्री<br>
मी असले<br>
तरी मी ती नाही.<br>
माझं नाव सांगताच मला आरपार न्याहाळणाऱ्या नजरा<br>
तिच्याचसाठी असतात या उघड सत्याने<br>
माझा जीव भांड्यात पडतो नि मला घायाळही करतो.<br>
एक सेक्शुअल ऑब्जेक्ट<br>
बनून राहण्याचं<br>
मुक्तमोकळं स्वातंत्र्य लिओनी जगते.<br>
तिच्या बेडरूमच्या खिडक्या थेट आकाशातच सताड उघडतात

तिच्या चादरीवर
भांडवली मऊशार पिसं
स्वतःला टांगून घेतात
वासनेच्या निळ्याजांभळ्या फुलांचं मत्त रान
दौडत जातं रक्तातून
तिच्या निव्वळ असण्याने आभासी.
ती एकटी असताना काय करत असेल
पुरुषांचे अतींद्रिय आकार छळत असतील का तिला स्वप्नातही ?
मीच आहे पिकासोची वीपिंग वुमन
भयानक दुःखाच्या शरीरात राहणारी
जसं मला वाटतं कैकदा
तसं वाटत असेल का तिलाही ?
गच्च भरलेल्या विहिरीतून
उसळावेत पाण्याचे प्रपाती लोट
नि क्षणार्धात कोरड्याठाक विहिरीतून
वर सरसरत यावा स्वतःचाच अनोळखी आवाज
चकित
भयचकित
ऐकतेय सनी लिओनी
एक तीक्ष्ण खिळा
लपवून ठेवलाय तिने हातात
रात्रभर खोदत असते ती टोकदार अग्राने
सगळे गाढ झोपेत असताना
तो प्राचीन अंधारलेला खंदक.
स्वातंत्र्याचे करुण डोळे
चमकून उठतात
पलीकडे नेणारं भुयार
नाहीच सापडत कधी सनी लिओनीला
सनी लिओनी नाव असलेली स्त्री
मी असले
तरी मी ती नाही
छे .. छे .. हे तिचं पुनर्लेखनही नाही

अथवा

माझंही.

ही काही करमणुकीसाठी लिहिलेली उथळ कविता नाही. जगण्यासाठी वापरात येणाऱ्या मानवी प्रतिमांचा खेळ ही कविता मांडते. कुणाचीही कोणतीही प्रतिमा असूही शकते आणि नसूही शकते ! कोणतीही प्रतिमा स्वीकारली तरी तिला कशाचीही पुनरावृत्ती म्हणता येत नाही. आलटून पालटून येणाऱ्या या कदाचित भासमय प्रतिमांतून ही कविता प्रतिमेच्या सत्यतेचा प्रश्न समोर आणते. यापुढची प्रत्येक वाचकाची कविता ही त्याची स्वतंत्र असू शकते. ज्या शक्यता आपल्या जगण्यात नाहीत त्या असूही शकतात असा भासमय व्यूह तयार करून ही कविता, एक प्रकारे, सर्वच प्रतिमांचे अस्तित्व धोक्यात आणते. ही चिंतनशीलता कोणताही कवी जाणीवपूर्वक, ठरवून आणू शकणार नाही. मन खुले सोडण्याची कलेतली सिद्धी त्यासाठी असावी लागणार.

अशा, वैचारिक भूमिकावादी नसलेल्या पण मानवी जाणयुक्त असलेल्या बऱ्याच कविता या संग्रहात आहेत. या कविता सामाजिक-राजकीय हेतू बाळगणाऱ्या वा अमुक बाजू घेणाऱ्या नाहीत. या सर्व माणसांसाठी आहेत. हे सगळ्यांचे जगणे आहे. कलाबाह्य, व्यावहारिक क्षेत्रात कोणतेही मतभेद असोत, या कविता सर्वांनीच आत्मीयतेने वाचाव्यात अशा आहेत. कलेच्या असण्यातून हेच सौहार्द आणि समज निर्माण व्हावी हीच तर कलेची मूल्यात्मकता. म्हणूनच. वाचकांनी, कलवंताच्या आपल्याला आवडणाऱ्या वा न आवडणाऱ्या प्रतिमेचे ओझे घेऊन कोणतीही कला वा कविता पाहणे चुकीचे ठरते. ही समज सर्वच वाचकांनी बाळगायला हवी. कोणत्याही कलावंताचे अमुक वागणे वा विचार पटत नाहीत म्हणून त्याला बाद करणे हे कलेतली प्राथमिकही समज नसल्याचे लक्षण आहे.

--- ००० ---

ओळख परेड

हा एकांकिका संग्रह आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.

ओळख परेड

( एकांकिका संग्रह )

--- चं. प्र. देशपांडे

समाविष्ट एकांकिका

दंगल

ओळख परेड

समस्या सोडवण्याचा सराव

समुदाय

अस्तित्व

स्टालिन

ट्रेलर

खडक

जोडपी

ऑफीस

रिलीफ

आणि

परिशिष्टात गिरीश पतके यांचा लेख

पाने २८६ – किंमत रु.४००=००

सवलतीची किंमत रु.३००=०० ( पोस्टेजसह )

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

माझ्या उपलब्ध पुस्तकांची माहिती ---

| पुस्तकाचे नाव | किंमत रु. | सवलतीची किंमत रु. |
| --- | --- | --- |
| १. आवर्तने | | |
| ( कविता-आशय-आकलन ) | ४५० | ३४० |
| २. चार पुरुषार्थांची चार नाटके | ६०० | ४५० |
| ३. वस्तू आणि इतर | | |
| सहा दीर्घांक | ४०० | ३०० |
| ४. पाच ॲब्सर्ड नाटके | ५०० | ३७० |
| ५. खुल्लम खुल्ला | | |
| ( एकांकिका संग्रह ) | ४०० | ३०० |
| ६. नाणेफेक आणि | | |
| इतर पाच नाटके | ४०० | ३०० |
| ७. ओळख परेड | | |
| ( एकांकिका संग्रह ) | ४०० | ३०० |
| एकूण --- | ३१५० | २३६० |

यांतील कोणतेही एक वा अनेक पुस्तके सवलतीच्या निर्देशित किंमतीत मिळतील. सवलतीची प्रत्येक किंमत पोस्टेजसह आहे.

एकूण रु. ३१५० ची ही सात पुस्तके सवलतीत रु. २३६० ला पूर्ण संच विकत घेणाऱ्यास ‘ तंबाखूची टपरी ‘ हा जगातल्या ५८ कवींच्या काही कवितांच्या अनुसर्जनांचा कविता संग्रह मोफत मिळेल.

पैसे पाठवताना ते कोणत्या पुस्तकासाठी वा पुस्तकांसाठी की पूर्ण संचासाठी पाठवले आहेत, ते स्पष्ट करावे.

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

चलो दिल्ली --

माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकाचा हिंदी अनुवाद ' आंख मिचौली ' या नावाने २२ व २३ जूनला दिल्लीत सादर होत आहे.

जे तिकडे असतील त्यांनी पाहण्याचे जमवावे.

-- ००० ---

'मन'

Written by Champra Deshpande

Directed by Abhijeet Zunjarrao

Solo performance by Ramesh Wani

Premier at

Godrej Dance Theatre

NCPA

Sunday, 16th june 5pm

Tickets available at box office and book my show.

Do come and do share to your groups and friends.

@highlight

अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रोडक्शन यांचं Champra Deshpande लिखित 'मन' हे नवीन नाटक दीर्घांक स्वरूपात रंगभूमीवर सादर करतोय.

या नाटकाची प्रस्तुती Rajeshri Shinde Bruce Guthrie 'एनसीपीए' ची असणार आहे.

या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग दिनांक १६ जून २०२४ रोजी, संध्याकाळी ५ वाजता, गोदरेज डान्स थिएटर् नरीमन पॉइंट्, एनसीपीए इथे सादर होणार आहे.

'मन' हा दीर्घांक स्वरूपात सलग १०० मिनिटांचा एकपात्री नाट्यानूभव असणार आहे. अभिनेता Rammesh Wani यात प्रमुख भूमिका साकारतोय.

याची तिकिटे book my show वर उपलब्ध झाली आहेत.

https://in.bookmyshow.com/plays/mann/ET00396072

अधिक माहितीसाठी एनसीपीए बॉक्स ऑफिस संपर्क +91 22 66 223754

नम्र विनंती आहे की आजवर माझ्या नाटकांना जसा प्रतिसाद दिलात तसा याही नाटकाला आपण भरभरून प्रतिसाद द्यावा.

आजच आपली १६ जून ही तारीख, वार रविवार आणि वेळ संध्याकाळी ५ राखून ठेवा.

आमच्या सोबत तुम्हा सगळ्यां करता हा वेगळा अनुभव असेल हे नक्की. तेंव्हा तुमच्या हाउसफुल प्रतीसादाची आम्ही सगळेच वाट बघतोय!!

□

| निरीक्षक | अंदाज |
|---|---|
| अ | ३०० |
| ब | ४१५ |
| क | १५० |
| ड | ०९८ |
| ई | २५० |
| फ | ५०३ |
| एकूण | १७१६ |
| सरासरी | ०२८६ |

बरेचजण म्हणताहेत, मरू द्या, काय गडबड आहे, बघू ४ ला !

Sameer S. Dalvi is with Champra Deshpande.

१३ वर्षे झाली ते समजले सुद्धा नाही चंप्र !

अभिरूचीला एक वळण दिलंत तुम्ही. मनस्वी धन्यवाद !!

समकालीनता

मराठी साहित्यात वास्तववाद म्हणजे अजूनही सर्वेसर्वा आहे. काय म्हणावा वास्तववादाचा अर्थ ? बदलत्या भौतिक परिस्थितीवर आधारित असणे ? जुन्या काळातले अनुभव असले तरीही ते ‘ दिसणाऱ्या ’ माहितीरूप निवेदनातून येणे, असेही एक असेल. पण, मुख्यत: वास्तव हे, जुने असो वा नवे, ते लेखकाच्या प्रतिक्रियेसहच येते. हे लक्षात घेतले तर अमुक एक वास्तव म्हणजे वास्तव, असे म्हणता येत नाही. आज लिहिणाऱ्या प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. आज लिहिणाऱ्या दोन चांगल्या लेखकांचे उदाहरण घेऊ. प्रणव सखदेव आणि रवींद्र पांढरे, हे लेखक बघा. त्यांच्या लेखनाचे अनुभवद्रव्य म्हणा की दिसणारी माहिती म्हणा, ही खूपच वेगळी आहे. याच पद्धतीने प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. हे लक्षात न घेता साहित्याची समकालीनता ही संकल्पना काहींना मूल्यात्मक वाटते, असे दिसून येते. एका ढोबळ अर्थाने प्रणव सखदेवच्या साहित्यात समजा समकालीनता आहे, असे आपण म्हटले, तर, जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाचा काळ येईल तेव्हा ते साहित्य कालबाह्य समजावे लागेल का ? हा एक प्रश्न तर आहेच पण काही अधिकच हेकट आणि संकुचित कल्पनाही दिसतात. समकालीन वास्तव हे लेखकाच्या मतासह, भूमिकेसह यायला हवे, ही ती कल्पना. म्हणजे आजच्या लेखनात, उदाहरणार्थ, मोदींच्या हुकूमशाहीबाबत राग वा विरोधकांच्या पोटदुखीबाबत कीव व्यक्त व्हायला हवी. इथे, एक सुचवायचे आहे की या सर्व कल्पना संकुचित, साहित्याला रटाळ करणाऱ्या आहेत.

जयंत पवार हे माझे मित्र होते, पण, त्यांचे विचार मला पटत होते, असे नव्हे. त्यांनी असा एक प्रश्न मांडला होता की वास्तव आता इतक्या वेगाने बदलते आहे की ते लेखकाला समजून त्याच्या लेखनातून व्यक्त होईपर्यंत जुने होते आहे ! मुळात, आधी वास्तव समजून घ्यायचे आणि मग ते आपल्या प्रभावासह मांडायचे – ही साहित्याची कल्पनाच खोटी आहे. प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते याचा अर्थच वास्तव समजणे असे काही सत्य अस्तित्वात असू शकत नाही. आणि साहित्य म्हणजे स्वमतयुक्त वास्तवाची मांडणी किंवा त्या त्या काळाचे डॉक्युमेंटेशन वा दस्तावेजीकरण हे पटण्यासारखे नाही. दस्तावेजीकरण आता इतर अनेक मार्गांनी होत असते, ती जबाबदारी आता साहित्याने झटकायला हरकत नाही.

आपण वास्तव समजून घेण्यासाठी वा ते नोंदण्यासाठी साहित्यनिर्मिती करतो वा साहित्याच्या संपर्कात येतो ही समजूतच मुळात फार थिटी आहे. ऐतिहासिक वा पौराणिक कलाकृती, शेक्सपियरची नाटके, कोणत्याही इतर प्रांतांतली वा देशांतली नाटके आपण का वाचतो वा पाहतो ? त्यात वास्तवनिरपेक्ष आणि लेखक-निरपेक्ष अशी मानवी जगण्याच्या भानाची प्रक्रिया असते म्हणून. आणि हे जगातल्या सर्वच मौल्यवान साहित्याबाबर खरे आहे. वास्तव कोणते आहे, अनुभव कोणता आहे याला महत्त्व देण्याच्या बालिशपणामुळेच काहीजण असे समजतात की निव्वळ अनुभव धारावीतल्या जगण्याचा असल्यामुळेच काही साहित्य एखाद्या मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्र असणाऱ्या साहित्याहून महत्त्वाचे असते.

माझे एक नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाच्या खोट्या, रचित डोलाऱ्यातून घडत जाते. एकजण म्हणाले की आता ते आजच्या काळाशी मॅच होत नाही तर दुसरे एकजण म्हणाले की हे कधीही ‘ आजचे ’ असणारे नाटक आहे. एक-दोन नाटकांत युनियन-मॅनेजमेंट संघर्षाचे वातावरण आहे – एकजण म्हणाले की आता कुठे उरलाय युनियनबाजीचा काळ ? त्याच्याहून किरकोळ उदाहरण म्हणजे माझ्या एका नाटकातल्या काळात फक्त लँड लाइन

फोन होते, मोबाइल नव्हते ! म्हणजे गेले ते नाटक रद्दीत ? असे होत नसते. कलेचा प्रमुख सर्जक प्रवाह म्हणजे काय, हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे.

--- 000 ---

रवीन्द्र दामोदर लाखे

.

Champra Deshpande तुमच्या इतिहास एकांकिकेची आठवण सतत येत राहील.

घाटकोपरच्या जाहिरात फलक कोसळण्यापासून ते दिल्लीतील बालरुग्णालयाच्या आगीपर्यंत ज्या ज्या दुर्घटना घडल्या आहेत त्या सर्वांमध्ये एक समान धागा आहे .

तो धागा आहे भ्रष्टाचाराचा. या धाग्याने एक दुर्गंधयुक्त फुलांची मृत्यूमाळ निर्माण केली आहे . ती दुर्गंधयुक्त फुले म्हणजे नोकरशाही , पोलीस आणि राजकारणी .

'Governments may come and go , beaurocracy is permanent'

या जगप्रसिद्ध नियमाला अनुसरून नोकरशाही राजकारण्यांना झुलवीत असते . निवडून आलेले लोक (?)प्रतिनिधी बराच पैसा खर्च करून तिथे स्थानापन्न झालेले असतात . पुढच्या निवडणूकीत निवडून येऊ अशी खात्री नसल्याने मिळालेल्या पाच वर्षांत झालेली भांडवली गुंतवणूक आणि त्या वरील व्याजासकट नफा हे किमान उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून हे महान लोकं कारभार सुरू करतात . या वेळी त्यांच्या असे लक्षात येते की या गुंतागुंतीच्या शासन व्यवस्थेबद्दल आपल्याला काहीही माहिती नाही . राजकारण्यांचे हे वैगुण्य नोकरशहांना बरोब्बर माहित असते . ते ' साहेबांना ' सांगतात ," तुम्ही काळजी करू नका साहेब , आम्ही कशासाठी आहोत . आम्ही तुम्हाला सांभाळतो , तुम्ही आम्हाला सांभाळा!"

इथेच nexus , मिली भगत , परस्पर हित संरक्षण वगैरे शब्दांनी मंडीत केलेला भ्रष्टाचार सुरू होतो .

ही जी व्यवस्था निर्माण झाली आहे त्यात सामान्य माणसाला कोणतेही स्थान नाही . कितीही क्षुल्लक दर्जाचं शासकीय काम असलं तरी तुम्हाला एका सांखळीतून जावे लागते . तुमच्या ओळखीच्या एखाद्या 'सद्गृहस्थाला' तुम्ही गाठता आणि तो तुम्हाला शासकीय कार्यालयाच्या आसपास फिरत असलेल्या एजंटला भेटवतो . हा एजंट म्हणजे भ्रष्टाचाराच्या hierarchy मधला सर्वात

शेवटच्या पायरीवरला असला तरी तो सर्वात महत्त्वाचा असतो कारण तो गिऱ्हाईक पकडतो . पुढचं सगळं सांगणं न लगे !

चं.प्र. देशपांडे यांची ' इतिहास ' ही एकांकिका हा विषय अत्यंत परिणामकारकपणे मांडते . मी ही एकांकिका १९८४ साली यशस्वीरीत्या दिग्दर्शीत केली होती .

पोलीस डिपार्टमेंट हा वेगळा विषय आहे .

पूर्वी राजकीय कार्यकर्त्यांची प्रतिष्ठा त्याचे राजकिय तत्त्वज्ञान , आकलन आणि अभ्यास यावर अवलंबून असायची . आता मात्र राजकारणात पुढे यायचं असेल तर पोलीस स्टेशन मध्ये तुमची किती प्रतिष्ठा आहे याला सर्वस्वी महत्त्व

आहे . पोलिसी गुन्ह्यात अडकलेल्या तथाकथित कार्यकर्त्यांना सोडवून आणणे हे राजकारणी लोकांचे आद्य कर्तव्य असते .

या सगळ्या मध्ये सामान्य माणूस भरडला जातो हे खरे असले तरीही आपणसुद्धा आरशात पाहिले पाहिजे . कळत नकळत आपण या व्यवस्थेत सामिल झालो आहोत . अनेक वेळा दुसऱ्यांच्या समस्येकडे ' आपल्याला काय करायचंय ' या attitude ने दुर्लक्ष करतो . पण ' जात्यामधले दाणे रडती , सूपातले हसती ' ही अवस्था तात्कालिक असते . कधी ना कधी तुम्ही जात्यात जाणारच .

धन्यवाद .

Every ideology is contrary to human psychology.

— Albert Camus, 1913-1960, French writer, Nobel 1957

' मीच एक शहाणा '

ही भावना टोकाला गेलेले दोनचार लोक माझ्या मित्र यादीत आहेत. ते काय करतात, तर माझ्या वॉलवर चाललेल्या चर्चेत मध्येच येऊन एक अत्यंत खोचक, उपरोधिक, कुत्सित व रोगट कॉमेंट टाकून पळून जातात. पळून जातात असे म्हणावे लागते कारण, त्यांच्या कॉमेंटला मी दिलेले उत्तर वाचण्याचा -- त्याची दखल घेतल्याचे लाईक देण्याचा -- सभ्यपणा त्यांच्याकडे नसतो. मग, येतात कशाला ते भाग घ्यायला ? तर कारण एकच -- मला जे समजते त्यापेक्षा वेगळे असे जगात असूच कसे शकते काही, याचा संताप त्यांना व्यक्त करायचा असतो. कट्टर मतांनी चर्चा होत नसते. चर्चेत भाग घ्यायचा तर जरा लवचिकता असावी लागते, दुसऱ्यांची मतेही ऐकून घेण्याचा धीर असावा लागतो. तो त्यांच्याकडे नाही, हे स्पष्ट आहे. मग, मी  हा त्रास का सहन करावा, असा मला प्रश्न पडतो. यापुढेही ते असेच करत राहिले तर, अनिच्छेने का असे ना, त्यांना ब्लॉक करणे हा एकच मार्ग मला स्वीकारावा लागेल. इलाज नाही. फेसबुकवर आपण एकमेकांच्या मित्रयादीत आहोत, तर असे घडू नये, असे वाटते.

--- ००० ---

The world doesn't make sense, so why should I paint pictures that do?

Pablo Picasso

--- असं कसं, असं कसं ? मग, भूमिका कशी आणि कसली घेणार तू ?

कुंपणावरचा, पलायनवादी, असंवेदनशील मेला ! □

भोपळे चौक,

भ्रमानंद रोड,

भारत !

( लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालाचा दिवस ! )

फोटो सौजन्य –

गिरीश रांगणेकर -- हॉटेलचालक, कुरियरचालक, संपादक, चॅनेलमध्ये विशेष काम, मुलाखतकार, लेखक, एका नामवंत विद्यापीठात विभागप्रमुख, नंतर आणखी एका नामवंत विद्यापीठात डीन, लघुचित्रपटकर्ता, माहितिपटकर्ता, प्रचारपटकर्ता, वगैरे – असा हा माझा एक हरहुन्नरी मित्र –

हे, ते, आणि इतर सर्वच, प्रथमच एकमताने म्हणताहेत की

लोकशाहीचा विजय झाला आहे !

विश्लेषण --

तो खोटा प्रचार प्रभावी ठरला --

हा खोटा प्रचार प्रभावी ठरला नाही !

राजकारणातल्या नैतिकतेच्या कल्पना कालौघात प्रगत आणि उदार होत आलेल्या आहेत -- संकुचित राहिलेल्या नाहीत !

काल दि. ०७-०६-२४ रोजी ' मन ' ची तालीम पाहिली !

१६-०६-२४ ला याचा मुंबईत प्रयोग होणार आहे !

हे काही ' वेगळे ' घडेल, हे नक्की !

डॉ. सौ. मेधा सिधये यांच्या खालील दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ पुण्यातल्या श्रेयस हॉटेलमध्ये आज दि. ०९-०६-२४ ला सकाळी झाला. प्रकाशक, आपले रंगावाचा वाले वामन पंडित : ---

१. मराठी नाट्यविचार -- विविध रूपे आणि

२. नाट्यभाषिते ( संपादन ).

त्या वेळी काढलेला फोटो ( सौजन्य -- प्रख्यात चित्रकार रवी मुकुल )

फोटोत डावीकडून -- डॉ. सौ. मेधा सिधये, डॉ. अनंत देशमुख, प्रेमानंद गज्वी आणि मी.

तीन ज्येष्ठ नाटककार - प्रेमानंद गज्वी, चं. प्र. देशपांडे आणि अजित दळवी – यांच्यासोबत ( गिरीश पतके )

Facebook

Abhijeet Zunjarrao is feeling excited with Ashutosh Diwan and

29 others

.

.

एकेक नाटक उभ करण हे दिव्य आहे. नाटक खेळताना प्रत्येकाला हा अनुभव येतोच येतो.
गेली अनेक वर्ष 'मन' मनात घोळत होतं.
Champra Deshpande यांना अनेकदा करतो करतो सांगून बरेचदा तालमी सुरू करून नाटक काही पुढे सरकल नाही. काही ना काही कारणाने मन करायच मनातच रहायच. कारण हे नाटक तस सगळ्यांच बाबतीत फार अवघड आहे. आणि म्हणूनच ते करायच होतं खर तर.
चंप्रंच लिखाण त्यांच्या website वर मोफत उपलब्ध आहे. त्यामुळे अनेकांनी मन वाचलं असेलच. नाटक होतंय कळल्यावर अनेकांनी नाटक वाचून नाटक पहायची इच्छा सुद्धा व्यक्त केली आहे. हे छानच झालं.
आता सगळ जुळून आलं आहे.
#विजयचौगुले निर्माता म्हणून उभे राहीले आहेत.
'मन' निमित्ताने कळत्या वया पासून ज्या नटाला काम करताना बघत आलो. ज्याच काम पाहून मोहित झालो त्या Rammesh Wani या प्रचंड क्षमता असलेल्या नटाला दिग्दर्शित करण्याची आयतीच संधी या निमित्ताने मिळाली आहे. इतक्या वर्षांपासून मनातलं नाटक नटाच्या माध्यमातून रंगभूमीवर प्रत्यक्ष सादर होत असताना बघणे म्हणजे कोणत्याही दिग्दर्शका करता सोहळा असतो. काहीसा तोच अनुभव रोज तालमीत येतोय. तुम्हाला हा अनुभव प्रत्यक्ष प्रयोग पहाताना नक्कीच येईल. खोटं नाही अगदी मनातल सांगतो आहे. मनापासून.
दादा. थँक्स फॉर धीस ट्रीट. अनेकांनी नकार दिल्यावर दादा सारखा दादा कलाकर काम करायला तयार झाला यातच सगळं आलं. त्याने या नाटका करता जबाबदारीने घेतलेली मेहनत जबरदस्त आहे. तुम्ही नाटक पहाल तर तुम्हाला ती नक्कीच जाणवेल. अर्थात पहिल्या प्रयोगाची धाकधूक आम्हा सगळ्यांच्या मनात सुरू आहेच. प्रयोग रंगण वा फसण त्या त्या दिवशी काय होईल यावर अवलंबून आहे. पण प्रोसेस जास्त महत्त्वाची मानावी आणि काम करत रहावं.
आमची टीम सोबत आहेच.
Shreyasi Vaidya Manali Rajeshree Omkar Uttam Jadhav आणि Shyam Chavan श्याम दादा जी जादू रंगमंचावर पेरणार आहे ते प्रत्यक्ष पहाण मजेशीर असणार आहे. Sumeet Patil ने अभ्यासपूर्ण नेपथ्य उभारल आहे. Dinesh Joshi यांचे चिरंजीव कृष्णा- देवा सारखी तरुण संगीतकार जोडी या निमित्ताने जोडली गेली. Pratikesh More आणि abstract digital यांनी जाहीरातीची बाजू सांभाळली आहे. Trupti Zunjarrao वेषभूषा आणि उलेश खंदारे रंगभूषा अशी महत्वाची बाजू सांभाळत आहे. Prabhakar Mathapati या मित्राने मनाचा ठाव घेणारे गाणे लिहून दिले आहे.
पहिला शुभारंभाच प्रयोग एनसीपीए सारख्या महत्त्वाच्या संस्कृतीक केंद्रात होतो आहे त्या करता Rajeshri Shinde, Bruce Guthrie यांचे मनापासून आभार!
सरते शेवटी पण महत्त्वाच.

एल. डी. सोनावणे महाविद्यालय, कल्याण यांचे आम्ही सगळे ऋणी आहोत. तालमी करता जागा मिळवण हा मामला जरा तापदायक असतो तो सोनावणे महाविद्यालयाने अलगद सोडवला.
आम्ही सगळे मिळून तुम्हाला नम्र विनंती करतोय आपण हा प्रयोग खरंच चुकवू नका
शुभारंभाचा प्रयोग
रविवार, दिनांक १६ जून
संध्याकाळी ५ वाजता
गोदरेज डान्स थिएटर, नरीमन पॉइंट, एन.सी.पी.ए
मुंबई
(तिकीटांसाठी लिंक व एन.सी.पी.ए बॉक्स ऑफिस नंबर कॉमेंट मधे.)

ज्या कवितेचा अर्थ सांगता येतो ती कविता कमी आणि निबंध जास्त असते -- राहुल पुंगलिया, पान १६२, साहित्यातील मिथके.

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री चं प्र देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुक भिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता,उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या,आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरी देखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मय व्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे.ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारात सर्व कमेंट्स बसतात.

१.लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्या ऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे.त्यामुळे कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाला ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता,जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला

जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला,हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान विज्ञानाची क्षेत्रे व तंत्र कौशल्यात तर लोकशाहीचा संवादाचा आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थाचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटी चा काही न कळता भक्तीभावाने उल्लेख करतात .शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल याचे अर्थशास्त्र न कळता देखील, (कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक), भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते. उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित , नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्य क्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवश्या आणि गवशांना मोकळं रान हवं असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

याचे एक उत्तर मला असे दिसते की साहित्य  हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे.आणि मऊ लागले की कोपराने खणा ही सहज वृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते.आणि तरी देखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे .साहित्य क्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात.ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची  स्वायत्त बांधणी आणि  अनाकलनीयता, काठिण्य  सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरी देखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्व, सत्ता शास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती,( आडव्याच नाही तर उभ्या देखील आणि शिवाय अलंकारिक देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते.त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. साहित्य  स्वतःला सुसंस्कृत कलासक्त घोषित करणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत .ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात.
अपूर्ण --- राहुल पुंगलिया.

Sameer S. Dalvi

.

'शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधातून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता'.

कविता लिहू पाहणाऱ्या, वाचू पाहणाऱ्या आणि अनेकदा प्रयत्न करून झाल्यावर पुन्हा नव्याने ती लिहू आणि वाचू पाहणाऱ्या कुणालाही, कविता म्हणजे काय किंवा कविता कशास म्हणतात या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात जो गोंधळ (केऑस) हाती लागतो, त्या गोंधळातून त्याचे बोट धरत, त्याला वाट दाखवण्याचे काम चं. प्र. देशपांडे यांची कवितेची उपरोक्त व्याख्या करते, असे मला वाटते. 'तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता' या त्यांच्या कवितासंग्रहातल्या, जगभरातील ५८ कवींच्या अनेक कविता एका संग्रहात वाचताना या व्याख्येचा प्रत्यय पानोपानी येतो. कवितेविषयी असलेल्या आपल्याकडील साहित्यिक आणि सांस्कृतिक समज-अपसमजांना दुरुस्त करत, कवितेच्या प्रांतात गांभीर्याने रमू पाहणाऱ्या कुणालाही अत्युत्तम दर्जाचे दिशादिग्दर्शन करू शकेल, असा कविता विषयक मौलिक ऐवज त्यांनी या संग्रहाच्या माध्यमातून आपल्या हाती दिला आहे, त्याबद्दल त्यांचे मानावे तितके ऋण थोडेच ! माझ्यापुरती या ऐवजाची मौलिकता काय ते मी थोडक्यात सांगायचा प्रयत्न करतो.

आजवर जे काही चाळीस चव्वेचाळीस वर्षांचे जगलो, त्यात 'एखाद्या व्यक्तीचा वा घटनेचा मला जो काही अनुभव आला' किंवा 'एखाद्या व्यक्तीने वा घटनेने मला जो अनुभव दिला' असं म्हणत, असा अनुभव देण्याची जबाबदारी समोरच्या व्यक्ती किंवा घटनेवर ढकलून, मी म्हणजे कुणीतरी स्वायत्त आणि सार्वभौम व्यक्ती आहे, असा वृद्धिंगत झालेला माझा समज चंप्र त्यांच्या प्रास्ताविकात मांडलेल्या काव्यतत्त्वात दुरुस्त करून देतात. (या संग्रहात केलेले प्रास्ताविक सुद्धा समग्र कवितेच्या संदर्भात आपले कालातीत मूल्य राखून आहे) ते म्हणतात, अनुभव म्हणज काय तर जगण्यातल्या घटितांना - घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच मी जे धरून चाललो होतो त्याच्या नेमके उलट. अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर - प्रोग्रॅमिंगवर - कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. मी स्वायत्त आणि सार्वभौम असण्याच्या माझ्या समजूतीला सुरुंग लावणारे हे काव्यतत्त्व माझ्या दृष्टीने मौलिक आहे. सध्याच्या पोस्ट मॉडर्न कालखंडात हरारी सारख्या मानववंशशास्त्रज्ञाने देखील या तत्त्वाला आपल्या लिखाणातून दुजोरा दिल्याचे अनेकांनी वाचले असावे. पण कवितेच्या संदर्भात खूपच आग्रही भूमिका घेऊन आपल्या साहित्यिक पर्यावरणात वावरत असलेल्या लोकांनी या तत्त्वाची कितपत दखल घेतली आहे, याबद्दल शंकेला प्रचंड वाव आहे. असो. माझ्यापुरते सांगायचे झाले तर या संग्रहात ज्या कविता अनुसर्जनासाठी निवडल्या आहेत त्यात, वर उल्लेख केलेल्या काव्यतत्वाचे पुरेपूर दर्शन चंप्र आपल्याला घडवतात.

वानगीदाखल मूळ इटालियन कवी, अलेसिओ झानेलीची त्यांनी अनुसर्जित केलेली एक कविता इथे देण्याचा मोह होतो आहे,

प्रतिबिंब

आपण सगळे इतर सगळे आहोत

आपल्यापैकी प्रत्येकजण

आपण जे काही आहोत वा जगण्यात

जिथे पोचतो

तेही इतर सगळ्यांमुळेच घडते

प्रत्येकजण - एकेकटा कुणीच नाहीय --

आपण इतर प्रत्येकाचे

यश आणि अपयश आहोत

आपण इतर प्रत्येकाचे

सुख आणि दुःख आहोत

आपल्याव्यतिरिक्त

इतर प्रत्येकाच्याही

जगण्याचा परिणाम आहोत

आपल्या प्रत्येकात

इतर सगळेही प्रतिबिंबित आहेत

आपण प्रत्येकजण

इतर सर्वांची बेरीज आहोत

निरपवादपणे

आपण प्रत्येकजण

दुसऱ्या कुणाचीच

आपल्याला साक्ष नसेल

तर आपण कुणीच नसू

आणि काहीच नसू

---

ही आणि संग्रहातील अशा अनेक कविता म्हणजे चं. प्र. देशपांडेंच्या अनुसर्जनाचे सौंदर्य म्हटले पाहिजे. सगळ्या कवितांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या त्या कवितेला योजलेली समर्पक अशी शीर्षके ! एखाद्या कवितेचे आकलन तिच्या पहिल्या वाचनात न झाल्यास ती कविता तिच्या शीर्षकाचे स्मरण ठेवत दुसऱ्यांदा वाचावी. असे केल्याने तिचे आकलन होण्यास मदत होते असा माझा अनुभव आहे. या संग्रहातल्या बहुतांश कविता मी अश्या पद्धतीने दोनदा तीनदा वाचल्या. त्यानंतर जे काही आकलन झाले त्यातून स्त्रोत भाषेत योजलेल्या शब्दांचा अंदाज येतो. शिवाय, लक्ष्य भाषेतील अनुसर्जनातले भाषा सौंदर्यही प्रकर्षाने जाणवते. अनुक्रमाच्या बाबतीतही सुरुवातीच्या झानेली पासून ते शेवटच्या निकॅनोर पारा पर्यंत कवितांची केलेली योजना खासच आहे. जिज्ञासूंनी हा कवितासंग्रह वाचल्यास अनुक्रमाच्या अनुषंगाने पाराच्या कवितेचे सर्वात शेवटी केलेले उपयोजन चं. प्र. देशपांडेची कवी आणि अनुसर्जक म्हणून असलेली धारणा स्पष्ट करते.

आजवरच्या माझ्या वाचन प्रवासात दोन पुस्तकांनी खांद्यावरच्या झोळीत कायमस्वरूपाचे स्थान पटकावले होते. पहिले डॉक्टर धर्मवीर भारतींचे 'अंधा युग' आणि दुसरे जयंत पवारांचे 'पासवाला'. 'तंबाखूच्या टपरी' निमित्ताने त्यात आणखी एका सोबत्याची भर पडली आहे.

तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता

चं. प्र. देशपांडे

©□समीर दळवी

Abhijeet Zunjarrao is with Datta Patil and

15 others

at NCPA Mumbai.

· Mumbai ·

आमच्या ' मन ' या नाटकाबाबतचे दोन अभिप्राय नम्रतापूर्वक आपल्या सार्वांच्या माहितीसाठी --

पुढील प्रयोग कल्याण, दादर, नाशिक, पुणे

***

अभिजीत झुंजाररावचं पुन्हा एक नाटक पाहिलं.

काल परवा दत्ता पाटील यांचं 'कृष्णविवर' आणि आज चं. प्र. देशपांडे यांचं "मन" नावाचं, एन.सी.पी.ए.ला अभिजित झुंजारराव ने दिग्दर्शन केलेलं. त्याला लगेच कळवलं, "अभिजीत, लागोपाठ पाहिलेल्या तुझ्या दोन चांगल्या नाटकाचं 'भूत' माझ्यावरून अजून उतरत नाही. तूच ह्याला जबाबदार आहेस, चांगली नाटकं करून". हे नाटक खरंतर चं.प्रं.चं जुनं नाटक आहे. नाटक बघताना आजतागायत कुणी केलं कसं नाही, याचंही नवल वाटत राहिलं. पण त्यातलं माणसाच्या मनाच्या विदिर्णतेचे/शतखंडिततेचे सूत्र आजच्या म्हणजेच उत्तर आधुनिकतेतल्या मानवी अवस्थेला, त्यातल्या कारूण्याला कवेत घेणारं आहे, किंबहुना ते सार्वकालीकच आहे, हे विशेष. योग्य वेळी केलाय अभिजीतनं हा दीर्घांक. शिवाय अशा कलाकृतींना स्थळकाळवेळेचं बंधन नसतं. फक्त अशा कलाकृती शोधण्यासाठी नजर असावी लागते नि मूळात स्वतःच्या प्रेमातून बाहेर पडावं लागतं कलावंतानं. त्यासाठी कलावंतानं पराकोटीचं 'अस्वस्थ' असावं लागतं. सध्या तरी हे मला अभिजीत झुंजाररावच्या कामातून दिसतंय, पुढचं मला माहित नाही. कलावंताचा विशिष्ट माध्यमाचा शोध घेण्याचा हा प्रयत्न अखेरीस जीवनाचाच समग्र शोध घेण्याच्या प्रयत्नांपर्यंत पोहचला पाहिजे. त्यासाठी केवळ विशिष्ट माध्यमापेक्षा माणसांचं 'जगणंच' कलावंताची सामग्री असायला /बनायला हवीत. सगळ्या मोठ्या कलावंतांचं असंच होतं. आपल्याकडच्या जी.ए.,तेंडुलकर,एलकुंचवार,आळेकर आणि चं.प्र.देशपांडे (आणि अन्य काही थोडेच) ह्यांच्याबाबतीत हे दाखवता येईल.

"मन" हा एका मध्यमवर्गीय माणसाचा एकालाप आहे. अर्थात म्हणजेच एकपात्री स्वगताचं हे नाटक.

सुरूवातीला मुख्य पात्राचा (नि एकमेव असलेल्या) जरा वरचा स्वर लागला. पण नंतर मात्र आख्खं नाटक दिग्दर्शक अभिजीत झुंजाररावने छान लयीत सादर केलं. म्हटलं तर हा एक प्रयोग (experiment) होता. नेपथ्यकार, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, अभिनेता रमेश वाणी आणि अर्थातच दिग्दर्शक अभिजीत झुंजाररावने हा

experiment चांगला पेललाय. अभिजीत झुंजारराव हा वेगवेगळ्या शैलीत नाटकं सादर करणारा आजचा अभ्यासू दिग्दर्शक आहे. तो नाट्यमाध्यमाशी निष्ठावंत तर आहेच पण कलावंताच्या झपाटलेपणातून नाट्यमाध्यमाचा शोधही घेतोय आणि समीक्षकांपुढे नवी आव्हाने निर्माण करतोय. मराठी नाटकांना अर्थपूर्ण योगदान देणा-या ह्या दिग्दर्शकाचे प्रत्येक नाटक, त्यातल्या चुकांसह, पहायला हवे, असं माझं मत आहे. आपल्या प्रयोग सादरीकरणाने तो नाटकाच्या विकासाच्या खूप शक्यता समोर आणतो नि आपण समृद्ध होतो. खूप बोललो पण हे बोलायला नि सांगायलाच हवे, निदान मी तरी.

नीलकंठ कदम, डोंबिवली

कवी आणि समीक्षक

***

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजीत झुंजारराव दिग्दर्शित 'मन' हा एकपात्री नाट्यप्रयोग म्हणजे मनाच्या गुंतागुंतीचा वेगवेगळ्या आयामांतून घेतलेला चिंतनीय वेध आहे. नीलकंठ या नायकाच्या मनाचा प्रवास या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. वैयक्तिक जीवन, व्यावसायिक जीवन, सामाजिक संबंध अशा मनाच्या अनेक कप्प्यांत तयार झालेल्या गाठी आणि त्यांचा गुंता सोडवण्याचा हा वैचारिक प्रवास आहे. नाटकात गुंफले गेलेले नायकाच्या मनाचे पदर एकरेषीय नाहीत; तर रोजच्या जगण्यातल्या छोट्या-मोठ्या प्रश्नांना भिडताना ते त्याच्या नकळत जटिल होत जातात. त्यांचा गुंता सोडवताना नायक कधी कोलमडतो,  कधी भावनतिरेकाने उन्मळतो, तर कधी नेटाने उभा राहतो. कधी मनात खोलवर झिरपलेल्या अस्तित्ववादी प्रश्नांचा मागोवा घेत मनाचा तळ उपसतो. मनातील मुक्त विचारांना भीतीची वेसण घातली जाते का, विचारांवर कळत- नकळत कसली दडपणे लादली जातात, सामाजिक बांधिलकीचेही कधी ओझे होऊ शकते का, चिंता, काळजी, राग, मत्सर अशा भावनांनी बांधून ठेवलेले मनातले पिंजरे कधी उघडले जातात का, अशा विविध प्रश्नांची उत्तरे हे नाटक शोधत जाते व प्रेक्षकांना एका उत्तम नाट्यप्रयोगाचा अनुभव देते, लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य यात सरस असलेला हा प्रयोग मनाच्या गुंतागुंतीची अनेक द्वारे प्रेक्षकांसमोर उघडत नेतो आणि चिंतनाला प्रवृत्त करतो. वेगळे काही पहायचे असेल तर 'मन' अजिबात चुकवू नका.

डॉ. अंजली जोशी

सायकोलॉजिस्ट

कधी घडूच शकणार नाही असे वाटत असलेली, हे नाटक सादर करण्याची घटना, अभिजित, रमेश आणि त्यांच्या टीमने घडवून आणली  -- याचा, लेखक म्हणून मला आनंद आहे. कालचा पहिलाच प्रयोग होता. चर्चा होत राहतील, अधिक सफाई येत जाईल. हे घडणे सोपे नव्हते हे इथे नमूद करून ठेवतो.

Surendra Vithal Darekar is feeling welcome with रवीन्द्र दामोदर लाखे and 24 others

.

.

अभ्यासोनी प्रकटावे :

काल चं.प्र.देशपांडे यांनी डाॅ.राहुल पुंगलिया यांच्या लेखातील कवितेच्या संदर्भातील एक विधान उद्धृत केल्यावर वाचकांनी त्यावर विविधांगी प्रतिक्रिया दिल्या. त्याला अनुलक्षून पुंगलिया यांनी त्याचे काहीसे सडेतोड स्पष्टीकरण देखील आज दिलेले आहे. या निमित्ताने एक प्रश्न चर्चेत आला हे आजच्या परिस्थितीत स्वागतार्ह म्हणावे लागेल. इथे महत्वपूर्ण बाब म्हणजे हे विधान देशपांडे यांनी मागील पुढील संदर्भाशिवाय दिले असे वाचक धरून पुंगलिया यांचे मत आहे. पण फेसबुक ट्विटर सारखी catchy माध्यमे लक्षात घेता ते काहीसे स्वाभाविक वाटते. त्याची तयारी आपण ठेवली पाहिजे असे वाटते. देशपांडे यांचा यामागील हेतू संभावित होता हे देखील त्यांनी वाचकांच्या प्रतिक्रियेवरील समारोपात जे म्हटले त्यावरून स्पष्टच आहे.(ठीक आहे. अनेकांचे अनेक प्रतिसाद आलेले आहेत. हे अपेक्षित होतेच. म्हणून तर ही पोस्ट दिली. आता मला हे वाक्य का महत्त्वाचे वाटते ( आणि पटते ) ते सांगतो. कविता ही निव्वळ विचारक्रिया नसते. एकरेषीय नसते. ती पूर्णतेत -- व्यामिश्रतेच्या भानात -- असते. ते भान म्हणजे एकरेषीय विचारक्रिया नसते. भावनाही अशीच वर्णनात्मकतेत सापडू शकते. विचार, भावना, मते हे सर्व व्यक्तिगत असते. भान हे पूर्ण मानवजातीचे असते. सखोल, मौल्यवान कविता ही अशी ' सर्वांची ' असते. एखाद्या उताऱ्यात तिचा अर्थ सापडू शकत नाही. निबंध हा विचाराने समजावा अशी अपेक्षा असते. कवितेत ती प्रक्रिया नसते. असो.) मला वाटते देशपांडे हे गंभीर प्रवृत्तीचे लेखक विचारक असून ते अशा प्रकारची मुल्यभानात्मक टिप्पणी एक सूत्र पकडून सातत्याने करत असतात.मला स्वतःला त्यातील प्रतिभानाचा (intuition) भाग विचारणीय वाटत आलेला आहे. त्यावर मी स्वतंत्र टीपण करण्याचा अव्यापारेषु व्यापारही प्रसंगी केलेला आहे. उदाहरणार्थ त्यांनी प्रज्ञा दया पवार यांच्या पाॅप्युलर प्रकाशीत ' हिल्लोळ हरवून आतबाहेरचा' संग्रहातील 'पुनर्लेखन' या कवितेच्या निमित्ताने मांडलेला एकुणच अभिप्राय महत्वपूर्ण आहे. मला स्वतःला तो आजच्या बहुतांश काव्यविषयक भुमिकेचा मागमूस नसलेल्या व पुष्कळच उथळ उत्सवी बेसूर वातावरणात दिलासा देणारा वाटला. ही कविता देखील प्रत्ययशील चिंतनाचा एक नमुना म्हणावी अशीच आहे. अशा कवितेची अनेक आकलन-आस्वादने संभवतात याविषयी पण दुमत असायचे कारण नाही. देशपांडे यांनी या टीपणात कवितेचा 'एकात्म अनुभव' विचारात घेऊन आशय संदर्भात केलेली काही विधाने तत्वज्ञानीय ज्ञानमिमांसेकडे संकेत करत असल्याचे जाणवते. टीपणात आरंभीच्या परिच्छेदात काही मराठी लेखकांची उदाहरणे देऊन ते "कोणतेही चांगले लेखन हे व्यक्तिगत मतांच्या मर्यादेत बद्ध नसते. लेखक जेव्हा खुला असतो, मानवी जगण्यातल्या समस्यांना वैचारिक अंतिमता देणारा नसतो तेव्हाच तो काही मौल्यवान निर्मिती करू शकतो हेच अनेकदा दिसून येते. जगातल्या अनेक महान कलावंतांनीही हे सांगितलेले आहे." अशा निष्कर्षाप्रत येतात. नंतर प्रस्तूत कवितेच्या आशय संबंधाने कवयित्रीच्या अभिव्यक्तीच्या वा भुमिकेच्या अंगाने ते काही प्रश्न उपस्थित करतात.यात जर "एखादी विचारसरणी बिंबविण्याचा हेतू नसेल तर व्यक्तिगत सुखदुःख वा मनःस्थिती संक्रामित करण्याचा हेतू आहे काय? पण यात तशा प्रकारची कसलीच गुंतवणूक नसून उलटपक्षी अनुभवाला समक्ष होत त्यापासून सुटका मोकळीक करून घेणे आहे. ते देखील येथे तटस्थ साक्षीभावाने घडत नसून गोंधळ भ्रम आभासाने युक्त आहे " म्हणत अखेरच्या दोन परिच्छेदात ते कवितेत अवतीर्ण होणाऱ्या प्रतिमेच्या संदर्भात तसेच अर्थनिर्णयन व संभाव्य आस्वादनाबाबत काही महत्त्वपूर्ण विधाने करतात. यातील प्रतिमेचा पुनरावृत्त होत भासमान व्यूह तयार करून स्वतःचेच अस्तित्व प्रश्नांकित करण्याचा भाग तात्विक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. इथे

टीपणकारांना प्रत्यक्ष जगण्यात नसलेल्या तरी अनुभवाच्या संभाव्य शक्यतांची कवितेतील प्रतिमांकित चिंतनात्मकता कविमनाच्या खुलेपणाची कलासिद्ध कसोटी वाटते. या प्रक्रियेत  स्वतःचे अस्तित्व व सत्यता धोक्यात आणण्यातून प्रतिमेची निर्णायकता सिद्ध होतांना दिसते. आशयदृष्ट्या कवितेतील निवेदन व्यवहारिक हेतूने बाधीत नसणे हे एक प्रकारे खऱ्याखुऱ्या कलात्मकतेने सर्वांना व्यापकतेने उपलब्ध असणे होय. अशा 'कलात्म असण्या' तून सौहार्द आणि समज निर्माण व्हावी हीच तर कलेची मूल्यात्मकता असेही ते म्हणतात. मला वाटते हेच मत देशपांडे यांनी कमी अधिक फरकाने पुंगलिया यांच्या विधानावरील प्रतिक्रियेच्या उपरोक्त समारोपात अधोरेखित केलेले आहे. या निमित्ताने आजच्या गतीशील काळात केवळ ओळींदरम्यान(Between the lines) वाचण्याची पारंपरिक सवय टाकून आशयबंध दरम्यान (Between the context) वाचण्याची आंतरसंहितात्मक inter(con)textual सवय लागणे व त्यासाठी तसदी घेणे आवश्यक आहे असे वाटते. पुंगलिया यांनी आपल्या सडेतोड तरी संयत प्रतिक्रियेत हेच मांडण्याचा उपक्रम केलेला आहे असे वाटते. यावर पुष्कळच बोलता येईल. परंतु विस्तारभयास्तव येथे थांबणे उचित होईल. तथापि अंकेक्षण संकेताला धरून चूभूदेघे.

याला म्हणतात नाटक पोचणे ---

मन झाले ओझे...

सुप्रसिद्ध नाटककार, कवी चं. प्र. देशपांडे यांनी लिहिलेला 'मन' हा दीर्घांक नुकताच बघितला. काही वर्षांपूर्वी तो सरांच्या वेबसाईटवरून 'फ्री डाऊनलोड' करून वाचला होता.

आपलं मन विचारांवर विहरत असतं, ते आपल्या कह्यात नसतं आणि याची सवय अंगवळणी पडलेली असते. तरीपण, शब्दांतून व्यक्त केलेलं ते वाचताना आश्चर्य वाटलं की संदर्भ वेगळे असले तरी इतकं कसं काय ते आपल्या मनाशी मिळतं जुळतं वाटतंय?

त्यामुळेच त्याच्या सादरीकरणाविषयी उत्सुकता होती.

सांगायला आनंद होतोय की, अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रॉडक्शन्स निर्मित दीर्घांकातून माणसाच्या मनातला हा गुंता सलग शंभरेक मिनिटं जराही न थांबता सादर करणं हे आव्हान अभिनेता रमेश वाणी आणि दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव यांनी उत्तमरित्या पेललं आहे.

दीर्घांकाच्या पहिल्याच दृश्यासंबंधी नाटककाराने लिहिले आहे -- "पडदा उघडतो तेव्हा नीलकंठ समोर बसलेला. काहीसा थकलेला. पण विचारचक्रात. योग्य त्या ठिकाणी बिझनेस व विश्राम यावे. सतत सलग बोलणे नसावे."

या ठिकाणी दिग्दर्शकाने नायकाला जी क्रिया करताना दाखवलं आहे तिथेच त्याच्या मानसिकतेची अशी काही चुणूक दिसते, जी पुढे संपूर्ण वेळ तशीच टिकवून ठेवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

रंगमंचावर एकदाही काळोख न करता, विंगेत न जाता वयातला जो बदल (सुरुवातीला ३५-४० आणि नंतर ६२-६३) दाखवला आहे तोही अनोखा आहे.

नाटककार लिहितात --

"स्थळ: घर किंवा एखादी भौमितिक आकारांची रचना."  नेपथ्यकार सुमित पाटील यांनी साजेसं नेपथ्य केलं आहे. जाडजूड दोरखंड, घड्याळाचे आकडे - काटे, पोपटाचा पिंजरा, बाल्कनीचं रेलिंग, इ. पूर्ण रंगमंच व्यापणारं आणि अडकलेल्या मोकाट मनाचा  वावर अन् सुटकेसाठी वृथा धडपड दर्शविता यावी यासाठी ते चपखल झालं आहे. संगीतकार कृष्णा - देवा यांचं पार्श्वसंगीत आणि या जोडीतील देवा यांचं स्वरार्त गायन हेदेखील त्या त्या मनोवस्थेला सार्थ व्यक्त करणारं झालं आहे.

संपूर्ण प्रयोग (अतीवापराने गुळगुळीत झालेला असला तरी हाच शब्द) देखणा! अन् तोही NCPA च्या मिनी थिएटरमध्ये मोजक्या जाणकारांच्या उपस्थितीत बघताना आनंद झाला.

लेखक चंप्र त्यांच्या कुटुंबीयांसह, सुप्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ आणि लेखिका डॉ. अंजली जोशी, सुप्रसिद्ध दिग्दर्शक गिरीश पतके, सुप्रसिद्ध नाटककार प्रेमानंद गज्वी, सुप्रसिद्ध अभिनेते शैलेश दातार.

'मन ' म्हटलं की सर्वांत पहिल्यांदा आठवतात सं. रामदास स्वामींचे मनाचे श्लोक, बहिणाबाईंच्या आणि इतर कवींच्या कविता, भावगीतं, गाणी.

मनाचे श्लोक सांगतात की मन 'व्यर्थ चिंता' वाहते तसेच 'बहु हिंडता सौख्य होणार नाही'.

मनाने काय करावे अन् काय करू नये, मनाला शिस्त कशी लावावी,  मनातल्या सुख-दुःखाच्याकडे कसं बघावं अथवा बघू नये हेही सुचवतात. यासाठी मनाला श्रीरामाच्या चरणी अर्पण करावं  असं रामदासस्वामी म्हणतात.

कविता - गीतांमधून मनाच्या प्रतिमा साकारल्या आहेत. मन 'पाखरू पाखरू',  मन 'उभ्या पिकातलं ढोर', मन 'काळोखाची गुंफा', मन 'तेजाचे राऊळ', मन 'उधाण वाऱ्याचे' इ.

मनाचे हे श्लोक अन् या प्रतिमा कशा तयार झाल्या?

मनाच्या हालचालींमुळे.

मनाच्या हालचाली म्हणजे काय?

मनात येणारे असंख्य विचार.

हे विचार नक्की काय स्वरूपाचे असतात? ते मनात का येतात? त्यांच्याशिवाय माणूस जगू शकतो का? मनात विचारांची आवर्तनं सुरू असताना माणसाचं जगणं - वागणं कसं असतं?

त्यांचे त्या माणसावर, त्याच्या नातेसंबंधांवर कसे अन् काय परिणाम होतात?

'मन' दीर्घांक मनाच्या हालचाली आपल्या पुढ्यात तंतोतंत उभ्या करतो.

या हालचालींना अमुक एक विषय किंवा दिशा नाही. सतत उलट सुलट, वेड्यावाकड्या विचारांत अडकलेल्या. मात्र एक गोष्ट अधोरेखित होत राहते की हे मन प्राप्त परिस्थितीबाबत असमाधानी असूनही नाईलाजाने तिचा स्वीकार करता करता त्यातच अधिकाधिक गुरफटत गेलं आहे. ऐन उमेदीच्या काळात आणि निवृत्तीनंतरही हे असंच! विचारांच्या कोलाहलातून सुटका व्हावी कशी? एकीकडे 'मेलो तर बरं' म्हणावं. पण मनात मरणाची भीती आणि ते दूर पळालं म्हणून हायसं वाटणं.

यातल्या काही जागा खास नाटककाराच्या असलेल्या, जसं की ---

"चुकलेल्या क्षणांचं अहिंसक आयुष्य आहे माझं! हेच माझं नशीब? हे? मला ज्या ज्या वेळी जे जे वाटलं ते ते मी केलंच नाही! मग मला ते तसं वाटण्याचा उपयोग

काय होता? आपण जे करू शकतो तेवढंच खरं तर माणसाला वाटलं पाहिजे! सगळी अस्तित्वात न आलेल्या क्षणांची स्मृतिचित्रं का सांभाळत बसलोय मी ? आणि आत्ताच्या क्षणांचं तरी मी काय करतोय ? त्या क्षणांसाठी हेही क्षण वेस्ट करतोय ? "

पुरुष असो वा स्त्री -- मनाच्या गुंताड्यातून सुटका होण्यासाठी, मन:शांतीसाठी ओंकार साधना - भगवद्गीतापठण शिकणं, गायन - वादनात मन रमवणं, एकलकोंडा स्वभाव असूनही समाजात जगता यावं म्हणून इतरांच्यात मिसळणं

अन् पुन:पुन्हा दुष्ट विचारचक्राच्या विळख्यात सापडणं.

माणसाच्या मनाचा इतका सखोल आलेख क्वचितच कुणी मांडला असावा...

चित्रा राजेंद्र जोशी - १७.६.२४

'मन' या नाटकाचे पुढील प्रयोग

शनिवार दिनांक २९ जून

रात्री ८:३० वाजता

आचार्य अत्रे रंगमंदीर, कल्याण

सोमवार दिनांक १ जुलै

रात्री ८:१५ वाजता

शिवाजी मंदिर, दादर

शुक्रवार दिनांक १२ जुलै

रात्री ७:३० वाजता

श्रीराम लागू रंगावकाश, पुणे

नाशिक, गोवा, कोल्हापूर लवकरच!!

Dinesh Jadhav is with Shyam Chavan and

2 others

The mind game....

आयुष्य हा मनाचा खेळ आहे, हे त्रिकालाबाधीत सत्य आहे आणि ते आपणच तयार केलेले आपल विश्व असत! पण हे सत्य आपणाला बऱ्याचदा उमगत नाही, जर हे अनुभवायचचं असेल तर चं.प्र. देशपांडे सरांचा चा "मन" हा दिर्घांक आपल्याला जरूर पहावयास हवा. तुमच आयुष्य प्रेरणादायी असेल, निरर्थक असेल कि सर्वसाधारण असेल हे ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार हा तुमच्या मनाचा असतो. किंबहुना आपण त्याला तो अधिकार देतो आहे कारण आपण त्या मनाच्या जाळ्यात पुर्णतः अडकलोय. हॅट्स ऑफ चं.प्र. सर! फार मार्मिक पणे तुम्ही सर्वसामान्य माणसाच्या मनाच विवेचन अगदी ठळकपणे मांडलत दीर्घांकात. हा दिर्घांक तुम्हाला अस्वस्थ करतो कारण यात सतत तुम्ही स्वतःला शोधत असता. 100 मिनिटे एक अभिनेता तुम्हाला त्याच्या मनात चाललेल्या विचारांची

घालमेल मांडत असतो आणि आपण त्यात आपल प्रतिबिंब उत्कटपणे पाहत असतो हा सुरेख अनुभव आपणास दिलाय "मन" च्या टिम ने. लेखक म्हणुन चं.प्र. देशपांडे सर ग्रेट आहेतच पण दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव ने ज्या पद्धतीने त्याला रंगमंचीय अविष्कार दिला आहे त्याला तोड नाही. नेपथ्य हे खुपच बोलके आहे आणि त्याला जबरदस्त साथ मिळाली आहे शाम चव्हाण च्या लाईट्स ची आणि संगीतकाराची. हा प्रयोग पाहील्या नंतर मी रमेश वाणी या कलाकराचा जबरदस्त फॅन झालोय. 100 मिनिट त्यांनी प्रेक्षागृहातील रसिकांना खिळवून ठेवलय ते ही मनाच्या अनाकलनीय भावनांच्या हिंदोळ्यावर. हा दिर्घांक कस आहे अभिनेत्याचा, दिग्दर्शकाचा आणि ईतर तंत्रज्ञ मंडळींचा जो चांगला जमुन आलाय. प्रयोगशील नाटक असल तरी त्याला व्यावसायिक दृष्टीकोनातुन आपण पाहायला हव कारण हेच अनुभव आपल्या मनाच्या कोपऱ्यात साठुन आपल आयुष्य समृध्द करत असतात हे मनात साठवुन घ्या.

संपुर्ण टिमला मनापासुन शुभेच्छा □

' मन ' च्या पहिल्या प्रयोगापूर्वी -- एन सी पी ए च्या वास्तूत ---

Abhijeet Zunjarrao

Your new experimental play " Mind", it is a solo performance, no entry, no exist, no darkness, onces curtain opened it dropped at the end, the play continued for 100 minutes, without makeup, without costume changes, you showed transformation of character on his face as per age lapses in play, the theme of play is quite strange, infinite mind, expression of mind, psychosis of mind, I think play has uncovered real face of human beings, you have always choosen different path for directing such a play, you have created your own style of direction that is less trodden by other ,you are really praiseworthy for it, you have gifted talented artist to theare like Ramesh wani, you have explored gem, he is really a great artist who played such a wonderful and marvellous role, C P Deshpande Sir is a great playwright, I liked his buddhibal and zabu, it was a great play, I think because of you, playwright dared to find out new avenues in writing plays, you have won strong support of audience, you have been enjoying good reputation and earned good name for your Theatre group, I extend my best wishes to all of your colleagues, all technicians, all backstage artist and who directly and indirectly helped you, you will grow like waxing moon day by day.

- Sudhakar madhukar Gadhave

Playwright, Khandala Talukha, Khandala Dist Satara

Mobile Number 9881026476

‘ मन ’ बाबतचे अभिप्राय ---

नेपथ्यकार, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, अभिनेता रमेश वाणी आणि अर्थातच दिग्दर्शक अभिजित झुंजाररावने हा experiment चांगला पेललाय.

--- नीलकंठ कदम ( कवी आणि समीक्षक )

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजित झुंजारराव दिग्दर्शित ‘मन’ हा एकपात्री नाट्यप्रयोग म्हणजे मनाच्या गुंतागुंतीचा वेगवेगळ्या आयामांतून घेतलेला चिंतनीय वेध आहे.

वेगळे काही पहायचे असेल तर 'मन' अजिबात चुकवू नका.

--- डॉ. अंजली जोशी ( सायकोलॉजिस्ट )

अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रॉडक्शन्स निर्मित ‘ मन ‘ या दीर्घांकातून माणसाच्या मनातला हा गुंता सलग शंभरेक मिनिटं जराही न थांबता सादर करणं हे आव्हान अभिनेता रमेश वाणी आणि दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी उत्तमरीत्या पेललं आहे.

--- चित्रा राजेंद्र जोशी ( सी. ए. )

१०० मिनिटे एक अभिनेता तुम्हाला त्याच्या मनात चाललेल्या विचारांची घालमेल मांडत असतो आणि आपण त्यात आपल प्रतिबिंब उत्कटपणे पाहत असतो हा सुरेख अनुभव आपणास दिलाय "मन" च्या टीम ने.

--- दिनेश जाधव ( एक नाट्यकर्मी )

नक्की आणि लौकरात लौकर बघा .. आपलंच ‘ मन ‘ ..

योगेश खांडेकर ( अभिनेता )

अप्रतिम, अद्वितीय, विलक्षण, अशक्य, भारी, सुंदर – अशी अनेक विशेषणे कमी पडतील इतका असा हा एक जबरदस्त प्रयोग आहे ! ‘ मन ‘ !

--- विजय घाडगे ( प्रेक्षक, मुंबई )

Rahul Pungaliya is with रवीन्द्र दामोदर लाखे and

पाच दिवसांपूर्वी श्री चं प्र देशपांडे यांच्या एका पोस्टमुळे काहीशी चर्चा झाली होती त्याला मी किंचितसे उत्तरही दिले होते. आता माझे पूर्ण म्हणणे इथे मांडत आहे---

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री चं प्र देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुक भिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता,उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या,आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा

प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरी देखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मय व्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे.ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारात सर्व कमेंट्स बसतात.

१.लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्या ऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे.त्यामुळे कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाला ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता,जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला,हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान विज्ञानाची क्षेत्रे व तंत्र कौशल्यात तर लोकशाहीचा संवादाचा आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थाचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटी चा काही न कळता भक्तीभावाने उल्लेख करतात .शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल याचे अर्थशास्त्र न कळता देखील, कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक, भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते. उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित , नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्य क्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवश्या आणि गवशांना मोकळं रान हवं असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

याचे एक उत्तर मला असे दिसते की साहित्य  हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे.आणि मऊ लागले की कोपराने खणा ही सहज वृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते.आणि तरी देखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे .साहित्य क्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात.ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची  स्वायत्त बांधणी आणि सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी अनाकलनीयता, काठिण्य हे धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य

तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरी देखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्व, सत्ता शास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती,( आडव्याच नाही तर उभ्या देखील आणि शिवाय अलंकारिक देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते.त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. साहित्य स्वतःला सुसंस्कृत कलासक्त घोषित करणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत .ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात. साहित्याबद्दल पद्धतशीर विधाने करून काही एक व्यवस्था शोधण्याचा प्रयत्न केला म्हणजेच साहित्याचे आत्मावलोकन करून जाणिव वाढवायचा प्रयत्न केला तर ते बऱ्याच जणांना खपत नाही. हे क्षेत्र अनियंत्रित असावे. इथे काहीशी मोकळीक मिळावी अशी अपेक्षा आहे. इतर कुठेच अशी मोकळीक मिळत नाही. आधुनिक समाज वैज्ञानिक, तांत्रिक, प्रशासकीय आणि लष्करी पद्धतीने साकार झालेला आहे. समाजामधील स्वातंत्र्य नाममात्र आणि फसवे आहे.विज्ञाने व तंत्रज्ञाने संघटित सत्ताकारणाच्या गरजांनुसार आणि मागणीनुसार "सत्य" व "वस्तुनिष्ठ तथ्यांचा" शोध घेतात हे आता लपून राहिलेले नाही.

मालमत्ताधारक वर्गाच्या हिताचे , विकासाचे कार्यक्रम राबवताना सत्ताधाऱ्यांनी सर्वसामान्यांची सहमती मिळवण्यासाठी 'विशुद्ध ज्ञान','निर्विवाद,केवल सत्याचा शोध' हे आदर्श सिनिकली वापरलेले असतात. खरे तर सर्वच सामाजिक राजकीय आदर्श हे गोरगरिबांच्या रक्त व घामाने डागाळलेले असतात. हे देखील आता सामान्य ज्ञान झालेले आहे .आणि हे असेच चालणार असा अटळ दैववादी विश्वासही जनतेमध्ये तयार झाला आहे. आता कोणालाच कशाचेच आश्चर्य वाटत नाही.

या पार्श्वभूमीवर कला क्षेत्र विविध अभिरुचींना पटेल असे मनोरंजन पुरवणारी एक यंत्रणा व बाजारपेठ झाली आहे. मराठी साहित्याबद्दल हे प्रकर्षाने जाणवते.जसा, विज्ञानाचे कार्य आणि महत्व सर्वसामान्यांच्या गळी उतरवण्यासाठी, "सत्य, ज्ञानासाठी ज्ञान, कुतूहल, वस्तुनिष्ठता" इत्यादी मिथ्या मूल्यांचा, जे विज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रॅक्टीसमध्ये म्हणजे आचरणात बिलकुल दिसत नाहीत, त्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो. त्याचप्रमाणे साहित्यात देखील,"अभिव्यक्ती, कलेचा आस्वाद, सौंदर्यानुभव ,मानवतेच्या मूल्यांचा पुरस्कार, व्यक्तिनिष्ठता, भावनिकता, व्यक्ती स्वातंत्र्य, कल्पनाशक्ती, प्रतिभा, अंतर्मनाचा आविष्कार, प्रामाणिक संवाद इत्यादी मिथ्या मूल्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो.साहित्यातील नोकरदार (विद्यापीठीय व शासकीय ) आणि विविध साहित्य व्यावसायिकांना (यामध्ये प्रकाशक विक्रेत्यांबरोबर लेखक, कवी, नाटककार देखील आले) या आयडिओलॉजीला पूरक व्यवहार करावा लागतो. साहित्याच्या आयडिओलॉजीमुळे समाजामधील स्वातंत्र्याचा अभाव, लोकशाहीच्या रूपातील छुपी हुकूमशाही, दडपशाही, व्यक्तीच्या मनाचे व बुद्धीचे माध्यमे व ज्ञान विज्ञान उद्योगाकडून केले गेलेले कंडीशनिंग (संस्कार),परात्मता, अनुभव, समाधान व आनंदाचे क्रयवस्तूमध्ये झालेले रूपांतर या गोष्टी झाकल्या जातात. साहित्य व्यावसायिक म्हणजे लेखक आणि साहित्याचे उपभोक्ते म्हणजे वाचक या दोघांनाही समकालीन

घटनांना दिलेले थेट अपरीष्कृत प्रतिसाद म्हणजेच संवाद वाटू लागतो.त्यामुळे आज, वाचक उपभोक्त्यांच्या भावनिक वैचारिक गरजा भागवून घेण्याचे,साहित्य हे साधन झाले आहे.

ज्यांचा आग्रह कवितेने संवादी असावे आणि अर्थ निर्णयन वाचकाच्या मर्जीने चालावे असा आहे ते, भाषा,हे संवादाचे पारदर्शक माध्यम आहे हे गृहीत धरतात.आधुनिक काळात आणि कदाचित आधुनिकपूर्व समाजांमध्ये देखील भाषा पारदर्शक नाही व बहुतेक कधीच नव्हती. थेट संवाद हे मिथक आहे, आणि होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञान विज्ञान व इतर क्षेत्रांत विविध विचारधारांचे प्रवाह (आयडीओलॉजीकल फोर्सेस ) भाषेला अपारदर्शक व विशिष्ट कल असलेले, पक्षपाती माध्यम बनवतात. संवादाचे दोन्ही ध्रुव म्हणजे मी (सब्जेक्ट) आणि  वास्तव या दोन्ही गोष्टी दूषित झाल्या आहेत . ‘मी ‘ आपल्या भावना व मनस्थितीच्या प्रामाणिक अभिव्यक्तीचा प्रयत्न करून वा आत्ताच्या व्यामिश्रतेचे समग्रभान ठेवून भाषेला पुन्हा एकदा संवादी व पारदर्शक बनवू शकत नाही.

थोडक्यात साहित्यिकाने आपले 'मी 'पण अबाधित व स्थिर आहे असे समजून, गृहीत धरून “आपण वास्तवाचा वेध प्रयत्नाने घेऊ शकतो” या भ्रमातून बाहेर यायला हवे. आधुनिक कवितेच्या सर्जन प्रक्रियेत व आस्वाद प्रक्रियेत समीक्षात्मक, चिकित्सक व सर्जनशील वृत्तींची सरमिसळ झालेली आहे. त्यामुळे कविता म्हणजे उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार अशा संकल्पना आता कालबाह्य झालेल्या आहेत. कवितेचे निर्माण करताना त्याच कवितेची समीक्षा होत असते. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कवी करत असतो . आपल्याच कवितेच्या पायाखालचा आधार खेचणे अशी विघातक कृती करण्याची धूर्त लकब कवीला वापरावी लागते. त्यामुळे चांगली कविता ही संवाद व अर्थाच्या स्वतःच निर्माण केलेल्या शक्यतांचे विघटन करत पुढे जाते.

ही आत्मघाताची व आत्म चिकित्सेची भूमिका न घेणारे लिखाण सहजच विविध सत्ता संबंधांच्या आ वासून बसलेल्या  घशांत सहजच जाते. या कवितेसाठी धोकादायक बनलेल्या आणि अतिशय चित्त थरारक (एक्साईटिंग) काळात संस्कृत काव्यशास्त्रातील वाच्यार्थ, लक्षणा व व्यंजना फारसे उपयोगाचे असू शकायचे नाहीत . कारण या अलंकारिक कारागिरीमध्ये भाषेला गृहीत धरण्याची मुभा होती. आजसारखी व्यक्तीत्व, भाषा व संस्कृतीवर पूर्ण अंमल गाजवू पाहणारी सामाजिक आर्थिक व्यवस्था त्या काळात नव्हती. तेंव्हा भाषेवरती कौशल्यपूर्वक काम करून कवितेला अनुरूप आणि विशिष्ट व्यंगात्मक, परोक्ष अर्थ निर्माणाच्या शक्यता  होत्या. आज भाषा (म्हणजेच सामाजिक व सांस्कृतिक तथ्ये व मूल्ये) इतकी निसरडी व
बेभरंवशाची झाली आहेत की भाषा आपल्याला वापरते आहे का आपण भाषेला वापरत आहोत हे कळेनासे होते.

त्यामुळे चांगल्या कवितेत सुलभ संवादाच्या मिथकाला छेद दिला जातो. चं प्र देशपांडेंनी उद्धृत केलेल्या  विधानाला काही सापेक्षतावादी किंवा बहुलतावादी प्रतिक्रिया आल्या. त्यांचे म्हणणे असे होते की कविता अनेक प्रकारच्या आहेत आणि वाचकही अनेक प्रकारचे. त्यामुळे दोन्ही, कविता आणि त्यांचे अर्थ, अनेक असू शकतात. एकच एक अर्थ असावा अशा अपेक्षेची सक्ती नको. बाजारपेठेतील उत्पादन ग्राहकाने कसे वापरावे हे त्याचे तो ठरवतो. हे वस्तू वापरण्याचे स्वातंत्र्य भांडवली लोकशाहीमध्ये सुखद वाटते. साहित्य देखील या प्रकारची वापराची वस्तू असल्यासारखी ही अपेक्षा आहे. साहित्य हेतूपूर्वक संवाद सुलभतेला आव्हान देते . हीच साहित्याची सामाजिक बांधिलकी आहे. आणि असे साहित्य त्यामुळे सगळे आलबेल नाही याची जाणीव करून देते.

वरील विवेचन जर काही प्रमाणात ग्राह्य असले तर बहुसंख्य साहित्य जे संवादी व अर्थवाही आहे त्याचे स्थान व दर्जा (स्टेटस) काय ?

असा प्रश्न उभा राहतो .हे मुख्य प्रवाहातले साहित्य आहे. ते आपल्या समाजाच्या वैचारिक व राजकीय भूमिकेचे निदर्शक आहे. आजच्या घडीचे मध्यमवर्गीय (जरी त्यातील काही पूर्वाश्रमीचे दलित वंचित असले तरी) साहित्याचे जनक व उपभोक्ते आहेत.त्यांनी आत्ताची अधीमान्यता असलेली, प्रभुत्वशाली सांस्कृतिक व्यवस्था स्वीकारलेली आहे. या व्यवस्थेत ते आपल्या परीने भर घालीत असतात. प्रचलित मुख्य प्रवाहातील साहित्याचा मूलभूत खोटेपणा त्यांच्या लक्षातही  येणार नाही इतका अंगवळणी पडला आहे. किंवा ती स्थितीशरणता व अप्रामाणिकपणा ही या साहित्याची बेसलाईनच आहे.

पूर्ण

Facebook

Girish Rangnekar is with रवीन्द्र दामोदर लाखे and

.

“कुठेही जा, कितीही फिरा, तुम्ही एकाच ठिकाणी असता - मन! सगळ्या घटना, अनुभव, सुखदुःख घडण्याचे एकच ठिकाण - स्थळ फक्त मन! कुठं जाणं नाही आणि येणं नाही. जगणं म्हणजे फक्त मनाची हालचाल! तसं बघितलं तर प्रॉब्लेम एकच! आपलं माईंड! आपण उगीच प्रॉब्लेम्सची मोठी संख्या सांगत बसतो!” नाटकातले हे संवाद कुणाला अध्यात्मिक वाटतील तर कुणाला आधुनिक!

मराठीतले विद्वान कवि आणि नाटककार चं. प्र. देशपांडे यांनी पूर्वी लिहिलेली २२ नाटके/दीर्घांक आणि २३ एकांकिका अलिकडल्या २-३ वर्षात टप्प्या टप्प्याने पुस्तक रूपात प्रसिद्ध केल्या आहेत. "मन वेगळं, विचारसरणी वेगळी, अवेअरनेस वेगळा आणि जगणं वेगळं " - मराठीतल्या कोणत्याही साहित्य प्रकारात तशी अभावाने आढळणारी  ही स्पष्टता, हा दृष्टिकोन याची थेट मांडणी चंप्र आपल्या प्रत्येक नाट्यकृतीतून करतात!

"दंगल" या त्यांच्या एकांकितेत अंतर्मुख करणारे रोखठोक सवाल येतात - "सगळीकडूनच सगळं असं संघर्षमय का? आणि असंच जर आहे तर आम्ही संघर्षमय जगलो असं सांगण्यात तरी काय अर्थ आहे? दुसरं कसं जगू शकणार होतो?" मानसशास्त्रात रस असणाऱ्यांना सरांचे लेखन नेमकेपणाने उपयोगी पडेल. चंप्र म्हणतात – “आपल्या जगण्यात आर्थिक प्रश्न किंवा एखादा महत्त्वाचा संघर्ष केंद्रस्थानी नसून केंद्रस्थानी आहे तो फक्त आपल्या मनाचा गोंधळ आणि याला शरीरातली रसायने कारणीभूत असतात!".

त्या त्या पुस्तकासाठीचे प्रूफ रिडींग, त्याचे मुखपृष्ठ, ब्लर्ब पासून ते त्याचा बार कोड तयार करण्यापर्यंतची सगळी प्रोसेस चंप्रंनी एकहाती पार पाडली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर "दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद, संगीत, गाणी, अभिनय - सबकुछ किशोरकुमार, असा हा प्रकार आहे." त्यांच्या प्रत्येक पुस्तकातल्या "ऋणनिर्देश" पानावर त्यांनी अन्य मातब्बर नावांसोबत माझ्या नावाचा देखील आवर्जून उल्लेख केला आहे. प्रत्येक पुस्तक छापून आले की आमची भेट ठरलेली असायची. त्या प्रत्येक भेटीत चंप्र सहीनिशी ते ते पुस्तक मला भेट देखील देत आले आहेत.

सरांनी भेट दिलेली ही सर्व नाटके आणि एकांकिका संग्रह मी त्या त्या वेळी टप्प्या टप्प्याने वाचत गेलो. सर्व पुस्तकांतली मिळून अंदाजे दीड-दोन हजार पाने असतील ज्याची ओळ अन ओळ मी तन्मयतेने वाचलेली आहे. माझ्या अनुभवानुसार ऍसिडिटी वाढली की आपल्या मनात नकारात्मक विचार यायला लागतात. तर्काने विचार करायचा झाल्यास, ऍसिडिटीच्या विरुद्ध गुणधर्म असलेल्या अल्कलीचे इनपुट/ अन्न जर अशा वेळी पोटाला मिळाले तर मनातले विचार बदलू शकतात. मनाचे प्रश्न, मनोव्यापार जर असे आपल्याला नीटपणाने उमजले, आऊट ऑफ कंट्रोल परिस्थितीमध्ये जर आपण त्रयस्थपणाने त्याकडे असे पाहायचे ठरवले तर असंख्य अडचणी, यातनांमधून आपली सुटका होऊ शकते. अशी सुटकेची संधी चंप्र सरांची नाटके आपल्याला प्राप्त करून देतात.

"नाणेफेक आणि इतर ५ नाटके" या पुस्तकात दिग्दर्शक, कवि रविंद्र लाखे यांचा लेख आहे. त्या लेखात लाखे म्हणतात – "नाटकातून कुठलीही एकरेषीय अर्थनिश्चिती होवू नये असा अंतस्थ हेतू चंप्रंच्या मनात असतो. चंप्रंच्या नाटकाचा नायक मन आहे पण नाटकात मनाला महत्व नसून मनाच्या सलग, उलटसुलट किंवा एकमेकांच्या विरुद्ध घडणाऱ्या हालचालींना महत्व आहे. चंप्रंचे कोणतेही नाटक हे प्रेक्षकांचे भान हरवण्यापेक्षा त्यांना भानावर आणणारे असते!"

दिग्दर्शक गिरीश पतके यांचा देखील प्रदीर्घ लेख चंप्रंच्या "ओळख परेड" या एकांकिका संग्रहात समाविष्ट आहे. त्यात पतके लिहितात - "चंप्र सरांसाठी सर्जिक साहित्य वा नाटक ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया असते. -- चंप्रंना स्वतःला विविध प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांच्या निर्मितीत रस नसतो तर त्या व्यक्तींच्या मनांत चाललेल्या घडामोडींशी, त्यातील नाट्याशी रस असतो. -- चं. प्र. देशपांडे हे केवळ मराठी रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार नाहीत तर भारतीय रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार आहेत. त्यांच्या अनेक नाट्यकृती आता पुस्तक रूपाने उपलब्ध झालेल्या आहेत. त्या विविध भाषांमध्ये भाषांतरित-रूपांतरीत होणे आवश्यक आहे."

चंप्रंच्या प्रत्येक नाटकातून, एकांकितेतून वाचक म्हणून आपल्याला सखोल काही मिळत राहते! उदाहरणार्थ - "बुद्धीचे एकूण काम हे माणसाच्या जगण्यातलं अपयशी काम आहे. संपूर्ण जगण्याचा आवाका बुद्धीला घेता येत नाही. माणसाची सगळी नाती संघर्षमय आहेत आणि त्याला बुद्धीने उत्तर देता येत नाही. बुद्धीने प्रश्न सुटायचे असते तर सीमा प्रश्न, मानवी जगण्यातले प्रश्न सुटले असते. --- All reactions create problems.--- स्वतःच्या मनाच्या कंडिशनिंगचे प्रश्न सुटले की सगळे प्रश्न सुटणार!" चं.प्र. सरांची कमालीची वैचारिक स्पष्टता आपल्याला अक्षरशः मोहवते!

माणूस जेवढा आपल्याला दिसतो त्याच्या पलीकडे आपल्याला न दिसणारा केवढा तरी पसरलेला असतो. एखादी ठराविक भूमिका  न घेता, अश्या न दिसणाऱ्या माणसाचा, त्याच्या मनाचा शोध घेणारे चंप्रंचे असे लिखाण इतर नाटककारांपेक्षा म्हणूनच वेधक आणि महान ठरते. त्यांच्या "ओळख परेड" या एकांकिकेत एक संवाद आहे - "काय झालं असतं-नसतं याला काही मर्यादा नाही. प्रत्यक्षालाच फक्त मर्यादा आहे. या प्रत्यक्षाच्या मर्यादेतच जगायचं आहे. या प्रत्यक्षाच्या चक्रातून सुटका नाही. आपली शरीरं, आपले अनुभव हेच सगळं प्रत्यक्ष रे! जाणार कुठे!."

त्यांच्या प्रत्येक पुस्तकातल्या प्रत्येक नाट्यकृतीमधून मला भावलेले काही संवाद इथे प्रस्तुत करत आहे -

चार पुरुषार्थांची चार नाटके -

१. ढोलताशे -

मन सारखं असे उत्सवात गुंतवल्यामुळं आणि अशा प्रकारे मनाला उत्सवाचं प्रदूषण झाल्यामुळे आयुष्याची काय हानी होते हे कसं कळत नाही?

अहंकाराच्या समर्पणाला भक्ती म्हणतात -- इथं तर अहंकाराचीच करमणूक चाललीय!

आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत?

खरं शोधणारा घातक नसतो -- खोटं टिकवणारा घातक असतो.

सारखं दुसऱ्यांची मनं सांभाळत बसायची पध्दत घाणेरडी आहे एवढं माझ्या लक्षात आलेलं आहे. ती पध्दत पटली तर सारखं स्वतःच्याच विरुध्द वागावं लागतं.

सारखं काही ना काही साजरं करत जगायच्या रोगट पध्दतीला नकार द्यायचाय मला.

२. इराक -

ज्या विषयावर खूप मतभेद शक्य नाहीत असे विषय कलाक्षेत्रात इंटरेस्टिंग होत नाहीत. मानवी मूर्खपणाला खूप वाव असायलाच हवा!

स्वतःला भारतीय म्हणायला इथं सगळेच तयार आहेत, पण स्वतःला हिंदू म्हणवून घ्यायला काही कोटी लोक तयार नाहीत -- त्याचं काय करायचं?

कुठलीही आयडेंटिटी फिक्स करायला गेलं की हिंसेची बीजं आलीच!

वाघावर एकवेळ स्वार होता येईल पण उतरणं अवघड असतं!

माणसाचं मनच भांडवलवादी आहे, ते सतत काही ना काही जमा करत असतं -- अन्याय, सुख, दुःख, मान, अपमान, वगैरे!

३. बुद्धिबळ आणि झब्बू -

नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

तुला सांगतो, तुझ्या डोळ्यांतल्या तीव्र स्त्रीत्वानं मला अगदी घट्ट पकडून ठेवलं आहे. हा नजरेच्या स्पर्शाचा परिणाम. पण प्रत्यक्ष स्पर्श असतो त्याचेसुध्दा इतके हजारो प्रकार आहेत की काही विचारू नकोस ! एखाद्या ख्याल गायकीसारखं सुचत जातं एकेक. मैफल द्रुत लयीत कधी गेली ते कळतही नाही.

ज्ञानामुळं अधिकाधिक सूक्ष्मपणा येतो. सगळ्या पध्दती अधिकाधिक गुंतागुंतीच्या आणि सुंदर होत जातात.

' मी तुझं चुंबन घेतोय' किंवा ' मिठीत घेतोय' – हीच लेव्हल ते गाठतात आणि ते बायकांना नाही चालत – बाहेर कितीही पॉप म्यूझिक असलं तरी इथे शास्त्रीय संगीतच लागतं! नोमतोम, रागविस्तार -- हे सगळं पद्धतशीर व्हावं लागतं --

ज्याला स्वतःच्या वागण्याबद्दल गुप्तता ठेवावी लागते तो इतरांबद्दल संशयी आणि सावध असतो.

४. जणू काही वास्तव –

सगळी दुःखं, वेदना, संघर्ष, हिंसा यांचा उगम या मेंदूच्या नियंत्रण-ताणातून होतो.

एकमेकांपेक्षा वेगवेगळे विचार आणि वेगवेगळे स्वभाव तर असतातच! प्रॉब्लेम्स निर्माण व्हायला तेवढं पुरेसं आहे! प्रॉब्लेम्सशिवाय कुणाला जगताच येत नाही!

पराभव पचवता येणार नाही. आपण विजयाला चटावलेले आहोत.

सगळे धर्म सतत मानसिक भाषेत बोलत राहिले! म्हणजे -- प्रेम, भीती, व्देष, हाव, हिंसकपणा, वगैरे.

काय काय कळावं असं माणसाला वाटत असतं. काळाच्या ओघात त्याला कळत जातं की काही कळायची गरजच नसते.

वास्तवाचे स्वरूप जाणून घेण्याची इच्छा हाच कला, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांना एकत्र आणणारा दुवा आहे.

एकच गुरुकिल्ली अशी सापडली पाहिजे की सगळे संघर्ष गळून पडतील.

पाच ॲब्सर्ड नाटके -

१. दिनकर पुरोहिताचा खून -

तुमचा लवकरच खून होणार आहे आणि हे तुम्हाला माहीत आहे, असं समजून मुलाखत घेतो मी तुमची.

२. एक गगनभेदी किंचाळी -

चांगलं म्हटलेलं पेलत नाही तुला.. लगेच वाहवत जातेस तू...

३. घोकंपट्टी -

जनरली माणसं एकमेकांशी हलकटपणानंच वागतात हे मला समजलेलं आहे. याचे तपशील किती भरायचे डोक्यात ?

माणसाचं मन म्हणजेच आंतर्विरोध ही साधी गोष्ट तुम्हाला समजू शकली नाही - आयुष्य संपत आलं तरीही!

अमेरिकेचे अध्यक्ष माझ्याहून खूपच मोठे ठरतात, कारण माझ्यापेक्षा खूपच प्रचंड विसंगती ते पेलतात !

लोक काय करतात, मी तंबाखू सोडली, मी तंबाखू सोडली -- असं म्हणत मानसिकदृष्ट्या सोडतच नाहीत तंबाखू!

सोडायचं पण मनानं धरून ठेवायचं मग काय अर्थ आहे?

४. गोळ्या काढलेलं पिस्तुल -

माझा खून होईपर्यंत माझा रोल आहे.

आई वारलेली दाखवायची आणि लगेच प्रेमगीत घ्यायचं -- असं करता येत नाही. गोष्ट कितीही बनावट चालते, पण सातत्याचा नियम पाळावाच लागतो.

माणूस हा मुळातच एक खोटा, अन्याय करणारा किंवा अन्याय सहन करणारा प्राणी आहे. आपण शक्यतो अन्याय करणाऱ्याच्या भूमिकेत असावं, असं माझं एक आपलं मर्यादित तत्वज्ञान आहे.

सूड, क्रोध, प्रेम, सहानुभूती -- अशा सगळ्या मनाच्या सवयी लक्षात घेऊनच रचावी लागते गोष्ट! जगण्याची ही फक्त एकच पध्दत उपलब्ध आहे का, हा प्रश्न आपण प्रत्यक्ष जगतानाही विचारात नाही, मग गोष्टीत का विचारावा !

५. ट्रायल –

हे नाटक अनुवादित असल्याने अशी वाक्ये इथे अप्रस्तुत ठरतात.

नाणेफेक आणि इतर ५ नाटके -

१. ए आपण चहा घ्यायचा? -

कितीही मोठा आवाज परवडतो पण माणसाचा त्रासिकपणा मिसळलेल्या आवाजाइतकी घाणेरडी गोष्ट जगात कुठली नसेल.

माणसं आवडीनिवडी फिक्स करत जातात ! खाद्यपदार्थ, त्यांच्या चवी, कपडे, त्यांचे रंग, एवढंच काय, विचार कुठले आवडतात ते पण फिक्स करत जातात! अरे बाबांनो, जितकं जास्त फिक्स होत जाल तितकं दुःख वाढवून घ्याल आयुष्यात! पण ऐकणार नाहीत! आपल्या आपल्या कामात खूप हुशार होतात पण जगण्याच्या कामात ढ !

लोक म्हणतात, खून करणं, हाणामारी करणं वगैरे असंस्कृतपणाची लक्षण आहेत -- आणि सुसंस्कृतपणाची लक्षणं म्हणजे ही --आपली चाललीयत ती --हळूहळू सडत राहणं म्हणजे सुसंस्कृतपणा -- प्रत्येक प्रश्न विचार करकरून पिसत राहणं आणि हळूहळू सडत राहणं --

मन सतत शून्यावर राहीलं पाहिजे.

२. धागेदोरे -

पारंपरिक सकाळ होते आहे. पारंपरिक ऊन पडत जाणे.. पारंपरिक सनई वगैरे... पारंपरिक धोंडी पारंपरिक साफसूफ करतो आहे.....

३. नाणेफेक –

भावना कमी म्हटल्यावर विचार जरा जास्त येणारच!

आपल्या विचाराच्या कक्षेत येणाऱ्या शक्यता या सगळ्या शक्यता आहेत असं समजायचं काही कारण नाही.

लोकशाहीइतका मुत्सद्दी प्रकार कुठं नसेल!

माणूस स्वतःचे निर्णय बेधडकपणे घेत असतो. पण आपल्याला आपुलकी वाटणाऱ्या दुसऱ्या माणसांचे निर्णय घ्यायला घाबरतो.

४. सध्या तरी शेवट गोड –

सध्या मी तुझं कोणतंच बोलणं अंतिम धरून चालत नाही.

सततच कल्पनाशक्ती सळसळती ठेवून वागावं लागेल.

५. सामसूम –

आदर्शवादी असण्यातही शरीरातली रसायनं कारणीभूत असतात!

तू नं सध्या एक ठराव -- सारखं चकित होत बसायचं नाही!

अन्याय दिसला की चवताळणं, धावून जाणं हे जर खरं असतं ना तर सगळीकडं सारखी धावत चाललेलीच माणसं दिसली असती !

६. झालं गेलं विसरून जाऊ (क्लॅरिटी) -

भाषा काही एखादी विचारसरणी लक्षात घेऊन तयार होत नाही! आणि या देशात इतकी गरिबी असूनही आपल्या फायद्याचं काय हे बहुसंख्यांना न कळणं हे नशीबच नाही तर काय! एक पगारवाढीचे करार सोडले तर महत्त्वाचे विषय काय, तर -- विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य! कुणाला गरज असते यांची?...मुख्य काय?

वस्तू (७ दीर्घांक) -

१. बुद्धिबळ आणि झब्बू -

विवाहपूर्व सेक्स हवाच म्हणे नाहीतर घरात एखादं वाद्य वाजवून बघणाऱ्याला एकदम एखाद्या ऑर्केस्ट्रात वाजवायला सांगितल्यासारखं होतं.

विशेषत: हे असं गोलागोलांचं डिझाईन असलं ना की साडी नेसण्याच्या पद्धतीमुळे ते गोल कुठंही येऊ शकतात. कुठंही आले तरी ते करेक्टच वाटतं, हे कसं काय? पण तुझे तर करेक्टच आलेत म्हणा.

२. डावेदार -

प्रतारणेचं ओझं नकोय मरताना!

३. मन -

शब्दांची गर्दी होणं, गोंधळून जाणं, वेड होणं, आपल्याला जे कळतंय तेच अंतिम सत्य आहे आणि तेच बहुजनहिताचं आहे असं वाटणं हेच जिवंतपणाचे लक्षण आहे.

एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय काय फरक असणार आहे! शून्य ते शून्य!

परिस कसा टच करेल त्याचं सोनं करतो, तसं माझं माईंड! टच करेल त्याचे प्रश्न तयार करणारं!

खरंतर मी थकलोय.. सतत हा डोक्याचा कारखाना चालूच! याच माईंडनं पुनर्जन्म होईल? नकोच वाटतोय? दुसऱ्या जरा चांगल्या माईंडनं चालेल !

यशस्वी होणाऱ्या खूप लोकांना माईंड चांगलं मिळालेलं असतं याबद्दल मला शंकाच नाही ! मग त्यांचं काय कर्तृत्व?

मला खूप छोटं जग हवंय -- खूप माणसं, खूप प्रसंग नकोयत त्यात ! एखाद्या धूमकेतूसारखं बाहेरनं काही येऊन माझ्या जगावर आदळू नये, असंच मला वाटत असतं! पण वाटून उपयोग?

एका ठराविक वयानंतरही केस काळे राहिलेली माणसं क्रूर असतात, असं चिनी अंगलक्षण सांगतं म्हणे! कारण त्यांना दुसऱ्यांची काळजीच नसते, असं त्यांचं म्हणणं!

४. नातं -

खरं तर त्या माणसाचे आभारच मानते मी मनातनं... मला हवा होता तसा पुरूष तू नाहीस हे कळून आलं मला त्याच्यामुळं...बरं झालं, त्याला वाटमारीचा हेतू सोडून ही वेगळीच इच्छा झाली

५. निर्मिती -

वरवर सरळ, साध्या दिसणाऱ्या गोष्टी एखाद्या भयानक टोकाकडे नेत असतात. वरवर कंटाळवाण्या दिसणाऱ्या गोष्टींतून एखादा खूनही आकाराला येत असतो.

वातावरणातली भयानकता फक्त दबा धरून असते... आणि मग एकच क्षण असा येतो की, घडून गेलेल्या गोष्टींचे वेगळेच अर्थ दिसायला लागतात.

हसणाऱ्या व्यक्ती निःस्वार्थी, नि:स्पृह वाटतात. हा आयुष्यातला सर्वात मोठा धोका आहे…

६. प्रेमच म्हणू याला हवं तर -

ट्रूथ रिपीटेड इज अ लाय !

आचार्य रजनीश म्हणतात की विनोदाशिवाय हसा ! हसण्यासाठी विनोदाची गरज नाही !

७. वस्तू -

कन्फ्युजन म्हटलं की मनाचा कणखरपणा जातो, मिळमिळीतपणा येतो.

खुल्लम खुल्ला (एकांकिका संग्रह) -

१. बस –

नावांचा माणसांवर थोडाफार परिणाम होत असावा. अमुक एका माणसाचे नाव हे नसून दुसरं असतं, तर तो असाच असता असं वाटत नाही.

२. डावे -

आपापल्या विचारसरण्या घेऊनच जातात सगळे विद्युतदाहिनीत!

३. इतिहास -

रस्त्यावरून चालताना पायांखाली स्वच्छ मोकळा रस्ता असला तरी पायांवर अपमानित देह आहे त्याचं काय?

४. खुल्लम खुल्ला -

ज्याच्यावर भाळून केलं लग्न तोच आयुष्यभर प्रॉब्लेम होऊन बसलाय.

५. संसाराणूपेंडघार -

तू रागावलीस की माझ्या तळपायात धडधडायला लागतं.

६. सत्य -

स्वतः शिवाय दुसऱ्या कुणालाच माहीत नसलेले आपले गुन्हे क्षम्य असतात की गुन्ह्याच्या अपराधी जाणिवेचा त्रास हेच त्याचं शासन असतं?

७. सेक्स -

प्रत्येक वेळी स्त्री शरीरानंच सामील झाली पाहिजे, असं काही नसतं. नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

८. स्थळ दिवाणखाना -

महिन्याला दोनचार अपमान या पगारात परवडतात.

माझं समजा बावीस हजार एकशे सदतीस एकूण प्रश्नांचं आयुष्य आहे! मी आत्ता पंधरा हजार पाचशे त्र्याण्णवव्या प्रश्नावर आहे! आणि सध्या मला सात महत्त्वाचे प्रश्न आहेत! त्यांचं महत्त्वच कसं जोखायचं? समजा प्रश्न नंबर तीन हा सगळ्यांत महत्त्वाचा आहे -- मग मी माझ्या उपलब्ध वेळातला जास्त वेळ त्याला द्यायला नको? प्रश्न नंबर दोन किंवा सातच चुकून जास्त वेळ खाऊन जातो!

स्वतः राजकारण करणं किंवा राजकारणावर प्रभाव टाकायची क्षमता असणं या दोनच खरं तर सर्वांत आदरणीय गोष्टी आहेत.

शब्दांची गर्दी होणं, गोंधळून जाणं, वेडं होणं, आपल्याला जे कळतंय तेच अंतिम सत्य आहे आणि तेच बहुजनहिताचं आहे असं वाटणं -- हेच जिवंतपणाचं लक्षण आहे.

सत्याचं फार बिनचूक वर्णन लक्षात यायला लागणं म्हणजेच वेडेपणा!!

एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय - काय फरक असणार आहे ! शून्य ते शून्य!...

कसली आलीयेत तत्त्वं ! सर सलामत तो तत्वं पचास!

९. वेषांतर -

जगायला सारखं प्रोत्साहन कशाला हवंय तुला ! तुझं जगणं चांगलंय, तुझं जगणं चांगलंय -- असं सारखं दुसऱ्यांनी म्हणायला कशाला हवंय!

१०. विरहवेदना -

मला तर वाटतंय की आपण फक्त एक तपशील आहोत एकूण परिस्थितीचा. परिस्थितीच फक्त जगत असते.

एखाद्या भव्य मंडपात लग्न सोहळा चालू असल्यासारखा वेदनेचा उत्सव माजवायचाय तुला --

कविता म्हणजे पैसे मिळवायच्या कामात अडथळे आणणारी वस्तू.

११. एकत्र -

माशा मारल्यापेक्षा गप्पा मारलेल्या बऱ्या की! अहो कुणाचा जीव घेतल्याचं पाप तरी नाही त्यात --

म्हणजे च्यायला जगण्याच्या पद्धती दोनच दिसतात एक म्हणजे प्रश्न पडू देत जगणं आणि दुसरी म्हणजे प्रश्न दडपत जगणं!

१२. मासोळी -

भयानक महाखुनी आपल्या दाराशी उभे आहेत – समजा एक लाख अमरीश पुरी, दोन लाख परेश रावल!

ओळख परेड (एकांकिका संग्रह) -

१. दंगल -

सगळे प्रश्न एकत्रितपणे एका क्षणात पाहता आले पाहिजेत! आणि पाहताक्षणी ते नाहीसे झाले पाहिजेत!

२. ओळख परेड-

स्वस्थ बसणं हे स्वतःचं महत्व माजवणारं बोलणंच आहे एक प्रकारचं!

जन्माला येताना काही माणूस ठरवून येत नाही की, आपल्याला खून करायचाय म्हणून किंवा आपल्याला खून होऊन मरायचेय म्हणून!

३. समस्या सोडवण्याचा सराव -

फक्त समस्यांची वेगवेगळी रूपं हीच आपल्या वेगवेगळ्या आयुष्यांची वैशिष्ठ्य म्हणायची का?

मुलींनी जर पुरुषांच्या दिसण्याला महत्त्व देऊ नये असं तुमचं मत आहे तर मग तुम्ही स्वतः सुंदर मुलीवर प्रेम करायचा प्रयत्न का करता?

नुसतेच कुठले विचार जिंकतात याच्यावरच काही आयुष्य चाललेलं नसतं.

४. समुदाय -

अन्यायाचा प्रतिकार जेव्हा कमीत कमी वेळात करायचा असतो आणि ताबडतोब न्यायाची प्रस्थपना करायची असते तेव्हा संतापण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो.

५. अस्तित्व -

आपल्याला जे अनुभवापासून ज्ञान मिळतं त्यात एक संगतवार घटनाक्रम असणार. बाहेरच्या लहरी शरीरात-- म्हणजे मेंदूकडे जात असणार. आणि ते ज्ञान एका विशिष्ट ठिकाणी मुद्रित होत असणार. या प्रक्रियेचा आम्ही शोध घेत आहोत. जेव्हा हे पूर्ण होईल तेव्हा ज्ञानाच्या रेकॉर्डस् निघतील. आणि त्या मुद्रित ज्ञानलहरी मेंदूत सोडण्याची सोय होईल. मेंदूची क्षमता वाढवण्याचे मार्ग सापडतील. आणि मग शाळा, शिक्षक, प्राध्यापक वगैरेंची जरूरच

लागणार नाही. यंत्रात डोकं ठेवलं की एकेका वेळी एकेका विषयाचा प्रगाढ पंडित करता येईल प्रत्येकाला. सगळी मानवजात प्रचंड ज्ञानी होऊन जाईल.

६. स्टालीन-

का जास्त लोकांपेक्षा कमी लोक बिनमहत्त्वाचेच असतात?

एक मिनिट हे एक वर्षापेक्षा महत्त्वाचं असतं का? दहा वर्षे ही शंभर वर्षांपेक्षा महत्त्वाची असतात का?

ज्या ध्येयाच्या आड इतकी माणसं येतात ते ध्येय बाळगावंच का माणसानं? माणसांच्या संख्येला काहीच महत्त्व नाही?

परिस्थिती माणूस घडवते हे जितकं खरं आहे तितकंच माणूस परिस्थिती घडवतो हेही खरं आहे. विनाशसुद्धा निर्मितीरूप असू शकतो.

७. ट्रेलर -

मी शब्दांपेक्षा कृतीवर जास्त भर देणारा माणूस आहे. माझ्या कृतीचा अनुभव न घेता माझ्या शब्दांवरून माझ्याबद्दल मत बनवू नका.

सगळी दुनिया समजल्यासारखे मतं सांगतात हरामजादे! मतं सांगायला भडवे सदोदित तयार!

८. खडक -

कुठल्याही खऱ्या गोष्टीत कसलाही 'पणा' नसतो; तिचं उभं राहणं किंवा अस्तित्वात असणं हे कुठल्याही कण्यावर अवलंबून असत नाही.

९. जोडपी -

ही नाती साली सगळी निश्चितता निर्माण करतात. आपल्या नात्यांत आपल्या मर्यादा गोठलेल्या असतात.

१०. ऑफिस -

खरा परमेश्वर तो आतला लेका! तू नुसता देव्हाऱ्यातला परमेश्वर! स्वतःच उदबत्ती लावायची आणि पडणारी राख बघत बसायचं!

११. रिलीफ -

आपल्या आवडीनिवडी आणि आपले फायदे-तोटे यांच्या व्यतिरिक्त कोणी करू शकतो विचार? मुळात असा विचार असू तरी शकतो का?

----

चंप्र त्यांच्या काही काही नाटकांतून आत्ता नाटक सुरू आहे याचं भान प्रेक्षकांना देत राहतात. त्यांचा स्त्रियांच्या मानसशास्त्राचा देखील अतिशय सूक्ष्म अभ्यास आहे हे जाणवत राहते. 'खलास' हा शब्द त्यांना प्रिय असावा, तो बऱ्याचदा संवादांत डोकावतो. 'नुस्खे', 'भागधेय', 'गुंताडा', 'लटांबर', 'सेन्स ऑफ वंडर', 'जागतिक निर्लज्ज साले' असेही काही हटके शब्द/शब्द प्रयोग आपली शब्द संपत्ती वाढवतात, भाषा समृद्ध करतात.

चंप्रंची व्यक्त व्हायची स्वतःची एक चंप्र स्टाईल आहे. नमुन्यादाखल काही संवाद/वाक्ये इथे प्रस्तुत करतो आहे -

- कुठलीही कपॅसिटी, न वापरता पडून राहू नये!
- ती स्वतः तशी भयंकर सूक्ष्म आहे.

• ते स्मूथनेसला टोकरणारे ठरले असते.

• हा निर्णय घेताना माझ्या मनात वैचारिक घर्षण झालंच नाही असं नाही.

• मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि एकूण पुस्तकांची उपलब्धता नष्ट होणे हे एकाच वेळी घडेल असे दिसते.

चंप्र एके ठिकाणी म्हणतात - "आपले विचार आणि भावना या काही स्नायूपेशींतून उगम पावतात आणि आपल्या शरीरातली रसायनं त्यांचं नियंत्रण करतात." हा लेख वाचत असताना आपल्या मनात झालेल्या विचार - भावनांच्या निर्मितीकडे जर आपण डोळसपणे पाहू लागलो, त्यापाठी काही रसायने कार्यरत असतात याची देखील दखल घेऊ लागलो तर अशी लाभलेली सजगता मानवी जगणे सुकर व्हायला मोठी मदत करणारे ठरणार आहे. कलेच्या माध्यमातून स्वतःच्या मनावर ताबा मिळवून देणारे चंप्रंचे साहित्यातले हे योगदान श्रेष्ठ आहे. किंबहुना, पुलित्झर अथवा साहित्यातल्या नोबेलच्या तोडीचे आहे, नव्हे काय?

चंप्र सरांनी त्यांच्या नाटकांमधून मांडलेल्या मनोअभ्यासाचे सर्वांनी चिंतन केले पाहिजे. एखादा विचार दीर्घकाळ धरून ठेवणे महाकठीण. आपण विसरतो आणि आपण काय विसरलो ते देखील विसरतो. विचारधनाचे असे हे डॉक्युमेंटेशन म्हणूनच तर करावेसे वाटले!

- डॉ. गिरीश रांगणेकर

काल गिरीश रांगणेकर यांनी इथे चंप्र देशपांडे यांच्या नाट्यकृतीतून काही संवाद देऊन उत्तम आढावा घेतला होता. याच आढाव्यात मी 'ओळखपरेड' पुस्तकासाठी लिहिलेल्या प्रदीर्घ लेखाचाही उल्लेख त्यांनी केलाय.

तो मूळ प्रदीर्घ लेख जिज्ञासूंनी वाचावाच पण तत्पूर्वी त्या लेखातील एक भाग इथे द्यायला हरकत नाही. तो पुढीलप्रमाणे -

------------------

खुल्लमखुल्ला व ओळखपरेड या संग्रहातील २३ एकांकिका व ९ नाट्यकृतींचे वाचन केल्यानंतर चंप्रंच्या नाट्यलेखनाची मला जाणवलेली वैशिष्ट्ये खाली नमूद केली आहेत -

०१) आपणाकडे नाट्यात्मकता मोजण्याचे जे काही मापदंड परंपरेने चालत आलेले आहेत, त्या रूढ मापदंडांत मोडणाऱ्या या संहिता नाहीत.

०२) त्यांच्या कोणत्याही एकांकिकेतील वा नाटकातील कथानक हे अनावश्यक बाह्य घटनांची मागणी करीत नाही.

०३) किंबहुना मानवी आयुष्यातील दैनंदिन जगणे जगत असताना कोणत्याही व्यक्तीला ज्या प्रश्नांना सामोरे जावे लागते अशा प्रश्नांचा सखोल उहापोह चंप्रंच्या नाटकांतून/ एकांकिकेतून केलेला असतो.

०४) तो प्रश्न कथानकाच्या मध्यवर्ती सूत्रासारखा असतो. तसेच त्या प्रश्नाच्या आजूबाजूचे, वरचेखालचे सर्व प्रदेश साकल्याने या नाट्यकृतीतून दृगोचर होत जातात. हे प्रदेश कोणत्याही स्थलकालाशी संबंधित नसतात तर ते अनेकदा मानवी मनाच्या अंधाऱ्या वा ज्यांचा फारसा विचार केला जात नाही म्हणून दुर्लक्षित केलेल्या मानसिक अडगळीतील असतात.

०५) कोणतीही पात्रे म्हणजे विशिष्ट स्वरूपाची एकच एक अशी व्यक्तिमत्वे नसतात. त्यांना त्यांची त्यांची म्हणून काही खास अशी शारीर वा सौदर्यात्मक वैशिष्ट्ये नसतात. म्हणजेच त्यांची पात्रे ही ठरावीक नायक अथवा नायिका नसतात किंबहुना ती पात्रे एन्टी कॅरेक्टर असतात.

०६) रूढ नाट्यमय घटना किंवा सुरुवात, मध्य, शेवट अशी पारंपरिक पद्धतीची नाट्यरचना चंप्रंच्या नाटकात दिसून येत नाही. किंबहुना असे म्हणणे अधिक योग्य ठरेल, की या नाट्यरचनेच्या तंत्रात न अडकतादेखील त्यांनी निवडलेल्या नाट्यविषयाच्या अंतरिक सुरचनेमुळे ते महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण नाटककार ठरतात. ते तपशीलवार व्यक्तिचित्रणाची काळजी घेत नाहीत. अमुक एक पात्र सुष्ट व अमुक एक पात्र दुष्ट असे त्यांच्या नाटकात नसते. ते त्यांनी निवडलेल्या प्रसंगाकडे अत्यंत तटस्थतेने पाहतात. पात्रांच्या स्वभावचित्रणापेक्षा त्या त्या प्रसंगातील माणसांच्या जगण्यातील प्रश्नांचा, त्यातील प्रक्रियेचे अंतरिक भान त्यांना नाटककार म्हणून महत्त्वाचे वाटते.

०७) त्यांच्यासाठी सर्जक साहित्य वा नाटक ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया असते. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, त्यांची पात्रे ही कोणत्या ना कोणत्या स्वभावबद्धतेत असतात, त्यांनी निवडलेला नाट्यप्रसंगातील प्रश्न अथवा पात्रांच्या जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे समग्रावधानी संवाद हे त्यांचे मुख्य भांडवल असते. एक प्रकारचे प्रमेय मांडून ते लिहीत असले तरी, स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांचे अनुभव प्रेक्षकांच्या वा वाचकांच्या मनात परावर्तित करण्यासाठी चंप्र लिहिताना दिसत नाहीत. त्यामुळे अनुभवांचे संचित, शोध या संकल्पना त्यांच्या नाटकातील आशयसूत्रांबाबत कामाच्या ठरत नाहीत.

०८) अनुभवाची समृद्धता, व्यक्तिमत्वाची समृद्धता, व्यासंग यांचे महत्त्व मान्य केले तरी त्यात सर्जकता असतेच असे नाही. केवळ या गोष्टी आहेत म्हणून कलाकृती महत्त्वाची ठरत नाही. सर्जकता म्हणजे मानवी मनाच्या अराजकतेचे एकात्म भान. आणि हे भान चंप्रंमधील नाटककाराकडे असल्याने कोणतेही बाह्य अवडंबर न माजवता केवळ अंतरिक एकात्म भानामुळे त्यांची नाटके सर्जक आणि म्हणूनच महत्त्वाची ठरतात.

०९) कोणत्याही रूढ नाट्यमय घटनांचा आधार न घेता, दैनंदिन जगण्यातील एखाद्या घटनेचा, प्रसंगाचा, त्यातील विविध स्तरांचा विचार करून त्यांचे हळुवारपणे सूक्ष्म पापुद्रे उलगडून दाखवणे हे चंप्रंच्या एकूणच लिखाणाचे वैशिष्ट्य आहे. भावना आणि विचार, विचार आणि विचार, उक्ती आणि कृती यातील द्वैत त्यांना नाटककार म्हणून भावते. त्या त्या विशिष्ट प्रसंगातील भान प्रक्रिया उलगडून दाखवतांना त्या त्या प्रश्नांच्या संदर्भातील त्यांनी निवडलेला कोणताही नाट्यप्रसंग हा नंतर केवळ एक पार्श्वभूमी म्हणून शिल्लक राहतो. त्या घटनेतील तपशीलांपेक्षा जगण्याचं, सभोवतालच्या वास्तवाचं भान, एक प्रकारचे नवीन आकलन, शहाणीव चंप्रंची नाटके देतात.

१०) हे भान किंवा आकलन केवळ त्या त्या नाट्यप्रसंगापुरतं मर्यादित नसतं तर एकूणच जगण्याच्या संदर्भातील 'सत्याचे श्रेयस' असते आणि हे श्रेयस समग्रावधानी असते. हे समग्रावधानी भान कुठल्याही अनुभवाला Justify करत नाही किंवा Condemn देखील करत नाही. ते आशयपूर्णतेकडे जाते आणि तोच नाटकाचा उत्कर्ष बिंदू (Climax) असतो. रूढ पारंपरिक 'नाट्यात्म विधान' (Dramatic Impact) देखील चंप्रंची नाटके देताना दिसत नाहीत, ती पात्रांच्या समस्येवरील उपाय अथवा त्यांच्या प्रश्नांचं निराकरण सांगत बसत नाहीत. याबाबतीत केवळ एकाच नाटकाचा अपवाद करणे आवश्यक आहे आणि ते नाटक म्हणजे 'जणू काही वास्तव'! या नाटकात नाटककार

चंप्र उपाय सूचवतात कारण, ते नम्रता या पात्राला (म्हणजेच नाटककारालादेखील) गवसलेले कार्यात्मक सत्य आहे, व ज्यामुळे एकूणच मानवी संघर्षांचं मूळ नष्ट होईल अशी तिची धारणा आहे.

११) 'जणू काही वास्तव' तसेच 'घोकंपट्टी' या नाटकांत वास्तव तसेच अ-वास्तवातील आतंरिक सुसंगती असलेल्या तुकड्यातुकड्यांच्या दृश्यांची रचना, भास आभासात्मक पात्ररचना, लोकप्रिय अशा विविध गाण्यांचा तसेच हिंदी चित्रपटातील लोकप्रिय व्यक्तिरेखांचा जाणिवपूर्वक वापर चंप्रंनी केलेला आहे. या प्रकारची नाट्यरचना ही त्या त्या नाटकातील आशयाला पूरक ठरणारी आहे.

१२) मराठी नाटकात प्रेक्षकांना एक लिंक लागतेच. ही पात्रे, यांचे असे झाले, मग असे झाले... अशी! बहुसंख्य प्रायोगिक म्हटली जाणारी नाटकेही हे बंधन स्वीकारताना दिसतात. चंप्रही खऱ्या-खोट्या पद्धतीने बऱ्याचदा हे स्वीकारतात. कधी ते स्वीकारल्याचा आभासही तयार करतात.

१३) सुरुवातीच्या काही एकांकिका व नाटकांचा अपवाद वगळता नाटककार म्हणून चंप्र दिग्दर्शकाला फारशा सूचना देत नाहीत. त्यांच्या नाटकातील कंस जर पाहिले तर त्यांची संख्या जवळपास नगण्य असल्याचे जाणवेल. तसेच ते नेपथ्यरचना, प्रकाशयोजना वा इतर तांत्रिक बाबतीत देखील फारसे आग्रही दिसत नाहीत. कारण त्यांच्या नाटकातील शब्द व त्यातील मोकळ्या जागांमधील अर्थ नीटपणे पोहोचले तर नाट्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला अडचण येत नाही, याची त्यांना जाणीव असते. ही नाट्यमयता मराठी रंगभूमीवर मान्यता प्राप्त असलेल्या ढोबळ नाट्यमयतेपेक्षा भिन्न आहे.

१४) चंप्रंच्या संहितेत जर सुधारणा करण्याची आवश्यकता भासली आणि चंप्रंना जर मुद्दा पटला तर ते अत्यंत प्रामाणिकपणे दिग्दर्शकाला सहकार्य करणारे नाटककार आहेत. त्यांच्या मते कोणतीही कलाकृती कधीच परिपूर्ण नसते. त्यामुळे ते त्या क्षणाला, किंवा त्या परिस्थितीत आवश्यक असेल तितक्या सुधारणा करून देतात. असे बदल केल्याने नाटकातील आशयाची प्रतवारी कमी होत नाही. नाट्यरचना कधीच परिपूर्ण होत नसली तरी तिच्यातून येणारे आकलन मात्र परिपूर्ण असू शकते, असे चंप्र मानतात.

१५) त्यांच्या नाटकातील पात्रांसारखीच त्यांची नाट्य भाषा ही खास चंप्रंच्या शैलीची असते. चंप्रंची शैली म्हणजे पात्रानुसार त्यांची भाषा जरी ढोबळ मानाने बदलत नसली तरी त्यात रचनेची वीण असते, ती समजून घ्यायला, त्यातील अर्थांच्या विविध छटा समजून घ्यायला, ती पात्रे जिवंत करण्यासाठी दिग्दर्शकाला, कलाकारांना विशेष प्रयत्न करावे लागतात. आणि भाषेची ती वीण उकलल्याशिवाय चंप्रंची नाटके 'दिसत' नाहीत. भाषा, शब्द यांबाबतची एक प्रकारची प्राथमिक तयारी असावी लागते.

१६) चंप्रंची नाटके कोणा विशिष्ट पात्रांची नसतात किंवा ती एक प्रकारे लेखकाचीच भाषा बोलतात असे अनेकजण म्हणत असतात परंतु त्यात फारसा अर्थ नाही कारण चंप्रंना स्वतःला विविध प्रकारच्या व्यक्तिमत्वांच्या निर्मितीत रस नसतो तर त्या व्यक्तींच्या मनांत चाललेल्या घडामोडींशी, त्यांतील नाट्याशी रस असतो...त्यांची भाषादेखील त्या त्या पात्रानुसार थोडीफार बदलताना दिसते.

१७) त्यांच्या लेखनाचा विचार करताना त्यांची कलेबाबतची संकल्पना अधिकाधिक विकसित होत असल्याचे लक्षात येते. माणसातील दुःख, संघर्ष, हिंसा यांचे मूळ कारण मनाच्या अराजक अवस्थेत असून त्यापासून सुटका करणे

कलेचे उद्दिष्ट असते याचे भान त्यांना आहे. समग्र भानात मनाची एकविध जाण अभिप्रेत आहे. त्यांच्या दृष्टीने तोच मोक्ष आहे. मुख्य म्हणजे हा मोक्ष आध्यात्मिक नाही तर शारीरिक आहे असे आग्रही प्रतिपादन ‘जणू काही वास्तव’ मधील नम्रता या पात्राचे आहे.

१८) नाटकातील पात्रांच्या जगण्याच्या आपापल्या तर्करचना असतात. त्यांच्या संबंधांची ही नाटके असतात. भावनिकता कमी असते. कुठल्याही पात्राची अथवा पात्रसमूहाची बाजू घेतलेली नसते. परंपरागत नीतीकल्पनांचा, धर्मकल्पनांचा, अस्मितांचा पुरस्कार नसतो. कोणत्याही परिवर्तनाच्या हेतूने लेखन केलेले नसते. ते स्थितिवादीही नसते. सत्-असत, चांगले-वाईट, नायक-खलनायक, काळे-पांढरे असे झगडे नसतात. गौरव वा हेटाळणी नसते. संदेश नसतो. समाजमान्य शेवटाचा प्रयत्नही नसतो. काही प्रश्नांच्या संदर्भात पात्रे आपापल्या पद्धतींनी वागतात, झगडतात, तडजोडी करतात, सुखी-दुःखी होतात. या सर्व गोष्टींचे भान व्यक्त होत राहते.

१९) प्रेक्षकांना भारून टाकणे, नाटक अंगावर येणे, उदास वा निराश करणे, मनात अपराधी भाव दाटवून खट्टू करणे अशा प्रकारचा नाट्यानुभव ही नाटके प्रसारित करीत नाहीत. ती आशावादी वा निराशावादी नसतात.

२०) त्यांच्यासाठी सर्जक साहित्य, नाटक वा कला ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया आहे. जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे समग्रावधानी संवाद हे आपल्या नाटकांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे, सर्जकता म्हणजे मनाच्या अराजकतेचे एकात्म भान असे ते मानतात. आणि हे भान त्यांच्यातल्या नाटककाराकडे असल्याने कोणत्याही विचारसरणीचे वा इझम्सचे बाह्य अवडंबर न माजवता केवळ आंतरिक एकात्म भानामुळे त्यांची नाटके तपशीलांपेक्षा जगण्याचे, सभोवतालच्या वास्तवाचे समग्रावधानी भान व्यक्त करणारी, शहाणीव देणारी आणि म्हणूनच महत्त्वाची ठरली आहेत.

२१) मूळ प्रश्न हे मटेरिअलचे किंवा वस्तूरूपाचे म्हणजेच तपशीलांचे नसून इसेन्सेचे म्हणजे मूलद्रव्याचे असतात म्हणूनच रूढ नाट्यलेखन तंत्रामध्ये न अडकता किंवा त्याचा फारसा विचार न करता ते नाट्यलेखन करताना दिसतात. थोडक्यात कसे मांडले आहे, कोणता फॉर्म वापरला आहे यापेक्षा काय मांडले आहे, त्यातील आशय किती मूलभूत स्वरूपाचा आहे याची ते अधिक दखल घेतात. या सर्व नाटकांचा कच्चा माल (मटेरिअल) कल्पित आहे मात्र त्यातील आशय हा जगणे सांगणारा किंवा जगण्याला सखोलतेने भिडणारा आहे.

ही सर्व वैशिष्ट्ये पाहता ही नाटके ‘निरुपयोगी’ असतात असे म्हणायला हरकत नाही. निरुपयोगी म्हणजे ही नाटके करमणूक करणारी असली तरी त्यात करमणूकप्रधानता नसणे तसेच या नाटकांना सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे हत्यार म्हणून न वापरणे इत्यादी भौतिक असे दिसणारे उपयोग सांगता येत नाहीत. परंतु होकारात्मक भाषेत सांगायचे तर, ही नाटके एक, समज-भानयुक्त रिलॅक्सेशन देतात असे म्हणता येईल. यालाच समग्रतेची कला म्हणता येईल.

- गिरीश पतके

कळत-नकळत कविता बोधप्रद होणे
ही कवीची सर्वात मोठी समस्या असते !

Rajesh Sonawane is with रवीन्द्र दामोदर लाखे and Champra Deshpande.

.

चं. प्र. देशपांडे सर

आणि

रवींद्र दामोदर लाखे सर

यांच्या वाङ्.मयीन, वैचारिक पोस्ट

विचारप्रवर्तक असतात.

त्यांच्या विचारांशी तुम्ही भलेही सहमत नसाल ;

पण विचारांचा तळ गाठण्यास या पोस्ट भाग पाडतात, हे मान्य करावे लागेल.

आजकालच्या हायस्पीड टेक्नो काळात खरोखरच ही फार मोठी गोष्ट आहे.

आता तुम्ही म्हणाल, तरूण पिढी अशा पोस्ट वाचते काय?

मी म्हणतो. वाचत नसेल तर, वाचण्याची शिफारस

करूया तुम्ही - आम्ही.

अनेक मान्यवर साहित्यिक, विचारवंत फेसबुकवर सध्या महत्त्वाच्या वाङ्.मयीन, वैचारिक पोस्ट लिहित आहेत, ही चांगली गोष्ट आहे.

नव्या पिढीला आपण असे सकस वाचण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

" मला भाषा थोडीफार येतेच. आता मी रोज थोडा गंभीर विचार करणार आहे. म्हणजे मला लेखक होता येईल ! "

" अनुभव असतोच गाठीशी. शिवाय माझा स्वभाव जरा विनोदीही आहे. त्यामुळे, मी लेखक व्हायचे नक्की केले आहे ! "

" मुलांच्या आग्रहामुळे माझ्या चरित्राचं पुस्तक काढलं आहे. ३०० पानांचं आहे. तुम्हाला देणार आहे वाचायला ! "

" माझी बायकोही करते कविता. तिचा पहिला कवितासंग्रह काढलाय. तुम्हाला वाचायला देणार आहे ! "

" आमच्या नात्यातले एकजण खूप विनोदी लिहितात. त्यांचे एक हस्तलिखित मी देणार आहे तुम्हाला वाचायला !अभिप्रायासाठी ! "

" आमच्या एका कर्तबगार नातेवाईकाची पंच्याहत्तरी आहे. हा मी त्यांच्यावर लिहिलेला लेख -- जरा चांगल्या भाषेत द्या ना करून ! "

" दुसऱ्या महायुद्धावरचं एक पुस्तक आहे माझ्याकडे. फार बेस्ट आहे. तुम्हाला देतो वाचायला ! "

" नर्मदा परिक्रमेवरचं एक सुंदर पुस्तक आहे माझ्याकडे. तुम्हाला हवेय का वाचायला ? "

Shailesh Sonar

आताच कल्याणला 'मन' चा प्रयोग पाहून आलोय. चंप्रंच लिखाण तर १९९८-९९ पासून वाचतोय आणि काही एकांकिका करण्याचाही विचार त्यावेळेस केला होता. पण ते काही जुळून आलं नाही. आणि पुढे नाटक करण्याशीही संबंध तुटला...आजचा प्रयोग प्रचंड आवडला. Abhijeet Zunjarrao ह्यांनी हा दिर्घांक केला ह्यासाठी त्यांच अभिनंदन आणि तो खूप उत्तम अनुभव प्रेक्षक म्हणून आम्हाला मिळवून दिल्याबद्दल मनापासून आभार. #रमेश वाणी कुठे होतात तुम्ही? संधीचं सोनं केलंत. मला जे वाटलं ते तुम्हाला प्रत्यक्ष भेटूनही सांगता आलं. ह्याआधी कुठल्याच नाटकानंतर मी असं कुणाला भेटून काही बोललो नाही. पण, आज मला राहवलं नाही. 'मन'चे अनेक प्रयोग होत राहोत आणि हे नाटक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावं. मनापासून शुभेच्छा□□□

AI – artificial intelligence – कृत्रिम बुद्धिमत्ता

त्याला विचारले की बाबा, चांगली कविता म्हणजे काय ? उत्तरादाखल त्याने सविस्तर, उत्तम विवेचन केले. माझ्या आवडीचे एलियट आणि व्हिटमन  या कवींची नावेही उदाहरणादाखल त्यात होती. खरोखरच छान होते उत्तर. पण, एका बाबतीत मात्र आपल्या मराठीपेक्षा वेगळेपणा दिसला. मराठीत कसे, सामाजिक-राजकीय परिवर्तनाची भूमिका असल्याशिवाय असूच नाही शकत चांगली कविता -- ते मात्र त्याने वगळलेले दिसले. तो डेटा त्या यंत्रात भरणाऱ्या कमिटीवर बहुतेक तिथे मराठी माणूस घेतला नसावा !

माझी पुस्तके खालील ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध आहेत ---

१

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

आणि २

पुस्तकवाला अँड कंपनी,

पुणे.

फोन -- ८६२४९७७०२९.

Avinash Kolhe

.

चं. प्र. देशपांडे (जन्म:१९४६) यांची नाटकं वेगळी असतात. काल 'मन' बघितले. खुप वर्षांपुर्वी त्यांचे "ढोलताशे" बघितले होते. 'मन' या एकपात्री नाटकात एक मध्यमवर्गीय मध्यमवयीन विवाहित एका मुलीचा बाप असलेली व्यक्ती केंद्रस्थानी आहे. हा माणूस लोकलने प्रवास करतो, ऑफिसमधील युनीयनमध्ये यथाशक्ती सहभागी होतो आणि तरीही ठार एकटा असतो. त्याला अनेकदा 'कशासाठी जगायचं' हा प्रश्न त्रस्त करतो. नाटकाचा प्रयोग दिग्दर्शक अभिजित झुंजाररावने फार कल्पकतेने उभा केला आहे. खास उल्लेखनीय म्हणजे नेपथ्य (सुमीत पाटील), प्रकाश योजना (श्याम चव्हाण) आणि अभिनय (रमेश वाणी). दोन तासांचा एकपात्री प्रयोगात प्रेक्षकांना खिळवून ठेवणं अवघड आहे. अशा अनवट नाटकाचे निर्माते विजय चौगुले यांचे विशेष आभार.

कालच्या, शिवाजी मंदिर, दादर च्या प्रयोगानंतर आलेला आणखी एक अभिप्राय ---
दुसऱ्यांचा मनाचा विचार करता करता कधी स्वतःच्या मनाचा विचार केलाय का ? खूप प्रश्न ही असतील मनात...या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील नाही मिळतील पण मनात वाहत जाणारा हा प्रश्नांचा प्रवाह कुठल्या दिशेने गेला पाहिजे त्यासाठी नक्की बघा मन
- अभि आगवणे

धर्म, शांतता, संघर्ष आणि हिंसा

“What we call religion is merely organized belief, with its dogmas, rituals, mysteries and superstitions. Each religion has its own sacred book, its mediator, its priests and its ways of threatening and holding people.
Most of us have been conditioned to all this, which is considered religious education; but this conditioning sets man against man, it creates antagonism, not only among the believers, but also against those of other beliefs.
Though all religions assert that they worship God and say that we must love one another, they instill fear through their doctrines of reward and punishment, and through their competitive dogmas they perpetuate suspicion and antagonism.”
― Jiddu Krishnamurti, Education and the Significance of Life

कोणताही धर्म म्हणजे नुसती एक शाब्दिक-वैचारिक ओळख असते. तो एक समूह असतो – टोळी असते. तिचा भाग असण्यात माणसाला सुरक्षितता वाटते. या अशा अलगतेमुळे वेगवेगळ्या धर्मांची माणसे एकमेकांपासून दुरावतात. एकमेकांच्या संघर्षात असतात. कोणत्याही धर्माचे अनुयायी तो तो धर्म जगत नसतात. धर्म हा निर्भय आणि शांत असतो असे म्हटले तर अशी टोळी ही भय आणि हिंसा यांवर आधारलेली असते. याचा अर्थ धर्मच न मानणारे लोक शांत, सज्जन, शहाणे असतात असा मुळीच नाही. त्यांची सुरक्षिततेची हत्यारे वेगळी असतात, इतकेच. या एकूण अवस्थेमुळेच माणूस जगाची वाट लावत जातो – विध्वंस करत जातो. हे पाहता, मध्येच चार माणसांना बाजूला

घेऊन, तुमच्या जगण्यात शांतता नाही, असे म्हणणे हे बालिशपणाचे ठरते. ती तर ते म्हणणाऱ्याच्या जगण्यातही नसते. श्रद्धांनी आणि विचारांनी ‘ वेगळा ‘ जगणारा माणूस अशांतच असतो.

--- ०0० ---

त्या वेळी पुण्यात असणारे नाट्यकर्मी, मित्रमैत्रिणी, हितचिंतक आणि प्रेक्षक,

-- जरूर पहा -- रमेश वाणी यांनी घडवलेले काही अपवादात्मक –

( prayog 12-07-24 )

हे नाटक बराच पल्ला मारेल याची खात्री वाटते –

Fine writers do psychoanalysis

“There’s my life, why not, it is one, if you like, if you must, I don’t say no, there has to be one, it seems, once there is speech. No need of a story, a story is not compulsory, just a life. That’s the mistake I made, one of the mistakes, to have wanted a story for myself whereas life alone is enough.”

Samuel Beckett, Stories and Texts for Nothing, 1955

ठकीशी संवाद

( दीर्घांक ) -- ले ० सतीश आळेकर, दिग्द० अनुपम बर्वे, निर्मिती – अमेय गोसावी.

मजेशीर आहे नाटक. मला आवडले. आयनेस्को च्या ‘ द न्यू टेनंट ‘ ची आठवण व्हावी असे अनेक पार्सल्सच्या खोक्यांनी भरलेले नेपथ्य आणि दोनच पात्रे – धनी आणि ठकी. अमुक एक सलग गोष्ट वा एखादा निश्चित विषय असे काही नाही. कोरोना काळातल्या लॉक डाऊनमुळे कंटाळलेला माणूस आणि तो आहे करमणुकीच्या शोधात. एवढेच. नाटकातले त्याचे सुरुवातीचे स्वगत उत्तम आहे. कंटाळा म्हणजे काय ? तो येतो म्हणजे कुणाला येतो ? मग मी कोण ? अशा नेहमी टाळल्या जाणाऱ्या प्रश्नांचे हे स्वगत आहे. गंमत सुरू होते ती गडकऱ्यांनी दिवाकरांना एक लखोटा देण्यापासून. त्यातून मग, दिवाकर, त्यांचा मुलगा, वि. वि. बोकील, दि. बा. मोकाशी, तेंडुलकर अशी एक हास्यास्पद परंपरेची साखळी विणली जाते. ही एक प्रकारे विश्लेषक समीक्षेची टवाळीही म्हणता येते. पण, मजा येते. असे खूप आहे. निरनिराळ्या काळांचा आणि संस्कृतींचा अभ्यास यांचीही थोडी टर उडवली जाते. मजा येते. एकूणात या नाटकातला करगोटा अमर होत जातो. सगळे सांगत नाही बसत. मेलडी खाओ और खुद जान जाओ !

सुव्रत जोशी आणि गिरिजा ओक अप्रतिम ! स्वच्छ वाणीची सुंदर तरुणी आणि उत्तम संवादफेकीचा वयस्कर इसम – बेष्ट जोडी ! ही त्याची कोण वगैरे न विचारता पाहात जायचे नाटक. ( शेवटी होतो तो रहस्यभेद. ) यात टिळक, गांधी, सावरकर, नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी असे अनेक उल्लेख येतात. बाबरी, गोंध्राही येते. पण, हे नाटक

अमुक एक भूमिका घेऊन प्रचार करते आहे, असे मला वाटले नाही. सर्वच गोष्टींना एका क्षुद्र परिसाचा स्पर्श घडवून त्यांना हास्यास्पद करणारे हे नाटक आहे. मजा येते.

संगीत, नेपथ्य, भरपूर प्रकाश योजना आणि समोरच्या पडद्यावर दिसणारी जुनी-नवी दृश्ये यांनी नाटकाची खुमारी वाढत राहते. आणि त्याचा रिचनेसही वाढत राहतो.

एकूणात सर्वांगसुंदर, सुविहित, देखणा प्रयोग होतो !

हे मराठीतले एक वेगळ्या प्रकारचे विनोदी नाटक आहे. निरनिराळ्या वादांच्या, अभ्यासाच्या आणि व्यक्तिगत कंटाळ्याच्या व एकाकीपणाच्या जाचातून थोडाफार विसावा देणारे. पण हे काही ॲब्सर्ड नाटक नव्हे. करगोट्याच्या स्पर्शाने अनेक गोष्टी हास्यास्पद करत जाणे याला ॲब्सर्ड वा मृषा नाट्य नाही म्हणता येणार. मृषा नाट्यात पूर्ण जगण्यातल्या अतार्किकतेची, निरर्थकतेची जाण व्यक्त होत असते. मोठ्या गोष्टी हास्यास्पद होणे वेगळे आणि लहान-मोठ्या हा भेदच मावळून सगळे जगणेच गधडेपणाचे जाणवणे वेगळे.

शेवटी ठकी म्हणते, पंचप्राणातला शेवटचा पाचवा प्राण जाताना निरोप म्हणून हात नका हलवू – लोकांना वाटायचे, मरताना तुम्ही काँग्रेसच्या भूमिकेत होता ! – हे छान वाटले !

--- ००० ---

रमेश वाणी

या अभिनेत्यासाठी

बघा -- ' मन ' !

" माझे डेथ सर्टिफिकेट माझ्याकडे आहे. बाबांनी मला पुन्हा जिवंत केले आहे. आता माझी नुकसान भरपाई मीच घेईन ! "

मोठी इमारत. करा घर-सजावट पण कॉलम-बीमला धक्का न लावता. नाहीतर सगळेच गाडले जाल सौंदर्याच्या ढिगाऱ्यात !

लोकवाङ्मय गृह

[11:07 am, 11/7/2024] +91 98192 45972: ढोलताशे । चं. प्र. देशपांडे । दुसरी आवृत्ती

पाने : ९२ । किंमत : २२५/-

▪ ऑनलाईन खरेदीसाठी लिंक :

https://lokvangmaybooks.in/.../%e0%a4%a2%e0%a5%8b%e0%a4.../

▪ संपर्क : ८४५४०४९०३६ । ०२२-२४३७६०४२

"...माणूस दुःखी होण्याची पद्धत जर जगभर एकच आहे तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता म्हणजे धर्म-एकच असला पाहिजे. अनेक धर्म कसे असतील? आणि धर्मात गर्दीचं काय काम? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकानं

स्वतः केलेलं आहे; तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही..."

[11:36 am, 11/7/2024] CHAMPRA Deshpande:

11-07-24.